नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
डांगळे ग्रंथ संपदा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

यु ग वा णी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

कविता
१ उबग–गु. ह. देशपांडे ...१२९
२ निराळे क्षण–अनंत आठले, बी. ए. १३०
३ जुगाऱ्याच्या भाग्या!
–द. चिं. सोमण
४ तुझें माझें–इंदिरा संत
५ अलीकडे–प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी. ...१३१
६ जीवन मोहरलें–द. अं. पुंडलीक ...
थोरांचा परिचय
१ वीर वामनराव जोशी
–प्रा. ना. कृ. दिवाणजी, एम्. ए. . १३२
२ नामदार रा. कृ. पाटील
–सौ. तारा शब्दे, बी. ए. ...१३७
प्रबंध
१ नाट्यकाव्य–प्रा. म. श्री. पंडित, एम्. ए. १४०
२ वा. म. जोशी यांच्या नाटिका
प्रा. कु. मनोरमा नातु, एम्. ए. ...१४३
३ वाङ्मयाचें मूल्यमापन
–प्रा. अ. ना. देशपांडे, एम्. ए. ...१४७
ललित गद्य
१ वदलू आणि राधा–सौ. लीला दुबे, एम्. ए. ...१५०
२ झुंज–अनु.–म. श्री. मंगरुळकर, बी. ए., एल् एल्. बी. ...१५७
३ मना केलेली गोष्ट!
–अनु.-पद्माकर निमदेव, बी. ए. ...१५९
विविध
१ इतिहासाचें पान–
बाजीरावास आलेलीं प्रेमपत्रें
–डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए. एल्. एल्. बी., डी. लिट्. ...१६२
२ साहित्यसमालोचन ...१६३
३ संपादकीय १६५
४ संघवार्ता–प्रा. ना. कृ. दिवाणजी, एम्. ए. ...१६७

★

सं घ वा र्ता

(मलपृष्ठ ३ वरून चालू)

तंत्रविषयक व इतिहासविषयक मार्गदर्शनासाठीं :

कादंबरी [निबंध]–वि. का. राजवाडे

मराठी कादंबरी, तंत्र व विकास–बापट व जोशी

अर्वाचिन मराठी साहित्य ('कादंबरी' वरील प्रकरण)—वि. ह. कुळकर्णी

प्रश्नपत्रिका ४ (अ) व्याकरण ५०

१. मराठी व्याकरणावरील निबंध— कृष्णशास्त्री चिपळूणकर,
२. शास्त्रीय मराठी व्याकरण–मो. के दामले,

(आ) वाङ्मयेतिहास ५०

१. महाराष्ट्र-सारस्वत, भाग १ व २–भावे,
२. मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास –वा. अ. भिडे
३. अर्वाचिन मराठी साहित्य–सं. नेने
४. अर्वाचिन मराठी काव्य-रा. श्री. जोग

प्रश्नपत्रिका ५ अ साहित्यशास्त्र व अलंकार ५०

१. अभिनव काव्यप्रकाश–रा. श्री. जोग
२. मराठीचें साहित्यशास्त्र – डॉ. मा. गो. देशमुख
३. अर्थालंकाराचें निरूपण–वि. वा. भिडे
४. सारस्वतसमीक्षा–य. रा. आगाशे

(आ) निबंध ५०

निबंधासाठीं विषय-वाङ्मयविषयक प्रचलित प्रश्न व आंदोलनें, साहित्यशास्त्रीय व्यापक सिद्धान्त, इ. संबंधाचे असतील. स्थूल दिग्दर्शनासाठी पुढील पुस्तकें निर्दिष्ट केलीं आहेत.

१. नवीं मूल्यें— पु. य. देशपांडे
२ वाङ्मय महात्मता–मर्ढेकर.
३. विचारसमीक्षा—वा. ना. देशपांडे
४. प्रा. वनहट्टींचें दर्यापूरचें भाषण
५. साहित्याचा ध्रुवतारा–वाळिंबे
६. पुरोगामी साहित्य–जावडेकर व फडके.

★

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ५ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

मे
१९४७

उबग

कविवर्य
गु. ह. देशपांडे
यांची 'उबग'
ही कविता
बाह्यत:
लौकिक
स्वरूपाची
वाटली, तथापि
ती अध्यात्म-
पर आहे.

विटला ग रंग तुझ्या
भरजरी पैठणीचा
चमचमेना विलोरी–
खडा तुझ्या मोरणीचा !

डोईवरल्या बिंदीचे
निखळले मोती दाणे
सैल बाजु बंद झाले
उबग का ऐसा बाणे !

फिटला ग साज सारा
मेंदी उडाली नखांची
मुखीं तांबुल रंगेना
कळा वेरंग ओठांची !

चोळी मिरादाणी तुझी
उसवली जागोजाग
कुणी लावियेली बाई !
जीवनाला तुझ्या आग !

कवणा ग परायाची
पडे तुजवरी दृष्ट !
अता देह शृंगाराचे
वृथा गमती का कष्ट !

झुरसां ग मोरावाणी
मनांतल्या मनांत तूं
हृदयींच्या हृदयांत
काय धरियेला हेतू !

स्थिरावला अंतरांत
कोण अलोकीचा राया
उपेक्षिली जयासाठी
तुवां सालंकृत काया !

—गुणवंत हनुमंत देशपांडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निराळे क्षण

● धारचे तरुण कवि रा. आठले यांची प्रस्तुत कविता अत्युत्तम आहे, अशी कुणीही रसिक देईल. ●

पाय तूझे लागले माझ्या घराला !

तेज ध्वान्तांतून आलें
कांहि झालें का निराळें ?
संभ्रमाला जागृतीचा ये उजाळा !

धन्य जों जों जाहलों मी
सांगण्या आलों तुला मी
तूंच येता, हर्ष हा सांगूं कुणाला ?

स्फूर्तिच्या रंगांमधूनी
पूर्तीच्या रेषा खुलूनी
भाव चित्रांतील माझ्या व्यक्त झाला !

भीति आता काय राहे ?
प्रीतिने ओसंडताहे
आज माझ्या जीवनाचा रिक्त प्याला !

काय गावें आज गाणें—
काय सांगावें मुखानें—
लोचनी हा बोलका होता जिव्हाळा ?

धूळ गेली—हेम आलें
शूळ गेलें—प्रेम आलें
एकही ना बोट बाकी नन्दनाला !

ना तयारी स्वागताची
दे क्षमा या वागण्याची
बावरे मी, पार नाही मत्सुखाला !

काल कांही ये निराळा—
वास तूझा या घराला—
देवता येई रिकाम्या मन्दिराला ! !

—अनन्त आठले

●

जुगाऱ्याच्या भाग्या !

● सत्कवि द. चिं. सोमण यांची शिखरीणी वृत्तांतील ही कविता जितकी शुद्ध, तितकीच चटका लावणाराहि आहे.

जुगाऱ्याच्या भाग्या ! असशील तसा ये अनिलसा
पळाचाही पाही अवसर नसे प्रार्थिन असा
जनांची ही गर्दी हिणवित मला येथ हसुनी
मलाही हासू दे कवळुनि धना अश्रु पुसुनी

गुन्हा माझा कां की फिरत असतां अंजन-तमीं
इथे ये आशेने किरण बघुनी धावतच मी
कुणी नाणीं घेती सहज कवड्या फेकुनि करी
गुन्हा का रंकाचा नकळत भुले मानस जरी

धनाच्या राशी तूं मिळवुनि दिल्या जों न बसलों
' किती आता नेतां ? ' अधन वदतां काय खुललों
घरीं येतां लक्ष्मी लगबग कुणी का परतवी
चढे धुंदी नेत्रीं सरसर परी कोण चढवी ?

सरे आता रात्री, सरत सगळें जें मज मिळे
अखेरीची दानें उलट पडण्या काय घडलें ?
न धाडी माघारीं कर पसरण्या निष्ठुर जनीं
सहाय्याने तूझ्या अजुन विजयी होइन रणीं

—पण लावी अंतीं शरमुनि रिता मी कुश कसा
जुगाराच्या भाग्या ! असशिल तसा ये अनिलसा !

—द. चिं. सोमण.

●

तुझें-माझें

● श्रीमति इंदिरा संत यांच्या या भावगीतांत शृंगार व वत्सल रस यांचा गोड संगम झाला आहे. ●

तुझें माझें हास्य
हासलों प्रेमात
बाळाच्या ओठांत
विकसलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुझे माझे बोल
प्रेमाची माधुरी
बाळाच्या हुंकारीं
उमटली

तुझी माझी दृष्टी
प्रेमळ नितांत
बाळाच्या डोळ्यांत
उमटली.

तुझें माझें प्रेम
गाढ अनुपम
बाळाच्या रूपानें
अवतरे.

तुझें माझें जिणें
येथून पुढलें
बाळास वाहिलें
सर्वपरी !

—इंदिरा सन्त

अलीकडे

● प्रा. रेगे यांची प्रेमकाव्यें विशिष्ट धर्तीची असतात. ही कविताहि तशीच आहे. ●

जरा बोलावितां, कामें
राहिलेलीं आठविसी.
साधें पहातांच दृष्टी
शिताफीने फिरविसी !

तेच मोजकेच शब्द
विनावितां ऐकविसी.
सारें समजून पुन्हा
वर वेड पांघरिसी !

आणि संभावितपणे
झोपसीही पाठमोरी.
अलीकडे आंगालाही
हात लावायची चोरी !

नेहमीच्याच गोष्टीचा
असा करिसी कंटाळा.
विरक्तीची ही कुठून
आली लहर गे तुला ?

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

जीवन मोहरलें !

● नागपूरचे रा. द. अ. पुंडलिक, बी. ए. यांनी आपली सर्व हयात सहकारी पतपेढ्यांच्या किचकट कामांत घालूनहि स्वतःची रसिकता जपून ठेवली, याची खूण म्हणजेच ही कविता होय. ●

श्रवुनी गोड गान, उजळे
अरुणछटा जिवि तरळे ॥ धृ ॥

मधुरस्वर हे — चंद्रकिरण जणु
भूवरि पाझरले

तृषीत वदनीं — अमृत गमलें
स्वर्गीचे झरले

दंव बिंदूंनी — गुलाब न्हाले
अश्रु सुखद गमले

मधुमासीं की — आम्र बहरले
कोकिल कुहु बोले

दिनरजनीचें — सुंदर मीलन
रंग गमे उधळे

× × ×

आशामय — भाव उमलले
जीवन मोहरलें

—द. अं. पुंडलिक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वीर वामनराव जोशी

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी,
एम्. ए.

● विदर्भात निर्भेळ स्वातंत्र्याचा अहर्निश पुरस्कार जर कुणी केला असेल, तर तो वीर वामनराव जोशी यांनीच केला. नाटककार व पत्रपंडित या दृष्टींनीहि वामनराव दादांनी थोर कार्य केलें आहे. त्यांचा हा परिचयलेख वि. सा. संघाचे सरचिटणीस नाट्यप्रेमी प्रा. दिवाणजी यांनी लिहिलेला आहे. ●

* * *

'स्वातंत्र्य हेंच ज्याचें, आजन्म ब्रीद साचें–'अशा कोटींत पडून प्रामाणिक स्वदेशाभिमानाची ज्योत आपल्या हृदयांत सतत तेवत ठेवणारे जे काय मोजके वीर्यशाली नेते विदर्भात आहेत, त्यांत वीर वामनराव जोशांनाच अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. वीर वामनराव म्हणजे आमच्या वऱ्हाडचे भूषण आहे! वीर वामनराव म्हणजे आम्हां विदर्भवासीयांच्या अन्तःकरणांतील स्फूर्तिदेवता आहे! 'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः' असें म्हणतात खरें; परन्तु आजन्म देशोद्धाराचा उद्योग करून लक्ष्मीकडे मात्र पाठ फिरविणारे आमचे वीर वामनराव त्या नियमाला अपवाद आहेत! वीर वामनरावांची आठवण झाली की,

जो लोककल्याण। साधावया जाण
घेई करीं प्राण। त्या सौख्य कैचें?
बहु कष्ट जीवास। दुष्टान्न उपवास
कारागृहीं वास। हे भोग त्याचे

या 'देवल मास्तरां'च्या पदाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. वऱ्हाडांत राजकारणाच्या आघाडीवर राहून या प्रांतांतील सर्व तरुणांच्या अन्तःकरणांत देशाभिमान प्रेरित आणि स्वातंत्र्योन्मुख स्फूर्ति निर्माण करणाऱ्या वीर वामनरावांनी मराठी रंगभूमीच्या भरभराटीच्या काळांत आपल्या अद्‌भुतरम्य नाटकांनीहि तिला दणाणून सोडलें होतें. वीर वामनरावांच्या सर्वच साहित्यांत त्यांचा जळजळीत देशाभिमान, निस्सीम स्वातंत्र्यप्रेम, प्रभावी वक्तृत्व व त्यांचें निर्भय, निर्भीड व वीरावेशपूर्ण अन्तःकरण यांचें स्पष्ट प्रतिबिम्ब पाहावयाला मिळतें. ते मला नेहमी म्हणतात, 'अरे, दिवाणजी, मला तुमचें तें साहित्य आणि तुमची ती कला मुळींच समजत नाही. तेव्हा कशाला मला तुमच्या साहित्यिकांत ओढतोस?' त्यांची साहित्यसेवा पाहून त्यांचें हें विधान मी स्वाभाविकपणेंच विनयाच्या सदरांत टाकतों, आणि हसून स्वस्थ बसतों, झालें! वामनरावदादा हे सर्वच बाबतींत 'वीर' आहेत, यांत मला मुळींच शंका वाटत नाही.

या 'वीरा'चा जन्म २१ मार्च १८८१ रोजीं झाला. दादांचें बालपण आणि शिक्षण अमरावतीलाच झालें आणि ते १८९९ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. विद्यार्थिदशेपासूनच त्यांना कविता रचण्याचा फार नाद होता. पण त्यांच्या कवितांचे विषय मात्र फक्त राजकीय स्वरूपाचे असत. तेव्हा कविता रचावयाच्या, त्या पाठ करावयाच्या व करवावयाच्या, असा त्यांचा क्रम चालू असे. विद्यार्थिदशेपासूनच दादांना वाचनाचें आणि वक्तृत्वाचें अत्यंत वेड. श्रोतृवर्गावर विलक्षण मोहिनी घालणारें त्यांचें प्रौढावस्थेंतील वक्तृत्व ऐकणाऱ्यांना त्यांनी विद्यार्थिदशेंत वक्तृत्वावर अनेक पारितोषकें मिळविलीं होतीं, ही गोष्ट मुळींच आश्चर्याची वाटणार नाही. तत्त्वज्ञान हा तर दादांचा अभ्यासाचा आवडता विषय आहे. विशेषतः गीतेवर त्यांचें अत्यंत प्रेम!

१८९९ मध्ये मॅट्रिक झाल्यानन्तर या 'वामना'ची कॉलेजमध्ये जावयाची इच्छा फार. बरोबरीचे लोक शिकून पदवीधर झालेले; तेव्हा आपणहि पदवीधर व्हावें, अशी दादांच्या मनांत अत्यंत उत्कट इच्छा होती. पण अखेर 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' हाच अनुभव

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना आला आणि ‘वकील’ होऊं इच्छिणाऱ्याला ‘शिक्षका’चाच पेशा पत्करावा लागला! अर्थात् त्या वेळीं त्यांना हा कदाचित् दैवदुर्विलासच वाटला असेल! पण त्यांना त्यांच्या हाताखालीं जिवंत शिक्षण घ्यावयाचा सहयोग लाभला, त्या विद्यार्थ्यांना आपलें सुदैव फळाला आलें, असेंच वाटलें असेल! सुरवातीला काशाबाई हायस्कूलमध्यें कांही काळ शिक्षकाचें काम केल्यानंतर ते शिवाजी–विद्यालय या राष्ट्रीय शाळेंत येऊन दाखल झाले. या शाळेंत क्रमिक पुस्तकांबरोबर सुतारकी, लोहारकी, ड्रॉइंग आणि कांही इतर हस्तव्यवसाय यांचेंहि शिक्षण देण्यांत येत असे. लो. ना. अणे, सदाशिवराव बल्लाळ, शामराव देशपांडे, दुराणी, पाळेकर, खापर्डे वगैरे कार्यकर्ते त्यांचे सहकारी होते. ही शाळा सरकारने अखेरीस १९०९ मध्ये बंद केली!

वीर वामनराव यांच्याजवळ अस्खलित व प्रभावी वक्तृत्वाची केवढी मोठी ईश्वरी देणगी आहे, याचा अनुभव विदर्भांतील जनतेला सन १९०५ पासूनच यावयाला सुरवात झाली. बंगालच्या फाळणीनंतर ‘स्वदेशी व बहिष्कार’ यांचा प्रचार करावयाचा, गांवोगांव सभा भरवावयाच्या व व्याख्यानें द्यावयाचीं असा त्यांनी सपाटा चालविला होता. त्या काळच्या विदर्भाच्या जागृतीचें, विदर्भांतील कॉंग्रेसच्या कार्याच्या प्रसाराचें पुष्कळसें श्रेय वीर वामनरावांना–विशेषत: त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वालाच आहे, हें कोणालाहि कबूल करावें लागेल. दादांचें वक्तृत्व म्हणजे पाण्याच्या प्रचंड लोंढ्याप्रमाणें आहे. तें हजारो श्रोत्यांना आपल्याबरोबर वाहवत नेल्याशिवाय राहावयाचें नाही!

रसनेप्रमाणें त्यांची लेखणीहि प्रभावशाली आहे. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या रसनेला आणि लेखणीलाहि प्रामाणिक जिव्हाळ्याचा पाया असल्यामुळे, किंबहुना आपल्या अंत:करणांत पारतंत्र्यविद्वेषाची व स्वातंत्र्यलालसेची जी ज्योत प्रज्वलित झाली होती, तिचा प्रकाश पाडून समाजाला मार्गदर्शन करण्यासाठीच वरील दोन्हीहि सद्गुणांचा त्यांनी साधनांदाखल उपयोग केला असल्यामुळे त्यांच्या साहित्यांत जिवंतपणा वाटतो—कृत्रिमता वाटत नाही. ते नेहमी म्हणतात कीं, ‘मीं साहित्यासाठी साहित्य निर्माण केलें नाहीं, तर पोटासाठी केलें. पैशांची अत्यंत अडचण. मला तर पैसा पाहिजे होता. लागलों नाटकें लिहायला, झालें!–’ या दादांच्या विधानांत पूर्णपणें असत्य नसलें, तरी अतिशयोक्ति मात्र खास आहे. त्यांच्या हातून जें साहित्य निर्माण झालें, तें यापेक्षा कांही तरी निराळ्या हेतूनें निर्माण झालें, आणि, तो हेतु हाच कीं, लोकजागृतीची व स्वदेशसेवेची जो तळमळ त्यांच्या अन्त:करणांत तुडुंब भरलेली होती, तिला त्यांना वाट करून द्यावयाची होती. कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान त्यांना जनतेला समजावून सांगावयाचें होतें. टिळक—गांधींचा महामंत्र त्यांना सर्वांना ऐकवावयाचा होता. आणि, तेंच त्यांनी केलें, हें त्यांचें साहित्य वरवर चाळणारा सुद्धा सांगूं शकेल.

वीर वामनराव जोशी यांचा प्रथितयश नाटककार म्हणून अखिल महाराष्ट्राला चांगलाच परिचय आहे. त्यांना लहानपणापासूनच हा ‘नाटकांचा नाद’ होता. शाळेंत ९ वींत असतांनाच त्यांनी ‘शिवदिग्जय’ नांवाचें शिवचरित्रावरील आपलें नाटक लिहून पूर्ण केलें होतें. भोंवताली हौशी विद्यार्थि जमवून तें त्यांनी बसविलेंहि होतें. पण अखेर तें रंगभूमीवर येऊं शकलें नाहीं. सन १९१० मध्ये त्यांनी ‘कर्णवध’ नांवाचें आणखी एक नाटक लिहिलें. पण वामनराव दादांच्याच शद्बांत सांगावयाचें, म्हणजे त्यांनी तें ‘अभ्यासा’ करिताच लिहिलें असल्यामुळें त्यांचें तें नाटकहि “मौनं सर्वार्थसाधनम्’ हाच मंत्र जपून स्वस्थ बसलें!

वीर वामनराव जोशी हे नाटककार म्हणून पुढे सरसावले व अखिल महाराष्ट्राच्या परिचयाचे झाले, ते त्यांच्या ‘राक्षसी महत्वाकांक्षा’ या नाटकानुळेच, कै. केशवराव भोसले यांनी या नाटकाचा सन

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९१३ मध्यें पाहिला प्रयोग मुंबईला करून दाखविला. हे नाटक लिहावयाला घेण्यापूर्वी वामनरावदादा हे मुंबईला होते. पैसे मिळविण्यासाठी कांही तरी केलें पाहिजे याच उद्देशाने ते नाट्यलेखनाला प्रवृत्त झाले. नाटक लिहावयाचें म्हणजे रंगभूमीचें 'तंत्र' (technique) अभ्यासावयाला पाहिजे. म्हणून त्यांनी नाटकें अभ्यासपूर्वक व नेमाने पाहावयाला सुरवात केली. त्याच वेळीं मुंबईला महंमदअली यांचीं उर्दू नाटकें करणारी नाटकमंडळी आपले चित्ताकर्षक प्रयोग मुंबईच्या रंगभूमीवर करून दाखवीत होती. ही नाटकमंडळी त्या वेळीं सुप्रसिद्ध उर्दू नाटककार व कवी आगाहश्र यांच्या 'खुबसुरतबला' या उर्दू नाटकाचा प्रयोग करीत होती. या नाटकाचा वीर वामनराव जोशी यांच्या मनावर फार परिणाम झाला. याच नाटकाची मध्यवर्ती कल्पना घेऊन त्यांनी आपलें 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हें सुप्रसिद्ध नाटक लिहिलें. हें नाटक प्रसिद्ध झालें आहे तेवढें अर्थातच रंगभूमीवर येऊं शकलें नाही. हें नाटक फार मोठें आहे. या नाट्यप्रयोगांत प्रेक्षकांना सर्वच कांही नवीन दृश्य दिसलें. या नाटकाचा प्रयोगहि अत्यंत परिणामकारक होत असे. नाटक मंडळ्या या नाटकाला 'कामधेनु' म्हणून संबोधित असत. 'सत्तावलें दास। करि जो त्रिलोकास। तोही अहंकार नमवीन पायीं' अशा टणत्काराने रंगभूमि दणाणून सोडणारी या नाटकांतील 'मदालसा' अद्यापिहि रसिकांच्या डोळ्यासमोरून गेली नसेल !

दादांच्या दुसऱ्या सुविख्यात 'रणदुंदुभि' या नाटकाचा प्रयोग 'बलवंत नाटक मंडळी'ने १९२७ सालीं करून दाखविला. तसेंच, त्यांचें 'धर्मसिंहासन' हें नाटक १९२९ सालीं 'नाट्य-कला-प्रसारक-मंडळी'-ने रंभूमीवर आणलें. त्या नंतर अमरावतीलाच रंगभूमीवर आलेलें त्यांचें 'झोटिंगपाच्छाई' हें नाटक 'आला आला प्राणि जन्मास आला। गेला गेला बापुडा व्यर्थ गेला' याच सदरांत पडलें! एका इंग्रजी कथानकाच्या आधारें लिहिलेल्या 'शीलसंन्यास' या नाटकाचें त्यांचें लेखन पूर्ण झालें आहे. हें त्यांचें नाटक अप्रसिद्धच आहे. या नाटकाचा प्रयोग बसविण्याचें 'समर्थ-नाटक-मंडळी'ने ठरविलेंहि होतें. तालमीहि सुरू झाल्या होत्या. पण—हा 'पण'च आडवा आला आणि तें नाटक रंगभूमीवर येऊं शकलें नाहीं !

वीर वामनराव जोशी यांच्या नाटकांचा अभ्यास केला असतां एक गोष्ट प्रथम लक्ष्यांत येईल कीं, रंगभूमीची किल्ली त्यांनी मोठ्या कौशल्याने आपल्या हातांत मिळवून ठेवली होती. नाटकाच्या प्रयोगावरच त्यांचें विशेष लक्ष्य असल्यामुळे त्यांच्या नाटकांतील कोणताहि प्रसंग रंगभूमीवर 'फेल' व्हावयाचा नाही ! याच्या जोडीला 'त्यांना जें सांगावयाचें होतें तें' त्यांनी अत्यंत परिणामकारक रीतीने आपल्या नाटकांतून सांगितलें असल्यामुळे त्यांच्या नाटकांत प्रतिपाद्य विषयासंबंधी जिव्हाळा प्रत्ययाला येतो. 'परवशता उरिं जोंवरी । खर शल्य सलें हें' असें असल्यामुळे जुलमी राजसत्तेविरुद्ध पुकारलेल्या स्वातंत्र्ययुद्धापायी सर्वस्वाचा नाश झाला तरी हरकत नाही, पण (विनायकांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे) 'ही इष्ट नव्हे परवशतेंत वहाली । नाचरंग दीप्त महालीं' हा संदेश जरी दादांनी आपल्या नाटकांतून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला असला, तरी ज्या काळीं त्यांनीं आपल्या नाटकाचे लेखन केलें, त्या काळीं या अशा गोष्टी उघडपणें बोलणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांना आडमार्गाने स्वातंत्र्याचा संदेश सर्वांना द्यावा लागला. या सर्व गोष्टी गृहीत धरून चालत असतांना सुद्धा त्यांच्या सर्वच नाटकांतून अनेक बाबतींत कलेची उपेक्षा होत गेली, हें मान्य करावेंच लागेल. नाट्य-तंत्राच्या दृष्टीने त्यांच्या नाटकांत, काढूनच दाखविले तर, दोष दाखावितां येणार नाहींत, असें नाही.

त्यांच्या सर्वच नाटकांत 'रणदुंदुभीं'त सौदामिनी म्हणते त्याप्रमाणें—

"नारिनरा अनिवार। अपार धरित चतुरता पौरुष गर्वा तुडवित पायीं। वृथा बला मिरवितां॥" याच विधानाची निरपवादपणें सत्यता पटते !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या बाबतींत शंका विचारली असतां ते म्हणाले, 'तुम्ही रडव्या स्त्रिया पाहतां. माझ्या नाटकांतील स्त्रियाप्रमाणे तुम्हांला स्त्रिया दिसत नाहीत, म्हणून तुम्हाला मदालसा, तेजस्विनी, कामलता, कल्पलता-वगैरे पात्रें अस्वाभाविक वाटतात. 'मर्दपणा' हा स्त्रियांतहि असूं शकतो आणि पुरुषांतहि असूं शकतो. मला वीर्यशाली स्त्रिया रंगवावयाच्या होत्या. त्याचप्रमाणे, स्त्रियांच्या हातूनच पुरुषांपेक्षा अधिक स्फूर्तिदानाचें व मार्गदर्शनाचें कार्य होऊं शकेल, असा माझा विश्वास होता. स्वातंत्र्यासाठी आपलें प्रेमच काय, प्राणहि पणाला लावणाऱ्या व भयंकर दिव्य करावयाला प्रवृत्त झालेल्या स्त्रिया आपल्या इतिहासांत कांहीं कमी नाहींत. मला अशाच स्फूर्तिदायक स्त्रियांचा आदर्श माझ्या नाटकांतून समाजाच्या दृष्टीपुढे ठेवावयाचा होता.' मला त्यांचें हें समर्थन–अर्थात्च–तितकेंसें पटलें नाहीं. स्त्रीस्वभावसुलभ भावना कायम राहून एखाद्या स्त्रीनें एखाद्या विशेष प्रसंगीं वीर्यशाली वृत्ति प्रगट करणें निराळें आणि केवळ लुगडें नेसून हवा तसा पुरुषी आडदांडपणा करणें निराळें! 'स्वातंत्र्यवीरालाच माझें पाणिग्रहण करण्याचा हक्क आहे' असं कंदर्पाला सांगणारी तेजस्विनी शेवटीं कंदर्पाच्या मृत्यूनंतर 'मुळमुळीत सौभाग्यापेक्षा ढळढळीत वैधव्य' स्वीकारायला तयार होते म्हणून बरें, नाहीं तर तेजस्विनी-सारख्या तोफेसमोर बिचाऱ्या कंदर्पाला रोज मृत्यु पत्करावा लागला असता! असो.

वीर वामनराव जोशी यांची थोडीफार फसवणूक झाली असली, तरी नाटकावर व पुस्तकप्रकाशना-वर त्यांना सुमारें २०००० रुपयांचें उत्पन्न झालें. त्यांपैकी एकट्या 'राक्षसी महत्वाकांक्षे'-ने त्यांना जवळ जवळ १०००० रुपये मिळवून दिले! पुढे मात्र 'रणदुंदुभि' सोडून उत्पन्नांची उतरणी भांजनी सुरु झाली. 'रणदुंदुभि' वर दोन्हीमिळून त्यांना सुमारें ७००० रुपये मिळाले.

कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी, नरसिंह चिंतामण केळकर वगैरे जुन्या पिढींतील सर्व नाटक-कारांचा व दादांचा अत्यंत घनिष्ट संबंध आला. त्यांतल्यात्यांत गडकऱ्यांची नाटकें–त्यांतील सर्व दोष मान्य करुनहि–त्यांना लिखाणाच्या दृष्टीने फार आवडतात.* श्रीपाद कृष्णांचा व त्यांचा फारच निकटचा संबंध होता. दादांच्या नाटकां-तील पद्यांच्या अनेक चाली श्रीपाद कृष्णांनीच

* या ठिकाणी रा. प्र. सी. गडकरी यांनी 'कै. राम गणेश गडकरी यांच्या आठवणी' हें जें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, त्यांतील एका आठवणीचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. फार मजेदार आठवण आहे ती!

वीर वामनरावांना घाबरणारे गडकरी

कोणताहि लेखक स्वभावाने कसा असेल, याची कल्पना गडकरी त्याच्या लेखनावरून करीत असत. श्री. वामनराव जोशी यांचें 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हें नाटक गडकऱ्यांनी वाचलें आणि आपल्या मनाशीं ठरविलें कीं, श्री. जोशी यांना मुळींच अंतःकरण नसलें पाहिजे! राक्षस वृत्तीच्या माणसाशिवाय इतकें भयंकर नाटक कोणालाहि लिहितां येणार नाही. नाटक वाचतांना सर्वांगावर रोमांच थरारलेच पाहिजेत. एकदा गडकऱ्यांची व जोश्यांची रस्त्यांत अचानक भेट होण्याचा योग आला होता; परंतु गडकऱ्यांनीं मोठ्या शिताफीनें तो घडूं दिला नाहीं! त्यानंतर पुढें दोन तीन वर्षांनी श्री. वामनराव जोशी पुण्यास आले होते, त्या वेळीं त्यांना समजलें कीं गडकरी आजारी आहेत. एके दिवशीं एका स्नेह्याला बरोबर घेऊन, श्री. जोशी गडकऱ्यांच्या घरीं त्यांची तब्येत कशी काय आहे तें पाहण्याकरिता गेले.

या वेळीं गडकरी अंगांत ताप असल्यामुळें पांघरूण अंगावर घेऊन निजले होते. वामनरावांनी गडकऱ्यांच्या अंगाला हात लावून किती ताप आहे तो पाहिला. इतक्यांत गडकऱ्यांनीं डोळे उघडले. श्री. वामनराव जोशांना समोर पाहतांच गडकऱ्यांना मोठा अचंबा वाटला. गडकरी बिछान्यावर उठून बसूं लागतांच, जोशांनी त्यांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना सुचविलेल्या आहेत. 'परवशता पाश दैवें' या दादांच्या सुप्रसिद्ध पदाची चाल श्रीपाद कृष्णांचीच आहे. वीर वामनरावांसंबंधीं श्रीपाद कृष्णांच्या अंतःकरणांत अत्यंत प्रेम होतें. सन १९२० च्या 'महाराष्ट्र–नाट्य–संमेलना'चें वीर वामनरावांना जें अध्यक्षपद मिळालें, तें श्रीपाद कृष्णांच्या शिफारशीमुळे व कळकळीच्या आग्रहामुळेच !

व्यावहारिक दृष्ट्या नाटकांनी दादांना थोडाफार हात दिला, पण त्यांच्या 'स्वतंत्र हिंदुस्थान' ने त्यांना पूर्णपणें डबघाईस आणलें. सन १९२२ मध्ये कैदेंतून सुटका झाल्यानंतर विदर्भांत 'असहकार व अहिंसा' यांचा प्रचार करणारें एखादें वृत्तपत्र असावें अशी दादांची फार इच्छा होती. त्याचवेळीं–म्हणजेच १९२३ मध्ये डॉ. वऱ्हाडपांडे यांनी वीर वामनरावांची मदत जमेस धरूनच अमरावतीला 'स्वतंत्र हिंदुस्थान' हें पत्र प्रसिद्ध करावयाला सुरवात केली. त्या वेळीं या पत्राचे दादा हे 'मार्गदर्शक' होते. एकदोन अंक कसेबसे निघाले; पण पुढे पैशाची अतिशय अडचण जाणवूं लागली. वीर वामनरावांच्या मनांत अमरावतीला एक वृत्तपत्र चालवावें, असें होतेंच, व चित्रशाळा प्रेसचे रा. वासुदेवराव जोशी यांनी त्यांना सर्व मदत करावयाचे कबूलहि केलें होतें. पण डॉ. वऱ्हाडपांडे यांनी फारच गडबड केली ! असो. पण या गडबडीचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. अखेर सन १९२४ मध्ये वीर वामनराव हे मार्गदर्शकाचे 'संपादक' झाले. त्यांनी थोडाफार पैसा मिळविला, वासुदेवराव जोशांची मदत घेतली, प्रेस मिळविला, कुटुंबांतील सर्व माणसें स्वतः कामाला लावलीं व 'स्वतंत्र हिंदुस्थान' प्रसिद्ध होऊं लागलें, पण हें पत्र एकंदरीने त्यांना लाभदायक झालें नाही ! हें पत्र निघालें, तेव्हा त्यांच्या मातोश्रींचा मृत्यु झाला. पुढे थोड्या थोड्या अंतराने 'स्वतंत्र हिंदुस्थान' ची व्यवस्थापकीय जबाबदारी शिरावर घेणारा बंधु आणि अखेर त्याच्यामागे व्यवस्थापक म्हणून एक वर्षभरच काम करून बरोबरचा मुलगाहि वारला ! पोटाचा धंदा कांहींच नाही. घरांत हालहि भयंकर ! कित्येक वेळा तर थंड्या फराळावरहि कुटुंबांतील सर्व माणसांना आपली क्षुधा 'थंड' करण्याचा प्रसंग येत असे ! असें जरी होतें तरी पण वीर वामनरावांनी 'समोहं सुखदुःखेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' या वृत्तीने 'स्वतंत्र हिंदुस्थान' चें काम सन १९३० पर्यंत सर्व अडचणींना तोंड देऊन चालूच ठेवलें. अखेर १९३० मध्ये जेंव्हा त्यांच्यावर पुनः आपल्या दयाळु सरकारची 'कृपा' झाली, तेव्हा हें पत्र अर्थातच बन्द पडलें–कायमचेंच बन्द पडलें !

हें पत्र प्रथम डेमी आकारांत निघत असे. पुढे तें रॉयल आकारांत निघूं लागलें. पानांची संख्याहि चारापासून आठापर्यंत गेली. हें पत्र राजकारणालाच वाहिलेलें होतें हें लिहावयाला नकोच. सर्व मजकूर दादा स्वतःच लिहीत असत. या पत्रांतून असहकार व अहिंसा यांचा त्यांनी उत्तम प्रकारें प्रचार केला. दादांच्या अहिंसावादांत त्यांच्या प्रवृत्तीनुरूप थोडा फरक होता, हें न सांगतांच स्पष्ट होण्यासारखें आहे. टिळकांसंबंधी वीर वामनरावांच्या अन्तःकरणांत अत्यंत आदर होता. लोकमान्यांनन्तर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा व कॉंग्रेसच्या धोरणाचा त्यांनी कसोशीने प्रचार केला, ही गोष्ट खरी आहे; परंतु लोकमान्यांत व महात्मा गांधींत त्यांनी

निजावयास सांगितलें. जोशांचे डोळे पाण्याने भरून आले ! गडकऱ्यांच्या पाठीवर हात फिरवीत असतां जोशी म्हणाले, 'गडकरी, तुम्ही धीर सोडूं नका. परमेश्वर आम्हा सर्वांसाठी तुम्हांला या दुखण्यांतून बरें करील ! औषधोपचारांत हयगय करूं नका.'

हे प्रेमळ बोल ऐकतांच गडकऱ्यांचा कंठ गहिवरानें दाटून आला ! गडकरी म्हणाले, 'जोशी, तुमचं अन्तःकरण कोमल आहे. तुमच्या त्या भयंकर नाटकामुळे, तुमच्याबद्दल मी आपला गैरसमज करून घेतला होता !'

हें ऐकून जोशी हसले व तेथून आपल्या बिऱ्हाडीं गेले. ('रा. ग. गडकरी यांच्या आठवणी' पा. ५७–५८)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांहीच फरक केला नाही. लोकमान्यांचेंच कार्य महात्माजींनी पुढे चालविलें, असा त्यांचा प्रामाणिक समज होता व आहेहि. याच मताचा त्यांनी "स्वतंत्र हिंदुस्थान" मधून प्रभावी प्रचार केला.

वीर वामनराव जोश्यांनी आता जवळ जवळ 'सत्तरी' गाठलीच आहे. एवढ्या वयांत सुद्धा त्यांच्यांतील उत्साह व तेज अद्यापी कायम आहे. त्यांच्या वाणींत अद्यापि पुरेपूर सामर्थ्य आहे. विदर्भ साहित्य संमेलनांतील त्यांचें दमदार भाषण त्यांच्या उत्कृष्ट, प्रभावी व रसाळ वक्तृत्वाची साक्ष म्हणून सर्वांच्याच स्मरणांत राहील. आम्हां वैदर्भियांच्या सुदैवानें दादांना 'दीर्घायुरारोग्य' लाभून आपल्या प्रमाणेच त्यांना विदर्भांतील प्रत्येक तरुण "वीर" बनविण्याच्या कार्यांत सुयश प्राप्त होवो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

• • •

नामदार रा. कृ. पाटील

सौ. तारा शब्दे, बी. ए.

● चालू वर्षापासून 'युगवाणी'त साहित्याखेरीज इतर विषयांसहि स्थान देण्यांत येत आहे, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. या नवीन धोरणास अनुसरून प्रचलित राजकारण व त्यांत झळकणाऱ्या व्यक्ति यांच्याविषयीं 'युगवाणी'त मधूनमधून लेख देण्यांत येणार आहेत. प्रस्तुत लेख हा त्यांपैकींच होय. या लेखांत अन्नमंत्री ना. पाटील यांचा नागपूरच्या सौ. ताराबाई शब्दे यांनी सुंदर परिचय करून दिला. ●

★ ★ ★

गेल्या कायदेमंडळाच्या निवडणुकी लढविण्याचें कॉंग्रेसनें जेव्हा ठरविलें, तेव्हा लोकांच्या उत्साहास सीमा उरली नाही! या निवडणुकी कॉंग्रेस निश्चित जिंकणार, प्रांताप्रांतांतून कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें प्रस्थापित होणार व महायुद्धामुळे अन्नवस्त्रासारख्या रोजच्या गरजांबाबत होणारी दैना इतःपर कायमची लोप पावणार, अशा सुखस्वप्नांत सर्वसामान्य जनता गुंग झाली होती.

जनतेच्या या आशा आकांक्षा आपल्या प्रांतांत जर कुणी अल्प प्रमाणांत मूर्त स्वरूपांत आणल्या असतील, तर त्या ना. रामराव कृष्णराव पाटील यांनीच होत. आपल्या प्रांतांतील कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ होण्यापूर्वी लोकांना कसली ददात नव्हती? धान्य नाही, साखऱ्या नाही, मातीचें तेल नाही—अशी सारीच नकारघंटा वाजत होती! विशेषतः खेड्यापाड्यांतील जनतेच्या फजितीस तर पारावारच नव्हता! शहरांतून या वस्तू अंशतः का होईना, पण मिळत असत, परंतु खेडुतांस मात्र कैक महीने—नव्हे, वर्षं—तांदूळ व साखऱ्या यांचें दर्शनहि घडलें नव्हतें! ग्रामवासीयांना या वस्तु अल्प प्रमाणांत का होईना, उपलब्ध व्हाव्या, म्हणून जर कोणी कळकळीनें खटपट केली असेल, तर ती ना. पाटील यांनीच होय

तसें म्हटलें, तर ना. पाटील यांच्याबद्दल लोकांस पूर्वीपासून कुतूहल वाटत होतें व आपल्या अडचणी दूर करणारा हाच एक कार्यकर्ता होय, अशी त्यांस केव्हांपासून आशा वाटत होती. ही आशा वाटण्याचें कारण हें होय की, पाटील यांनी १९४३ च्या एप्रीलमध्ये जिल्हाधिकाऱ्याच्या आपल्या मोठ्या पदाचा राजीनामा दिला होता! पाटील हे आय. सी. एस्. होऊन सरकारी नोकरींत शिरले होते खरे; पण त्यांचें चित्त तींत कधीच रममाण झालें नव्हतें. सद्सद्विवेकबुद्धीस सोडून वागण्याचा प्रसंग येतांच सरकारी नोकरीची सोनेरी बेडी ते ताडकन तोडून मोकळे झाले! त्यांच्या या तेजस्वितेमुळे जनतेचें लक्ष्य त्याजकडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केव्हांच वेधलें गेलें होतें. म्हणूनच काँग्रेस मंत्रि-मंडळ स्थापन झाल्यास त्यांत पाटलांना अवश्य स्थान असावयास पाहिजे आणि लोकांच्या अड-चणी दूर करण्यास तेच मनापासून झटतील, अशा गोष्टी निवडणुकीच्या नौबती वाजूं लाग-ण्यापूर्वीच बोलल्या जात होत्या !

ना. पाटील यांचा जन्म १३ डिसेंबर १९०७ रोजीं चांदा जिल्ह्यांतील वरोडा गांवच्या पाटील घराण्यांत झाला. ते जातीने ब्राह्मण आहेत. त्यांचे जन्मदाते वडील रा. देवराव पाटील हे होत व ते आज वरोडा येथे वास्तव्य करीत आहेत. पण ना. पाटील हे आपले चुलते कै. कृष्णराव पाटील यांस दत्तक गेले आहेत. पाटलांचे शिक्षण नागपूर व बनारस येथे झालें. ते अत्यंत तीव्र बुद्धीचे असल्याने वयाच्या १३ व्या वर्षीच मॅट्रिक पास झाले. पुढे बी. एस् सी. व एल् एल्. बी. झाल्यानंतर इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षे-साठी ते विलायतेस गेले आणि ही परीक्षा व बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते हिंदुस्थानांत परत आले. सरकारी नोकरींत त्यांची नेमणूक १९३१ सालीं झाली.

पाटलांचा देशाभिमान विद्यार्थीदशेपासून अत्यंत तीव्र होता. लंडन येथे असतां त्यांची एक मौजेची गंमत घडली; तेथील कांही सहाध्यायांशीं बोलत असतां पाटलांनी विदेशी खेळांपेक्षा देशी खेळांची मातबरी प्रतिपादन केली होती. तेव्हां त्यांना बनविण्यासाठी एका खट्याळ मित्राने देशी खेळांची राष्ट्रांतरीय चढाओढ होणार असल्याचे खोटेंच सांगितलें ! सरळ मनाच्या पाटलांस तें खरेंच वाटलें व दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या वर्तमानपत्रांत ते ही वार्ता शोधूं लागतांच त्यांना त्यांत कांहीच आढळलें नाही ! अर्थात् त्यांच्या मित्रांना यामुळे त्यांस हसावयास चांगलें निमित्त सापडलें !

पाटलांचा हाच देशाभिमान नोकरींतहि उफा-ळून वर आला. वरिष्ठांशीं तर त्यांचे नेहमीच खटके उडत; पण नोकरी सोडण्यास तात्कालिक कारण घडलें तें असें : जिल्हाधिकाऱ्याला स्वतःच्या बंगल्यावर इंग्रजांचा 'युनियन जॅक' लावण्याचा मान असे. पण पाटलांनी आपल्या बंगल्यावर हा झेंडा केव्हाच लावला नाही ! यापूर्वी जिल्हा-धिकाऱ्याने आपल्या बंगल्यावर 'युनियन जॅक' लावणें हा नियम वैकल्पिक होता, पण आता तो नियम निरपवाद करण्यांत आला ! अर्थात् शिस्तप्रिय पाटलांना या नियमापुढे मान वाकवावी लागली. परंतु इतःपर अशी मानहानी नको, म्हणून ते नोकरीचा राजीनामा देऊन मोकळे झाले व वरोडा येथे जाऊन राहूं लागले !

यानंतर पाटील हे सार्वजनिक कार्यांत भाग घेऊं लागले. १९३७ पासूनच ते खादी वापरीत होते. अर्थात् त्यांच्या मनाचा कल प्रथमपासूनच काँग्रेसकडे झुकत होता. राजीनाम्यानंतर म. गांधी यांच्याशीं त्यांचा परिचय घडून आला व ते त्यांचे एकनिष्ठ अनुयायी झाले. ते कस्तुरबा-स्मारक-फंडाचे चिटणीस म्हणून नेमले गेले. गेल्या निवडणुकींत काँग्रेसचे उमेदवार म्हणून पाटील हे घेतले गेले व निवडणुकीच्या चक्र-व्युहांतून सहीसलामत पार पडून ते मंत्रिपदावर आरूढ झाले.

मंत्रिपदावर येतांच पाटलांपुढे धान्यवसुलीचा प्रश्न प्रथम उभा राहिला ! आपल्या प्रांतांत एकहि माणूस उपाशी मरूं नये, अशी पाटलांची मनापासून इच्छा आहे. पण ही इच्छा सफल होण्यास त्यांच्याशीं सर्वांनी सहकार्य करावयास पाहिजे. मोठमोठ्या शेतकऱ्यांनी त्यांना स्वतःजवळील धान्य विनबोभाट द्यावयास पाहिजे. आणि व्यापाऱ्यांनी काळा बाजार न करतां योग्य भावाने तें धान्य लोकांना विकलें पाहिजे. बरें, लोकांनीहि वाट्याप्रमाणें मिळणारें धान्य समाधानाने घेऊन अन्नधान्याचा प्रश्न सुकरतेने सोडवावयास मदत केली पाहिजे.

अन्नधान्याच्या खात्यांतील सरकारी अधि-कारी व व्यापारी हे आपसांत संगनमत करून काळा बाजार करण्यास मदत देतात, अशी लोकांची सकारण म्हणा, अगर अकारण म्हणा, तक्रार असते. तात्पर्य, ना. पाटलांचा संबंध मोठमोठे जमीनदार, व्यापारी, सरकारी अधिकारी व जनता या सर्वांशींच येतो; आणि, या सर्वांस सारखेंच खूष करणें हें प्रत्यक्ष ईश्वरासहि

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

शक्य नाहीं, हें कोणीहि कबूल करील! परंतु आपण स्वतः अत्यंत चोखपणाने सर्वांचें हित साधण्याचा प्रयत्न करीत आहों, अशी पाटलांची मनोमन खात्री असल्याने ते कोणाच्या खुपी-नाराजीकडे लक्ष्य देत नाहींत व आपलें काम नेटाने करीत राहतात! पाटलांचा न्यायनिष्ठुर स्वभाव जगजाहीर असल्यामुळें कोणीहि शेट–सावकार अगर सरकारी अधिकारी त्यांचा गैरवाजवी फायदा घेण्यास बिलकूल धजत नाहींत! थोरा-मोठ्यांच्या मोटारी त्यांच्या घराचा रस्ताच विसरल्या, असें म्हटल्यास ती खाचित अतिशयोक्ति होणार नाहीं! अन्न खात्यांतील सरकारी अधिकारी तर पाटलांना चांगलेंच वचकून असतात. पाटलांच्या या स्वभाव वैशिष्ठ्यामुळें काळ्या बाजारास चटावलेला वर्ग त्यांच्या नांवाने बोटें मोडीत असला पाहिजे, हें कोणासहि न सांगतांच समजण्याजोगें आहे.

पाटील हे स्वभावाने साधे व अबोल आहेत, पण तत्वाच्या बाबतींत ते तितकेच कणखरहि आहेत. समाधानाची गोष्ट ही की, कणखरपणा-बरोबर त्यांच्यांत तिखटपणा किंवा कुत्सितपणा बिलकूल आलेला नाही याचें प्रत्यंतर त्यांच्या कायदेमंडळांतील भाषणावरून दिसून येतें. आपलें म्हणणें आरडाओरड न करतां किंवा कोणासहि कोपरखळ्या न मारतां मांडावयाचें अशी पाटलांच्या भाषणांची तऱ्हा आहे. यामुळे त्यांनी आपल्या भाषणांत व कामकाजांत एक प्रकारची उच्च पातळी आणलेली आहे.

ना. पाटील हे अंतःकरणाचे मृदु आहेत, पण ते अवास्तव भावनावश नाहींत दुसऱ्याच्या भावनांना मात्र ते कदापि दुखविणार नाहींत. त्यांना आपलें कुठे चुकतें कीं काय हें अंतर्मुखपणाने पाहण्याची चांगली संवय आहे व म्हणून विरोधकांच्या विरोधांतून आपणास काय घेतां येईल, हेंच ते नेहमी पाहत असतात. त्यांचा साधेपणा तर कमालीचा आहे. इतर मंत्र्यांनी नवीन मोटारी घेतल्या पण “ आहे ही मोटार मला पुरेशी आहे! ”— असें म्हणून त्यांनी नवीन मोटार घेण्याचें साफ नाकारलें!

पाटलांचा जातिभेद व वर्गभेद यांवर मुळीच विश्वास नाही. क्रांतीपेक्षां उत्क्रांतीकडे त्यांची अधिक प्रवृत्ति आहे. राजकारण व समाजकारण मानवतेवरच अधिष्ठित झालें पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. तत्वतः ते समाजवादाचे पुरस्कर्ते आहेत, असें म्हणण्यास हरकत नाही.

ना. पाटील दिसण्यांत, वागण्यांत व आहारातहि सात्विक व सौम्य आहेत. चहा व साखर ते मुळींच घेत नाहींत. कमी तिखट असा शाकाहारी आहार त्यांना आवडतो. दूध व फळें यांचे ते भोक्ते आहेत.

ना. पाटील अबोल असूनहि एकलकोंडे नाहींत त्यांचें घर सदा भरलेलें असतें. नातेवाईक व स्नेही यांबद्दल त्यांना आस्था आहे. त्यांना दोन मुली असून त्यांच्या पत्नी सौ. सुभद्राबाई पाटील याहि त्यांच्यासारख्याच शांत व सुस्वभावी आहेत. कामाच्या राम-रगाड्यांत क्षणाचीहि फुरसद नसणाऱ्या पाटलांचा सारा घरगुती पसारा त्यांनाच संभाळावा लागतो. पाटील हे धार्मिक वृत्तीचे आहेत. सायंप्रार्थनेवर त्यांचा विश्वास आहे. हिंदु-तत्त्वज्ञानाबद्दल त्यांना आदर असून ते धार्मिक ग्रंथांचें वाचन सवडीप्रमाणें करतात. कांही फुटकळ निबंध सोडल्यास त्यांनी लेखन केलेलें नाही.

असे आदर्श मंत्रि आपल्या प्रांताला मिळालेले आहेत. त्यांच्या गुणांचें चीज होऊन लोकांनाहि त्यांच्या गुणांचा फायदा मिळावा, ही एकच त्यांच्या मित्रांची इच्छा आहे!

• • •

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाट्यकाव्य.

प्रा. भवानीशंकर श्री. पंडित, एम्. ए.

● प्रस्तुत लेखांत प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'नाट्यकाव्य' या वाङ्मय प्रकाराची उद्बोधक चर्चा केली आहे. ●

* * *

काव्याच्या क्षेत्रांत नाट्यकाव्य हें जशी जनसाधारणाच्या मनाची पकड घेतें, तशी ती इतर काव्यें घेत नाहीत. याचें कारण नाट्यकाव्याचा भोक्ता हा एकाच वेळीं प्रेक्षक, वाचक व श्रोता या तीन भूमिका वठवूं शकतो. तुलसीरामायणांतलें आणि लावण्यापोवाड्यांतलें 'काव्य' साक्षर वाचक मनाने आकलन करीत असले, तरी हजारो निरक्षर तें डोळ्यांनी पाहत असल्याचें व कानांनी ऐकत असल्याचें दृश्य आजदेखील दुर्मिळ नाही. तुलसीरामायणाच्या पुण्याईवर आज मितीलाहि खेड्यापाड्यांतून 'रामलीला' आपलें कार्य करीत आहेत; आणि, पारतंत्र्यामुळे पोवाडे नष्ट झाले असले, तरी लावण्या-'तमाशां'च्या द्वारें गोरगरिबांचें मनोरंजन करीत आहेत. जुन्या वळणाच्या खानदानी घराण्यांतून 'गौळणी'चे गोड सूर कानीं पडतांच अजून देखील बायाबापड्यांचा आनंद गगनांत मावेनासा होतो. याचें सर्व श्रेय त्या त्या काव्यांतील 'नाट्या' ला आहे, हें उघड आहे. 'काव्येषु नाटकं रम्यम्' हा सिद्धान्त कांहीं नवा नाही. परंतु 'नाट्यकाव्य' हा शब्द मात्र नवीन आहे. Dramatic-Poetry या इंग्रजी शब्दाचा तो पर्याय आहे. या प्रकारच्या काव्याचा आपल्याकडे आजपर्यंत खरोखरच गोंधळ होता. पण आता याप्रकारचें काव्य 'गोंधळ' सोडून 'मासिकां'तून समोर येत असल्यामुळे येथे त्याच्याविषयीं थोडासा विचार करणें प्राप्त आहे.

नाट्यकाव्याच्या वास्तविक स्वरूपाची व स्वयंभूपणाची स्पष्ट अशी कल्पना करून देणें दिसतें तितकें सोपें नाही. नाट्यकाव्य हा वस्तुनिष्ठ काव्याचा एक विभाग आहे. मात्र त्याचा 'नाटक' या स्वतंत्र वाङ्मयप्रकाराशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाही. नाटक हें रंगभूमीवर प्रयोग व्हावा या हेतूने रचलेलें असतें. नाट्यकाव्य हें केवळ वाचण्यांत यावें, या दृष्टीने लिहिलेलें असतें. मात्र या लेखनाची पद्धति नाट्यात्मक असते. या पद्धतीचा अवलंब करतांना कवि हा आपल्या 'पात्रा'च्या अगर 'पात्रां'च्या अंतरंगांत प्रवेश करतो आणि त्यांच्या विचारांविकारांना तोंड फोडतो. मात्र या पद्धतींत भावगीतांतील पद्धतीप्रमाणें अथवा कथा काव्यांतील पद्धतीप्रमाणें तो आत्मनिवेदन अथवा कथाकथन करीत नाही. तो दुसऱ्यांच्या अंतरंगांत शिरतो खरा. पण त्यांच्या विचारविकारांपासून तो अलिप्त राहतो.

पुष्कळदां कथाकाव्यांत बहुधा संवादाच्या निमित्ताने नाट्यात्मक स्वरूपाचा कमीअधिक भाग अंतर्भूत झालेला असतो. क्वचित् कथाकाव्याचें स्वरूप आत्मचरित्रपर असल्यास 'प्रथम पुरुष' बोलत असतो. त्यामुळे तें नाट्यकाव्य असल्याचा भास होतो. परंतु नाट्यकाव्यांत कवीचें सारें लक्ष 'पात्रां'वर केंद्रित होत असल्यामुळे आणि त्यांच्याच अनुरोधाने तो काव्यविषय रंगवत असल्यामुळे ज्या काव्यांत पात्रांना प्रामुख्य असेल, त्याच काव्यांना 'नाट्यकाव्य' म्हणून लेखण्यांत यावें, हें सर्वथा उचित होय.

'नाट्यकाव्याचा हा विशेष लक्षांत घेऊन त्याचे वर्ग पाडल्यास त्यांत 'नाट्यगीता' ला आद्यस्थान द्यावें लागेल. मात्र हें वर्गीकरण तर्कशीं तंतोतंत जुळतें असेलच व त्यांत कमी जास्ती फरक होऊं शकणार नाही, अशी हमी घेतां येत नाही. या वर्गीकरणांत तर्काच्या सुसंगततेपेक्षा विवेचनाच्या सोयीचें महत्त्व अधिक आहे. नाट्यगीत हें दिसावयास भावगीतासारखेंच व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचें दिसतें. परंतु वस्तुतः त्यांत कवि हा दुसऱ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एखाद्या व्यक्तीच्या वृत्तीशीं अथवा अनुभूतीशीं चोरून मारून तदाकार होत असतो आणि त्या व्यक्तीचे विचार व भाव व्यक्त करण्याचा बहाणा करीत असतो. भावगीतांत कवि हा स्वतःचेच भाव व्यक्त करीत असतो. आपले भाव आपणच बोलून दाखवणें हें सोपें आहे. परंतु दुसऱ्यांच्या भावनांना वाचा फोडणें हें प्रयासाचें आहे. पुन्हा स्वतःचे भाव हे स्वतःपुरते आकुंचित व मर्यादित असतात आणि ते स्वतःबरोबर विलयाला जातात. परंतु नाट्यगीतांतले भाव त्या मानानें एकंदरीत विशाल व व्यापक असतात आणि चिरंतन टिकतात. शिवाय स्त्रीपुरुषांचे मनोव्यापार हे इतके विविध, विचित्र व विपुल आहेत कीं काव्यासाठीं विषय म्हणून कधींच त्यांचा तुटवडा पडणें शक्य नाहीं. नाट्यगीतासाठीं आपल्या व परक्यांच्या इतिहासांत पुष्कळ प्रसंग आहेत. कोर्टकचेऱ्यांच्या खटल्यांतहि वेधक प्रसंग सापडतात. कारण सत्य हें पुष्कळदां कल्पितापेक्षा अद्‌भुत असते. तेव्हा भावगीत लिहिण्यापेक्षा नाट्यगीत लिहिणें हें अधिक कलाकुशलतेचें आहे, हें कबूल करणें भाग आहे. भावगीत आणि नाट्यगीत यांच्यांतला सूक्ष्मभेद चेस्टर्टन् यांनी वादळाच्या रूपकानें स्पष्ट केला आहे. भावगीतासंबंधीं ते म्हणतात,—

"It is like a thunderstorm, which, doubling and redoubling its flash and roar, ends in the zenith with the brightest flash and lonlest clang of thunder". आणि नाट्यगीताविषयीं ते म्हणतात कीं,— 'It is when the storm of emotion reaches, like the first, its climax, but does not end with it. The lyric passion dies slowly away from the zenith to the horizon, and ends in quietude and beauty, attended by soft colour and gentle sounds; like the thunderstorm which faints with the sunset and gathers its clouds to be adorned with beauty'. इंग्रजी वाङ्मयांत असलीं नाट्यगीतें रचण्याबद्दल ब्राउनिंगची ख्याति आहे. किंबहुना, त्याच्यामुळेच नाट्यकाव्य हा प्रकार रूढ झाला, असें मानण्यास हरकत नाहीं. आपल्या स्वतःच्या नाट्यगीतासंबंधीं ब्राउनिंगने पुढील उद्‌गार काढले आहेत,— 'Though often lyric in expression, always dramatic in principle, and so many utterances of so many imaginary persons, not mine'.

अशा तऱ्हेचीं नाट्यगीतें करण्याकरिता कवि हा मनकवडा हवा. त्याला दुसऱ्याचें मनोगत ओळखतां आलें पाहिजे व तें त्या माणसाच्या शब्दांत बोलून दाखवतां आलें पाहिजे. त्या माणसाला अनुरूप अशी भाषा योजल्यास नाट्यगीत परिणामकारक होतें. यशवंतांची 'मैतरणी विगि विगि चाल' ही कविता यास प्रमाण आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कवीला त्या दुसऱ्या व्यक्तीचें सोंग हुबेहुब वठवतां आलें पाहिजे, या सोंग संपादणांत कवीने स्वतःचें व्यक्तित्व अबाधित राखलें पाहिजे. हें विशेष आहे. असलें काव्य तत्काळ समजावें याकरिता आधीं त्यांतील 'पात्रांसंबंधीं व 'प्रसंगा'-संबंधी तात्पुरतें 'सूतोवाच' हवें. शिवाय तें म्हणतांना थोडेफार हातवारे व मुद्राभिनय हवा, म्हणजे त्याचा परिणाम अचूक होतो. आपल्याकडे तांब्यांनी अशा प्रकारचीं पुष्कळ गीतें लिहिलीं आहेत. या दृष्टीनें त्यांचीं 'कारे! जासी मज त्यजुनी?', 'डोळे हे जुलमि गडे!', 'तूं हुबेहूब साउली त्याच मूर्तिची', 'बघुनि तया मज होय कसेसें', इत्यादि गीतें वाचनीय आहेत. वानगीदाखल आणखी कांहीं कविता हव्या असल्यास माधवानुजांची 'फुट् फुट् दगडा फुट् फुट् फुट्', दत्तांची 'बा! नीज गडे', गोविंदाग्रजांची 'गुणि बाळ असा', बाल कवींचीं 'आई! आई! तांदोबा मदला देई' या कवितांचा उल्लेख करतां येईल. बालकवींची 'तारकांचें गाणें' ही कविता याच प्रकारची आहे. परंतु तिच्यांत कवीने तारकांवर चेतनेचा आरोप केला आहे, हें विशेष आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसरा वर्ग नाट्यकथांचा करावा लागेल. मात्र या कथा काव्यकथा हव्यात. या प्रकाराचे नमुने म्हणून वा. ना. देशपांड्यांचें 'कपटवेष', हूडांचें 'काव्यसंन्यास' व कान्तांचें 'अग्निपथ' हीं नाट्यकथाकाव्यें पुढे करतां येतील. कधी कधी या कथा किंवा हीं काव्यें संवादात्मक असतात. केशवसुतांचीं 'मुळामुठेच्या तीरावर' आणि 'समृद्धि व प्रीति', तांब्यांचीं 'राजकन्या व तिची दासी' आणि 'आता गाडि फू दादाशीं', दत्तांचीं 'यत्रयत्र हरिणीदृशांक्रम: तत्रतत्र मदनस्य विक्रम:', गिरीशांचीं 'कोण तूं? कुठून येसि?' मायदेवांची 'चला सुटी झाली' आणि काळेल्यांची 'तुज म्हणूं कुणासारखीं?' हीं काव्यें संवादात्मक आहेत. मात्र या संवादांत कथांचा समावेश नसल्यामुळे हीं काव्यें प्रदीर्घ नाहीत. क्वचित् या नाट्यकाव्यांत पात्राचें भाषण, कवीचें कथन व त्याने केलेलें अंतरांतर वर्णन यांचा समन्वय दृष्टीस पडतो. या विधानाचें प्रत्यंतर गोविंदाग्रजांच्या 'राजहंस माझा निजला!' या कवितेवरून पटेल. या कवितेंत आरंभीं 'दुर्दैवनगाच्या शिखरीं-नव-विधवा दुःखी-आई' हें कवीचें कथन आहे, पुढे 'करूं नका गलबला अगदी' हें 'आई' चें भाषण आहे आणि शेवटीं 'मग मातापुत्रांवरि त्या तरु गाळिति कोमल पानें' हें कवीने केलेलें वर्णन आहे. टिळकांच्या 'केवढें क्रौर्य हें' या कवितेंत देखील आरंभीं व अंतीं कवीचें कथन आहे आणि मध्ये 'पक्षिणी' चें भाषण आहे. नाटक या वाङ्मय प्रकाराच्या प्रयोगांत पक्षीण रंगभूमीवर येणें व बोलणें असंभवनीय आहे. परंतु नाट्यकाव्याच्या प्रांतांत तिचा प्रवेश व भाषण शक्य आहे. Bee कवींची 'बंडवाला' ही कविता अशीच कवीचें कथन व पात्रांचें भाषण यांनी युक्त आहे. कधीकधी नाट्यकाव्य पत्रात्मक असतें. रेंदाळकरांचें 'शूर्पणखेचें प्रेमपत्र, आणि माधवानुजांचीं 'शकुंतला व तारा यांचीं प्रणयपत्रें' हीं काव्यें या प्रकाराचे मासले होत.

नाट्यकथांसंबंधीं एक गोष्ट विशेष दिसते, ती ही कीं, त्यांत कवि हा आपल्या सृजनशक्तीने भिन्न भिन्न भूमिका निर्माण करीत असतो. त्या भूमिकांत तो रंग भरतो, त्यांना निरनिराळे ढंग शिकवितो आणि हळुवारपणाने त्यांचें अंतरंग प्रकट करतो.

तिसरा वर्ग नाट्यछटांचा करावा लागेल. Monologue या इंग्रजी शब्दाचा 'नाट्यछटा' हा मराठी पर्याय आहे. नाट्यछटेचें स्वरूप दुहेरी आहे. तिचें स्वरूप कांहीं अशीं व्यक्तिनिष्ठ असल्यामुळे ती नाट्यगीतासारखी आहे आणि कांहीं अंशीं तें कथनात्मक असल्यामुळे ती नाट्यकथेसारखी आहे. या द्विविधतमुळे तिचा वर्ग वेगळा कल्पिणें अनिवार्य आहे. नाट्यछटेंत कवि बहुधा एकाच पात्राकडून सारा वृत्तान्त स्वगतपर वदवीत असतो. संस्कृत नाटकांचा 'भाण' हा प्रकार असा एकपात्री आहे. पण 'भाण' हें नाटक आहे, तर 'नाट्यछटा' हें काव्य आहे. भाणांतल्या पात्राचा उपयोग फक्त 'आकाशवाणी' सारखा संविधानकाचा निखळलेला दुवा सांधण्यासाठी होतो. पण 'नाट्यछटें'तले पात्र स्वतःचें स्वभावचित्र स्वतः रेखाटत असतें. तिच्यांत त्या पात्राची मनःस्थिति व आन्तरहेतु यांच्या आविष्करणाला प्राधान्य आहे. अर्थात् विवक्षित व्यक्तीचें मन, त्या मनाचें विश्लेषण, त्यांतले विकार–विचार आणि त्यांच्या बाबतचा युक्तिवाद या साऱ्यांचा सूक्ष्म व सखोल अभ्यास असल्याशिवाय नाट्यछटा लिहितां येणें शक्य नाही. आपल्याकडे दिवाकरांनी नाट्यछटा लिहिल्या आहेत. त्यांतल्या कांहीं उत्तम आहेत. पण ब्राउनिंगच्या 'मोनोलॉगची' त्या बरोबरी करूं शकत नाहीत. शिवाय त्या पूर्णतया गद्यांत आहेत. तेव्हा पद्यस्वरूप काव्यांत त्यांचा समावेश करावा किंवा नाही, हा प्रश्नच आहे. ब्राउनिंगचे 'मोनोलॉग' हि जवळ जवळ गद्यांत किंवा गद्याच्या वळणावर आहेत. खरोखर, विचार केला तर 'नाट्यछटें'त कवीचें व्यक्तित्व प्रतिबिंबित व्हावयास नको. पण ब्राउनिंगच्या पुष्कळशा 'मोनोलॉग'मध्ये त्याच्या व्यक्तित्वाची पडछाया पडली आहे. नाट्यछटेंत पुष्कळदा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तात्त्विक मीमांसा असते आणि ती रुकाराने अथवा नकाराने व्यक्त होत असते. मात्र तिचें स्वरूप अध्यात्मिक असलें तरी विशेष गूढ अगर गहन नसतें. उलट बहुतकरून तें व्यावहारिकच असतें. आपल्याकडे अशा तऱ्हेच्या नाट्यछटा अजून निर्माण व्हावयाच्या आहेत. उद्याचे कवि काव्याचा हा ओसाड प्रान्त आपल्या पराक्रमाने समृद्ध व संपन्न करतील अशी आशा आहे.

● ● ●

वा. म. जोशी यांच्या नायिका

प्रा. कु. मनोरमा नातु, एम्. ए.

● ● ● अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजमधील मराठीच्या प्राध्यापिका कु. नातु यांनी या लेखामध्ये कै. वामन मल्हार जोशी यांच्या कादंबऱ्यांतील नायिकांविषयीं उद्‌बोधक चर्चा केली आहे. ● ● ●

★ ★ ★

वामनरावांच्या नायिकांचीं चित्रें केवळ आकर्षक व मनोहर नसून समाजाला बिकट प्रश्न घालणारीं व त्यायोगें विचारप्रवण करणारीं आहेत. कारण त्यांच्या कादंबऱ्यांचा उगम व्यक्तींच्या जीवनांतून—त्यांच्या हृदयांत उडणाऱ्या कल्लोळांतून—झाला आहे. स्त्री—विषयक प्रश्नांचा ध्यास घेतल्यामुळे वामनरावांचा हृदय-सागर हेलावला व त्यांच्या डोक्यांत विचारांचें काहूर माजलें. या मानसिक वेदनेंतून निर्माण झालेली त्यांची उच्च कला स्त्री—वर्गाला कशी भूषणभूत झाली आहे, याचा प्रस्तुत लेखांत विचार करावयाचा असल्यामुळे साहित्याच्या बैठकीवर त्या नायिकांचा स्वभाव-परिपोष न दाखवतां जीवनाच्या बैठकीवर समाजशास्त्रास धरून या नायिकांच्या द्वारें जोशी यांनीं केलेली स्त्री—जीवन विषयक मीमांसा सांगणें एवढाच या विषयाचा माझा अभिप्रेत अर्थ आहे.

समाजकारणी पुरुषांनी समाजाचे दोन वेगवेगळे गट पाडून भावनेची बाजू स्त्रियांकडे व विचाराचा मक्ता पुरुषांकडे दिलेला आहे. पण जोशांची भूमिका जीवनाभिमुख असल्यामुळे त्यांना ही विभागणी पटणें शक्य नव्हतें. विचार व भावना यांनी युक्त अशा मुली रोज त्यांच्या समोर वावरत असतांना ही विचारसरणी त्यांना कशी पटणार ? म्हणून स्त्री—जीवनाचें मोठ्या बारकाईने निरीक्षण करून त्यांनी आपला सर्व अभ्यास कादंबऱ्यांच्या द्वारें समाजासमोर मांडला व स्त्रियांच्या जीवनाला नैसर्गिक वळण लावलें.

स्त्रियांची अगदी बाल्यावस्था जरी घेतली, तरी आपणांस असें दिसून येतें कीं बाणाने वर्णन केल्याप्रमाणें 'अंकादेकं संचरंती वीणेव'—एवढेंच कौतुक फार तर तिच्या वाट्यास येतें. कारण यापेक्षा कांही जास्त कतृत्व तिच्यांत संभवू शकेल, असें कोणालाहि वाटलें नाही ! परंतु मुलींना देखील योग्य तें वातावरण दिल्यास त्यांना वैचारिक भूमिका असू शकेल व त्याहि उत्तम नागरिक स्त्रिया होऊं शकतील, या विश्वासाने वामनरावांनी आपल्या सर्व नायिकांना सुसंस्कृत, प्रेमळ व विचारी अशा कौटुंबिक वातावरणांत वाढविलें.

त्या काळावर नजर टाकल्यास आपणास असें दिसतें कीं, व्यक्तिविकास व व्यक्तिस्वातंत्र्य यांवर आधारलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीच्या सान्निध्याने लोकांच्या आचार-विचारांत अभूतपूर्व संक्रमण घडलें होतें. आतापर्यंत स्त्रियांकडे बघण्याची दृष्टि बरीच दूषित, पक्षपाती व अन्यायी असल्यामुळे ती सुधारण्याकरता स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह—इत्यादि अनेक सुधारणांचा तत्कालीन समाजसुधारकांनी पुरस्कार केला होता. पण त्यामळे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहाजिकच लोकांच्या समोर अनेकविध सामाजिक कूट प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नांच्या अंतरंगांत शिरून व्यक्ति व समाज यांच्या चारित्र्यावर या अनेकविध सुधारणांचा काय परिणाम होतो, याचा बारकाईने व मार्मिकतेने विचार करून जोशी यांनी आपल्या कादंबऱ्यांतून तो कसा दिग्दर्शित केला आहे, हें त्यांच्या कादंबऱ्यांचा आढावा घेऊन पाहूं.

स्त्रीशिक्षणाचा प्रश्न चर्चेचा विषय म्हणून घरीं-दारीं झाला असतांना 'रागिणी 'चा अवतार झाला. स्त्रीशिक्षणानें स्त्रियांच्या क्षेत्रांत मोठीच क्रांति झाल्यासारखें वाटून लोकांत जे नानाविध विचारप्रवाह निर्माण झाले, त्यांचे निनाद या कादंबरींत ऐकूं येतात. शिक्षण हें फुलाच्या सुवासाप्रमाणें रम्य नाही, तर अग्नीच्या तेजाप्रमाणे केवळ आदरणीय आहे, अशी कांहीं लोकांची वृत्ति दाखवून स्त्रीशिक्षणामुळे निर्माण होणाऱ्या समान हक्कांचा गोंधळ 'अधिकार-नगरी ' च्या वर्णनांत दाखविला तसेंच, सुशिक्षित स्त्रियांतहि असूयावृत्ति किती प्रबळ असते, हें एका स्वतंत्र खंडासच असूयाखंड हें नांव देऊन त्यांनी ध्वनित केलें आहे. प्रामुख्याने या कादंबरींत विचारप्रधान उत्तरा व भावनाप्रधान रागिणी दाखवून विचार व भावना हे गुण परस्परांस पूरक आहेत व त्यांचा सुंदर संयोग म्हणजेच खरें व्यक्तित्व होय व तेंच स्त्रीत असावें, असें प्रतिपादिलें आहे.

विवाहविषयक स्त्रीधर्म सांगण्याकरता जोशी यांनी एक छोटेखानी स्वतंत्र कादंबरीच लिहिली व ती म्हणजे ' आश्रम हरिणी ' होय. तींत पत्नी ही आपल्या मालकाची केवळ उपभोगार्थ निर्मिलेली अशी अस्वतंत्र वस्तु नाही, तर तिलाहि स्वतंत्र अस्तित्व आहे, म्हणून तिच्या व्यक्तिगत विचारांचा व भावनांचा विचार करणें हें पतीचें खरें कर्तव्य आहे, असें दाखविलें आहे.

आपल्यामागे आपल्या माणसांनी आपल्याकरता जन्मभर दु:खी रहावें, अशी इच्छा करणें अयोग्य आहे. पुनर्विवाह हा गौणपक्ष व आपद्धर्म नसून सत्पक्ष व सद्धर्म आहे–इत्यादि अनेक चिंतनीय विचार पूर्णप्रज्ञ ऋषींच्या द्वारें मांडलेले आहेत. एकाच स्त्रीचें दोघांवरील प्रेम वर्णितांनाहि त्यांनी इंद्रियदमनाचेंच महत्त्व वर्णिलें आहे. या कादंबरींतील उच्चतम व निरपेक्ष प्रेमाच्या स्पष्टीकरणानें, नि:पक्षपाती दृष्टीने व पवित्र वातावरणाने, आपलें अंत:करण हेलावून जातें व या ज्ञानमय, आनंदमय व कल्याणमय अशा तपोवनांतून बाहेर पडतांना आपली पावलें जड होतात !

यानंतर पांच वर्षांनी 'नलिनी ' या कादंबरींत अविचारी प्रौढ कुमारिकांच्या प्रश्नास जोशी यांनी हात घातला. ध्येयहीन व संस्कृतिविन्मुख शिक्षणानें होणारी स्त्रियांची दिशाभूल यांत दाखविलेली आहे. तसेंच, जगांत काय काय नवलाच्या गोष्टी आहेत, —मग त्या चांगल्या असोत की वाईट असोत— त्या जाणण्याची उत्सुकता व साहसेच्छा बाळगल्यामुळे त्यांचे दुष्परिणाम अविचारी प्रौढ कुमारी कमला हिला जन्मभर कसे भोगावे लागले हें दाखविलें आहे. आणि त्यावरून स्त्रियांचें पाऊल यत्किंचितहि वाकडें पडलें, किंवा पडल्यासारखें दिसलें, तरी त्या मेलेल्या बऱ्या अशी पुरुषवर्गाची व त्याहिपेक्षा जास्त स्त्रीवर्गाची— भावना असते व म्हणून अब्रू वाचविण्याकरता खरोखरीचें पातक करणेंहि त्यांना कित्येकदां भाग पडते, हेंहि वामनरावांनी दाखविलें आहे. पुरुष मात्र पाप करूं शकतो, व सांगूं शकतो, एवढेंच नव्हे, तर तो पापी ठरल्यानंतरहि त्याच्या इतर गुणांचें समाज कौतुक करूं शकतो. पण स्त्री मात्र समाजाच्या आदरास व प्रेमास सर्वस्वी मुकते ! स्त्री व पुरुष यांच्या नीतिमत्तेकडे पाहतांना अशी भिन्न दृष्टि ठेवणें वामनरावांनी अत्यंत आक्षेपार्ह ठरविलें आहे. सहसा निश्चित मत न देणाऱ्या वामनरावांनी या प्रश्नाच्या बाबतींत मात्र आपलें असें निश्चित मत दिलें आहे की, स्त्रियांच्या निर्दोषतेवर अधिक करडी नजर ठेवण्यांत न्यायापेक्षा कर्मा अधिक स्वातंत्र्याचा, प्रबलतेचा व हेव्याचाच अंश अधिक आहे ! तेव्हा दोघांच्याहि प्रथमापराधाकडे निष्ठुरतेनें पाहूं नये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे ते सांगतात. माझ्यामते नितिमत्तेच्या बाबतींत स्त्रियांना अशी सवलत देऊन त्यांना खालच्या पायरीवर ओढण्यापेक्षा पुरुषांना दिलेल्या सर्रास परवान्यास आळा घालून त्यांनाच वरच्या पायरीवर आणल्यास समाजाचें अधिक हित होईल !

यानंतर दहा वर्षांतच स्त्रियांच्या वाढत्या कर्तृत्वाच्या अनुभवाने स्त्रियांविषयींचा वामनरावांचा विश्वास इतका वाढला की, त्यांनी देव म्हणजे काय, अशा अत्यंत गहन प्रश्नास हात घालून त्याची मार्मिक छाननी करण्याइतकी श्रेष्ठ विवेचक शक्ति असलेली सुशीला निर्माण केली. आपल्या समाजांत देवाच्या बाबतींत जर सर्वांत जास्त भोळ्या व खुळ्या कल्पना कोणाच्या असतील, तर त्या स्त्रीच्या, अशीच सर्वांची समजूत आहे. पण वामनरावांनी हीच स्त्री तिला योग्य शिक्षण दिल्यास किती विचारप्रवण होऊं शकते, हें सुशिलेच्या द्वारें दाखविलें आहे. वास्तविक अशा या उच्चतम प्रश्नाचें विवेचन त्यांनी एखाद्या तपस्व्याच्या किंवा यतीच्या द्वारें करावयाचें व 'रागिणींत' व आश्रम हरिणींत त्यांनी प्रियब्रह्मस्वान्ही व पूर्णप्रज्ञ ऋषी यांच्या कडूनच विवाह विषयक प्रश्न हाताळले आहेत पण याहिपेक्षा कठीण प्रश्न सोडविण्याची सर्वश्रेष्ठ बुद्धिमत्ता स्त्रियांत असूं शकते हें दाखविण्या करताच सुशिलेकडून याचा उहापोह त्यांनी केला असावा असें वाटतें. तसेंच, स्त्रिया या अत्यंत संकुचित वृत्तीच्या व स्वार्थी असतात, असें लोकांचें जें सर्वसाधारण मत होतें, त्याला धक्का देण्याकरताच की काय, वामनरावांनी आपल्या सुशीलेकडून एक मुलींची शाळा चालविली व नवयुगीन विश्व-कुटुंब-संस्था काढवून स्त्रिया चार भिंतीच्या किती पलीकडे जाऊं शकतात, हे दाखविलें !

काफने सुशीलेशी सलगी केल्या बाबत झालेल्या चर्चेतून तिने मोठ्या मार्मिकपणें दाखविलें आहे कीं, पुरुषांच्या प्रेमांत मालकीची भावना असते, पण स्त्रियांना सत्य हवें आहे, सत्ता नको. तसेंच विवाहसंस्था ही राज्य संस्थेप्रमाणे मानवनिर्मित असल्यामुळे कालमानाप्रमाणे तिच्यांत फेरबदल करणें अवश्य आहे इत्यादि अनेक क्रांतिकारक विचार सुशीला मोठ्या निर्भिडपणें आपल्यासमोर मांडते.

या नंतर पांच वर्षांनी निर्मिलेल्या 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतील सरलेंत व इतक्या क्रांतिकारक व पुरुषी सुशीलेंत महदंतर दिसून येतें. सुशिक्षित व सुसंस्कृत अशी सरला आपल्या पतीच्या ध्येयाशीं पूर्णपणे समरस होऊन त्याच्या मागोमाग जाण्यांतच धन्यता मानते व खरें सात्त्विक समाधान मिळवितें. तिचें अतोल कर्तृत्व आपणास मोहनी घालते. या ध्येयवादी जोडप्यावर येणाऱ्या अनेक भीषण व हृदयद्रावक प्रसंगांची परिस्फुटता जोशी यांनी अत्यंत हळुवार हाताने केली आहे. ती वाचतांना आर्य स्त्री म्हणजे काय याचें चित्र क्षणोक्षणीं डोळ्यांपुढे उभें राहतें व तें पाहतांना डोळे जरी वरचेवर पाण्याने भरून येतात, तरी तें स्पष्ट दिसतें. पण या स्त्री बरोबरच समान हक्कांची आत्यंतिक जाणीव असलेली स्त्रीहि त्यांना दिसली व कलासक्त इंदूच्या रूपाने त्यांनी ती रंगविली. पुरुष व स्त्री विचाराने व कर्तृत्वाने सारखींच आहेत, तर त्यांचे हक्कहि समान पाहिजेत व या तत्त्वास अनुसरूनच इंदु विनायकरावांना तिच्या कलेच्या ध्येयासंबंधीं मोठा मार्मिक प्रश्न विचारते की, ध्येयामागे लागून ते जर सरलेच्या भलत्या संशयाकडे दुर्लक्ष करूं शकतात, तर तिने कलेच्या मागे लागून तसेंच कां करूं नये ? आत्म्याची कलाविषयक जी भूक आहे, ती लोकापवादादाखल किंवा पतीला उगाच संशय येतो म्हणून दाबून टाकावी की काय ? (अर्थात् बिंदुमाधव व ती दोघेंहि चांगलीं आहेत, हें गृहीत धरूनच तिने असा प्रश्न विचारला आहे.) यावर निर्णय देतांना स्त्रियांचें जें ध्येय म्हणून जोशी यांनी सांगितलें आहे तें खुद्द तिच्याच बाबतींत खरें नाही. तिचें ध्येय कला होतें. जोशी यांनी संसार हें तिचें क्षेत्र आहे, असा शब्द वापरणें अवश्य होतें. संसार हेंच जर तिचें एकमेव ध्येय मानलें, तर सुरवातीपासून रचत आणलेल्या स्त्री पुरुष-समानतेचा पायाच ढासळतो ! कारण, संसार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सोडलेल्या पुरुषांनी राष्ट्राचा संसार उभा केला, ही भाषा जरी गोड वाटत असली, तरी त्यांनी स्वतःचा संसार सोडला, दुर्लक्षिला, ही गोष्ट उरतेच ! स्त्रीला जर संसारांत डांबून टाकावयाचें, तर पुरुषालाहि डांबून टाकलेंच पाहिजे ! त्याला जर त्याच्या इच्छेनुरूप राष्ट्रसंसार करतां येतो, तर स्त्रीलाहि ती मुभा असावी. संसार याचा अर्थच स्त्री व पुरुष यांचें एकत्रित जीवन असा असल्यामुळे त्यांच्यांत भेद करणें इष्ट वाटत नाहीं. पण अशाच तऱ्हेचा विरोध वामनरावांनी जेव्हा उत्तरा व सुशीला यांच्या-सारख्या ध्येयवादी, आदर्श व स्वयंप्रकाशित स्त्रिया दाखविल्यानंतर सरला व काशी यांच्या-सारख्या पतीच्या ध्येयाशीं समरस पावलेल्या, पण स्वतंत्र मार्ग न चोखाळणाऱ्या स्त्रिया रंगविल्या, तेव्हा वाटतो. स्त्रीविषयक विचारांत त्यांची ही प्रगति नसून परागती असावी, असें वाटतें ! परंतु ज्या सांस्कृतिक वातावरणांत वामनराव प्रगल्भ झाले, त्या पौर्वात्य संस्कृतीचा विचार केल्यास आपण जिला प्रगति म्हटली तो फक्त प्रगतीचा एक टप्पा ठरतो. आणि, जिला आपण परागती म्हणून चुकून म्हणतों, तीच वास्तविक प्रगत स्थिति दिसते ! सुशिला व इंदु हीं पात्रें रंगवितांना पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा वामनरावांच्या मनावर अधिक दिसतो. पाश्चिमात्यांच्या कल्पनेनुसार स्त्री व पुरुष स्पर्धेच्या भूमिकेवर असतात व तीच स्पर्धा इंदूंत व सुशिलेंत दिसतें. स्त्रियांवर होत असलेला अन्याय हें त्या स्पर्धेचें मूळ आहे. परंतु स्पर्धेनें स्पर्धा वाढते ! 'Competition is a vicious circle' असें जें म्हटलें आहे, तें अगदी खरें आहे. या 'दुष्ट वर्तुळांतून बाहेर निघावयाचें असल्यास पाश्चिमात्य कल्पना आपल्यास मदतगार होऊं शकत नाहींत, तर पौर्वात्य संस्कृतीकडेच आपणास वळावें लागतें आपल्या संस्कृतीस संसारस्पर्धा मान्य नसून सहकार मान्य आहे. पतिपत्नी हीं एकमेकांस पूरक आहेत. म्हणून पतीच्या ध्येयाशीं समरसता पावल्याने व त्याच्या मागोमाग गेल्याने सरलेला आपलें स्वातंत्र्य गमावलें, असें न वाटतां, सहकार्य करण्याचें स्वातंत्र्य मिळालें, असेंच वाटलें; व सहकार्य करण्याचें हें स्वातंत्र्य काशी ढवळलो न मिळाल्यामुळेंच की काय, वामनरावांना तिची मृत्यूशीं गांठ घालून द्यावी लागली !

यावरून वामनरावांना विचार करावयास लावणारी पाश्चिमात्य संस्कृति आहे पण समाधान देणारी मात्र पौर्वात्य संस्कृति आहे, असें दिसतें. या दोन्हींचें मिश्रण त्यांच्या लिखाणांत आढळतें. हीच अवस्था त्यांच्या वास्तववादी व ध्येयवादी नायिकांच्या चित्रणांत दिसतें. पाश्चिमात्य बुद्धीने सुचलेला वावदूक ध्येयवाद उत्तरेंत दिसतो, तर पौर्वात्य बुद्धीने सुचविलेला समाधानकारक वास्तववाद आपल्याला सरलेंत दिसतो. वास्तवता व ध्येय यांचा समन्वय साधून त्या समन्वयाने व्यवहार करणारी नायिका जर त्यांनी निर्माण केली असती, तर स्त्रीजीवन–विषयक प्रश्नांवर त्यांनी उभारलेल्या मंदिरावर कळस चढविल्या-सारखें झालें असतें ! पण संदेहवादी वामनरावांना जीवनाशीं प्रतारणा करणें शक्य नसल्यामुळे त्यांनी तें काम 'कोऽपि समानधर्मा'– निर्माण होईल, या आशेवर तसेंच ठेवलें असावें !

शालेय
बाल
ललित
आणि
निबंध
वाङ्मय प्रसिद्ध करणारी
वऱ्हाड मध्यप्रांतांतील
एकमेव संस्था
ठाकूर आणि कंपनी लि.
अमरावती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकंदरींत आतापर्यंतच्या विवेचनावरून आपणांस असें दिसतें की, जोशी यांच्या नायिका स्वयंप्रकाशित, विचारप्रधान व कर्तृत्वप्रधान आहेत. 'Men must work and women must weep'— हें जगांतील एक कटु सत्य आहे, असें म्हणतात. पण जोशी यांच्या नायिकांनी त्याला आपल्या कर्तृत्वाने पूर्ण हरताळ फासला व स्त्रियांचें जीवन हें किती उच्च कोटींतील असूं शकतें हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें.

स्त्रिया या अबला नाहींत, तर अबलत्वाच्या भ्रामक कल्पनेमुळे भस्माच्छादित अग्नीप्रमाणे त्यांची स्थिति झाली आहे. हें पटल दूर भिरकावून देऊन 'राखेचीं दिपळें म्हणून दिसती जीं तीं तुम्हा आजला ! भस्मसात् करणार नाहीत अशी तुम्ही हमी द्याल का ?'— असा प्रश्न त्या नायिका मोठ्या आत्मविश्वासाने पुरुषवर्गास विचारीत आहेत, असें वाटतें. स्त्रियांच्या ठिकाणीं एवढें सामर्थ्य निर्माण करणाऱ्या वामनरावांचा महाराष्ट्र सदैव ऋणी राहील.

• • •

वाङ्मयाचें मूल्यमापन

प्रा. अच्युत नारायण देशपांडे
एम्. ए.

● नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक अ. ना. देशपांडे यांनी टीकाशास्त्राबाबत 'नूतन सिद्धान्त निरूपण' करण्यासाठी प्रस्तुत लेखमाला लिहावयास घेतली असून तिचा हा पहिला हप्ता आहे.

प्रा. अ. ना. देशपांडे हे 'युगवाणी'चे संपादक वा. ना. देशपांडे यांचे बंधू आहेत. काय ? अशी पृच्छा नेहमी करण्यांत येते. तिचें उत्तर असें की, ते संपादकांचे बंधू नसले, तथापि बंधुतुल्य मित्र आहेत. ●

* * *

जीर्ण प्रवृत्तींचा परामर्ष

१.

वाङ्मयाच्या न्याय्य आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापनाचा एक नवा निकष मला मांडावयाचा आहे. त्यापूर्वी साहित्यशास्त्रांतील कांहीं परंपरागत जीर्ण प्रवृत्तींचें थोडेसें दिग्दर्शन करून त्यांचें अप्रस्तुत्व आणि अयथार्थत्व पटवून दिलें, तर तें नव्या निकषाच्या सर्वांगीण रहस्योद्घाटनाला पोषक होईल, असें वाटतें. म्हणून प्रथम त्या जीर्ण प्रवृत्तींचाच थोडक्यांत परामर्ष घेतों.

साहित्यशास्त्रीय विचारसृष्टींतील पहिली महत्त्वाची जीर्ण प्रवृत्ति म्हणजे प्राचीन साहित्यविवेचकांनी करून ठेवलेल्या कांहीं वाङ्मयविषयक नियमांना 'वेदवाक्य' कल्पून त्यांच्या अनुरोधाने कोणत्याहि वाङ्मयीन कलाकृतींचें परीक्षण करणें ही होय. पाश्चिमात्य काय आणि पौरस्त्य काय, दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांतील साहित्यक्षेत्रांत या प्रवृत्तीचा अनेक शतकांपासून विलक्षण वरचष्मा असलेला आढळून येतो ! तिकडे अरिस्टॉटल हा तर साऱ्या युरोपीय साहित्यशास्त्रज्ञांचें आद्य आराध्यदैवत होऊन बसला आहे ! "Aristotle is our emperor, the perpetual dictator of all the fine arts" (Scaliger)— "अरिस्टॉटल हा साऱ्या साहित्यकारांचा व कलाकारांचा अनभिषिक्त राजा आहे. त्याने घालून दिलेले ललितकलाविषयक नियम पूर्णपणें स्थल-काल-भेदातीत आहेत"—असें म्हणण्यापर्यंत या प्रवृत्तीला वळी पडलेल्या वाङ्मयसमालोचकांची मजल गेलेली आहे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'Poetics' च्या निर्मितीला आता जवळजवळ दोन अडीच हजार वर्षें होत आलीं तरी आजहि एखाद्या शोकान्तिकेचें (Tragedy) परीक्षण करावयाचें असल्यास 'कॅथर्सिस' च्या उपपत्तीला मुजरा करण्याचा आणि तिची पसंती मिळविण्याचा प्रयत्न करण्याचा मोह अगदी आधुनिक टिकाकाराला सुद्धा आवरत नाही! त्याच्यावेळीं उपलब्ध असलेल्या ॲस्किलिस, सोफोक्लस आणि युरिपिडिज–या श्रेष्ठ नाटककारांच्या शोकगंभीर नाट्यकृतींचें प्रथम पद्धतशीर निरीक्षण करून त्यावरून अरिस्टॉटलने शोकान्तिकेच्या स्वरूपासंबन्धीं जीं अनुमानें काढलीं, तीं म्हणजे 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' किंवा 'उष्णतेनें पदार्थ प्रसरण पावतात' या भौतिक शास्त्रांतील सत्यांप्रमाणे शाश्वत आणि अबाधित आहेत, असे मानण्याची प्रवृत्ति त्यानंतरच्या टीकाकारांत सारखी बळावत चालली आणि होरेस या रोमन टीकाकाराच्या लिखाणांत तर तिने पराकोटीची सीमा गाठली! अरिस्टॉटल हा सच्चा स्वतंत्रप्रज्ञ; तर होरेस पडला पक्का परप्रत्ययनेयबुद्धि! अरिस्टॉटलने घालून दिलेले नियम हे साहित्यशास्त्रांतील अंतिम व सनातन सत्यें असून प्राचीन ग्रीकांच्या साहित्यकृति याच फक्त आदर्शभूत व अनुकरणीय होत, अशी त्याची ठाम समजूत. साऱ्या साहित्यशास्त्रीय विचारांना त्याने निश्चित वज्रलेपी नियमांनी आवळून टाकण्याचा करून प्रयत्न केला. त्याने आपल्या Epistle to the Pisos ऊर्फ Ars Poetica या प्रसिद्ध पत्रबद्ध साहित्य तत्त्वविवेचक ग्रंथांत तर 'कवितेचें अमुक अमुकच प्रकार मानावे' 'अमुक प्रकारच्या कवितेचें वृत्त अमुकच असावे,' 'नाटकांतील वा महाकाव्यांतील व्यक्तिदर्शन ठराविक पद्धतीनेच झालें पाहिजे,' 'नाटक पांच अंकाचें असावें,' 'रंगभुमिवर एकावेळीं तीनापेक्षां अधिक बोलणाऱ्या व्यक्ति नकोत'. 'प्राचीन ग्रीक नाट्यकृतींचा आदर्श अनुकरणार्थ सदैव आपल्यासमोर असावा'— असे कितीतरी हुकूमवजा ठाम नियम बनवून टाकले आणि विशेष हें कीं, पुढे शेकडो वर्षांत होऊन गेलेल्या कितीतरी साहित्यसमीक्षकांनी होरेसच्या या निर्जीव, कृत्रिम व यांत्रिक नियमांपुढे अति विनम्रपणे आपली मान तुकविली! अरिस्टॉलचें Poetics म्हणजे काव्यशास्त्रावरील अखेरचा शब्द होय, असें समजण्याच्या या बौद्धिक गुलामगिरीवर पहिला जोरदार हल्ला कोणी चढविला असेल तर तो ड्रायडनने. त्याने स्वच्छच सांगून टाकलें कीं, "It is not enough that Aristotle has said so, for Aristotle drew his models of tragedy from sophodes and Euripides; and, if he had seen ours, might have changed his mind." त्यानंतर अठराव्या शतकाच्या अखेरीस जेव्हां स्वातंत्र्यवादाचा (Romanticism) उदय झाला, तेव्हा परंपरागत नियमांना डोळे मिटून शरण जाण्याच्या या प्रवृत्तीचा सासुरवास बराचसा संपुष्टांत आला!

आपल्या इकडेहि 'वडिलां'च्या शब्दांना विनशर्तपणे व निर्बुद्धपणे शरण जाण्याच्या या प्रवृत्तीने साहित्यजगतांत बरेच प्रताप गाजवलेले आढळतात! या बाबतींत अगदी ठळकच उदाहरण द्यावयाचें म्हणजे तें रससंख्यानिर्णयासंबंधींचे देतां येईल. भरताने प्रथम रसांची एक निश्चित संख्या ठरवून टाकली; पण पुढे जेव्हा भक्तिभावनेला रसपदवी देण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तेव्हा भरतमुनीने मूळ रसव्यवस्था निर्माण करतांना भक्तीला रस मानलेलें नाही, या प्रबळ कारणाच्या आधारावर ती पदवी मोठमोठ्या पट्टीच्या संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांकडून नाकारली गेली! भक्तिभावनेचें रसत्व कबूल करण्यांत प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनीच काय, पण अगदी विसाव्या शतकांतल्या चिकित्सक विद्वानांनी सुद्धा आढेवेढे घेतले आहेत. म. म. पां. वा. काणे अशांपैकीच एक चिकित्सक विद्वान् आहेत. ते म्हणतात, "जोंपर्यंत प्राचीन साहित्य शास्त्रकारांची रसविषयक परिभाषा वापरावयाची आहे तोंपर्यंत भक्तिरस म्हणून स्वतंत्र मानण्याचें कारण आहे, असे आम्हाला वाटत नाही." मनुष्य एकदां रूढ विचारसरणीच्या आहारी गेला, म्हणजे त्याची स्वतंत्रप्रज्ञा कशी हतबल होते याचें हें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्तम उदाहरण होय! अशीच भूमिका जगन्नाथ पंडितानेंहि घेतलेली आहे. रसांची संख्या नऊच का आणि स्थायीभावांची संख्या तेहतीसच कां, या शंकांचीं उत्तरें देतांना त्याने परंपरेचा आणि मुनिवचनांचाच आश्रय घेतलेला आढळून येतो!

असाच प्रकार या संस्कृत साहित्यशास्त्रांत निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांच्या लक्षणांसंबंधी झालेला आहे. 'महाकाव्य' या वाङ्मयप्रकाराचेंच उदाहरण घ्या ना : एकदा दंडीने त्याच्या अंतर्बाह्य स्वरूपासंबंधी जे कांही निश्चित नियम ठरवून टाकले, ते मुळी विधिलेखच ठरले! महाकाव्य म्हणे 'सर्गबद्ध असावें, आशीर्वाद-नमस्क्रिया अथवा वस्तुनिर्देश यांनीच त्याची सुरवात व्हावी, नायक चतुरोदात्त असावा, नगर – अर्णव – शैल–ऋतु –चंद्रार्कोदय यांचीं वर्णनें यावींत, त्यांत विप्रलंभ शृंगार असावा, विवाह असावा, कुमारोदय असावा, मंत्रदूतप्रयाण असावें, नायकांचा अभ्युदय दाखविलेला असावा, तें अलंकृत असंक्षिप्त असावें...!'. आणि, इतकें सगळें आधीच तयार करून ठेवल्यानंतर कवीने एखाद्या निर्बुद्ध कारागिराप्रमाणे पूर्व नियोजित ठरीव चौकटींत रसानुकूल विशिष्ट शब्द भरण्याचें भरतकाम केलें की, महाकाव्य निर्मितीचें 'भरतवाक्यच' म्हटलें गेलें म्हणून समजावें! अर्थात् त्यामुळे एखाद्या कवीला महाकाव्य निर्माण करावयाचें असलें, तर त्याने त्या नियमांच्या साऱ्या मर्यादा अगदी काटेकोरपणे पाळल्याच पाहिजेत, असा संकेत रूढ झाला! आणि, एखादें महाकाव्य निर्माण झालें, तर त्याचें रसग्रहण करतांना तें त्या नियमांच्या कसोटीस पूर्णपणें उतरते किंवा नाही, हे पाहणें टीकाकारांचें व भाष्यकारांचें काम होऊन बसलें!

तात्पर्य काय की, पाश्चिमात्य आणि पौरस्त्य साहित्यशास्त्रांत कांही ठराविक तंत्रमंत्रादिकांना दगडावरची रेघ समजण्याची जी प्रवृत्ति आढळते, ती विशिष्ट वाङ्मयीन कलाकृतीचे प्रामाणिक व पूर्वग्रहविवर्जित रसग्रहण करण्याच्या दृष्टीने अत्यंत घातुक आहे, असें मला म्हणावयाचे आहे. वाङ्मय कसें असावें आणि वाङ्मयांत काय असावें, यासंबंधीं वेळोवेळीं आणि देशोदेशीं निरनिराळ्या साहित्यशास्त्रज्ञांकडून जें तंत्र आणि जे मंत्र तयार केले जातात, त्या तंत्रमंत्रावरहुकूमच सारी साहित्यनिर्मिति व्हावयास पाहिजे, असा आग्रह धरणे म्हणजे वाङ्मयाच्या सर्जनप्रक्रियेसंबंधीं गाढ अज्ञान प्रकट करणेंच होय! या तंत्रमंत्रपिसाटांनी वाङ्मयनिर्मितीसंबंधींचें एक आद्य तत्व नेहमी लक्ष्यांत ठेवलें पाहिजे, आणि तें हें की, वाङ्मय हें नेहमी व्यक्तिनिष्ठ असतें. वाङ्मयांत वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्वाचा अविष्कार असतो. साहित्यकाराला मानवी जीवनांतील जे एखादें सत्य उत्कटत्वाने प्रतीत होते, जी एखादी अनुभूति तीव्रतेने जाणवते, तिला तो अविष्कृत करण्याचा प्रयत्न करीत असतो. जीवनानुभूतीचा हा व्यक्तित्वनिष्ठ आविष्कार ॲरिस्टॉटल प्रम्मटादि साहित्यशास्त्रज्ञांनी आधीच तयार करुन ठेवलेल्या कांही नियमांच्या साच्यांत हुबेहूब बसलाच पाहिजे, असा वेडपड अट्टहास आपण सुबुद्ध रसिकांनी का धरावा?

वाङ्मयाकडे पाहण्याचा मला जो स्वतंत्र दृष्टिकोन मांडावयाचा आहे, त्याच्याविषयीं केवळ जिज्ञासा प्रेरित आस्थाच कां होईना, पण ती प्रामाणिकपणे बाळगणाऱ्या साहित्यचर्चाप्रेमी वाचकांनी साहित्यशास्त्रांतर्गत रूढ, निर्जीव, यांत्रीक नियम हें चिरकालिक व शाश्वत नसतात एवढी खूणगाठ जरी मनाशीं पक्की बांधून ठेवली तरी माझे नूतनसिद्धांतनिरुपणाचें कार्य पुष्कळच अंशांनी सुफलित होईल, असें वाटतें.

'युगवाणी'त प्रसिद्धीसाठी
पाठवावयाचे लेख
कृपा करून
श्री. वामन नारायण देशपांडे
संपादक
"युगवाणी"
यवतमाळ (वऱ्हाड)
या पत्त्यावर पाठवावेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बदलू आणि राधा

सौ. लीला दुबे,
एम्. ए.

● विख्यात हिंदी कवयित्री महादेवी वर्मा यांनी लिहिलेलें हें शब्दचित्र 'अतित के चलचित्र' मधून घेतलेलें आहे. यांतील जिव्हाळा व वर्णनशैली हीं केवळ अपूर्व आहेत.

सौ. लीला दुबे यांनी मूळ शब्दचित्राचा तितकाच सरस अनुवाद केलेला आहे. नागपूरच्या हिस्लॉप कॉलजचे प्रा. दुबे यांच्या त्या पत्नी होत. प्रा. दुबे यांनी मानववंशशास्त्र व लोकगीतें--लोकगाथा यांवर हिंदी व इंग्रजी भाषांत लेखन करून कीर्ति मिळविलेली आहे. सौ. लीला दुबे यांनीहि गोंडांसंबंधी समाजशास्त्रदृष्ट्या संशोधन सुरू केलें आहे.

* * *

बदलू आपल्या ओबड धोबड मडक्यांचा निर्विकार निर्माताहि होता आणि अष्टावक्रा-प्रमाणें रूपरंग असलेल्या मुलांचा विधाता देखील. निर्जीव मातींतील सजीव विषमता त्याचं लक्ष्य वेधूं शकली नाही, त्याचप्रमाणे, सजीव रक्तामांसांतील निर्जीव कुरूपता देखील त्याची समाधि भंग करूं शकली नाही!

एका बाजूने कच्च्या व पक्क्या, तुटल्या-फुटलेल्या व पूर्ण तयार झालेल्या अशा तऱ्हेतऱ्हेच्या भांड्यांनी आणि दुसऱ्या बाजूने कळकट, मळकट, वस्त्रविहीन व दुर्बल अशा मुलांनी वेढलेलाच मी त्याला सदैव पाहत आलें. ज्याप्रमाणें मातीचीं भांडीं कांहीं सुकवतांना, कांहीं भट्टींत भाजतांना, तर कांहीं उचलतां-ठेवतांना फुटत, त्याचप्रमाणे, मुलें देखील कांहीं जन्मल्याबरोबर, कांहीं रांगतांना, तर कांहीं लटपटणाऱ्या पायांनी आईबापांना मदत करीत असतांना मृत्युघरीं जात. पण त्यांच्या जन्ममृत्यू-करिता बदलूला सुखी किंवा दुःखी पाहणं कधीच शक्य झालं नाही. बदलूचं चित्र चितारणं कोणत्याहि चित्रकाराला सोपं नव्हतं. कारण तो अशा कांहीं परस्परविरोधी रेखांमध्ये बांधलेला होता कीं, एकीला स्पष्ट करतांना दुसरी लुप्त होऊं लागायची!

त्याचा चेहरा सावळा आणि सौम्य होता, पण पिचक्या गालांशीं विद्रोह करून नाकाच्या दोन्ही बाजूला उंच उठलेल्या हाडांनी त्याला साप-ळ्याचा भाऊच बनवलं होतं! उंच एकेरी हाडाचं शरीर कधीकाळीं सुडौल असेल परन्तु अवेळीं आलेल्या वृद्धावस्थेच्या भारानं तें वाकलं होतं. चमकदार, लहान डोळे एखाद्या स्त्रीच्या डोळ्यां-प्रमाणें सलज्ज होते, परंतु त्यांच्यांत उत्साहहीनता पुरेपूर भरली असल्यामुळे काळ्या चिक्कण मातीच्या मूर्तींत कवड्यांनी बनवलेल्या डोळ्यांची आठवण करून देत. कापणाऱ्या ओटांतून निघणारा घशांतील 'खरखर' आवाज ऐकून बासरींतून निघणाऱ्या शंखाच्या आवाजाने चमकावं, तसं मन चमकत असे.

बदलू स्वभावानेच मितभाषी होता. जेव्हा कधी कधी जातां-येतांना फिरत्या चाकावर स्थिर दिसणाऱ्या त्याच्या बोटांची निर्माण-कला पाहण्याकरिता मी थांबत असें, तेव्हा तो एकदम अस्थिर व्हायचा आणि आपलं धोतरं अस्त-विण्यासाठी पुन:पुन्हा घसा साफ करून खरखरीत आवाजांत 'खेदन' 'दुखिया,' 'नत्थू'—वगैरेंना खाट आणण्याकरिता हाका मारायचा. साडेतीन पायांच्या त्या चाळणीचा अंधारकोठडींतून उद्धार करण्याकरिता मुलांची अहमहमिका सुरू झाली, म्हणजे मात्र मी तेथून सटकण्यांतच शहाणपण समजत असे. माझ्या बसण्याने खाटेच्या सुरक्षितपणाबद्दल तर शंका उत्पन्न झालीच असती, पण त्याचबरोबर गाडग्या-मडक्यांचं भविष्य देखील धोक्यांत पडण्याचा संभव होता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बदलूचं घर माझ्या जाण्यायेण्याच्या वाटेवर होतं, त्यामुळे एकतर मी पोहोचण्याच्या गडबडींत असे, नाही तर परतण्याच्या. माझ्या थांबण्याने दुसऱ्यांच्या कामांत बाधा येणार नाही, असा फुरसतीचा वेळ काढणं कठीण होतं.

मात्र ज्या दिवशीं आपल्या दारावर माती थोपीत किंवा घरांतील आणखी कोणतं काम करीत असणारी राधा भेटे, त्या दिवशीं कांही वेळाकरिता तरी थांबणं आवश्यकच नाही, तर अनिवार्य होई. तिला कधी पाझरणाऱ्या डोळ्यांनी तर कधी हसणाऱ्या ओठांनी आपल्या एकरस आयुष्याचं पुराण सांगायला फार आवडत असे. तिचे डोळे, तिचे ओठ, तिचे हातपाय—सर्व जणू कांही आपापली गोष्ट सांगावयाला आतुर असत, याचमुळे की काय, तिला शब्दांमध्ये फारच थोडं सांगावं लागे. पण तें थोडसं इतकं मार्मिक असायचं कीं, ऐकणाऱ्याला लगेच आपल्या मूळ मनःस्थितीवर येणं कदापि शक्य नसे. एखाद्या करुण-रागाप्रमाणे तिची कथा जितकं तिचं हृदय हलवून सोडी, तितकंच दुसऱ्याचंहि! त्यामुळे किती तरी वेळा त्या कुंभारणीपासून आपला आवेग लपवणं मला देखील कठीण होत असे.

राधेला मूर्तिमंत दीनता म्हणावयाला हवं. जुन्या लुगड्याची मळकट चिंधी फाडून बांधलेले रूक्ष व गुंतलेले केस सणासुदीला काळ्या मातीने धुतले जरी गेले, तरी त्यांना कडू तेलाचा चिकटपणा देखील अपरिचित होता. दुःख देखील एक प्रकारचा शृंगारच बनून जातं! म्हणूनच दुःखी व्यक्तींचे चेहरे पहाणाऱ्याची दृष्टि वेधून घेतल्याशिवाय रहात नाहीत. राधेच्या चेहऱ्यांत असणाऱ्या आकर्षणाचं मूळ देखील तिची व्यथाच असल्यासारखं वाटत होतं. नाही तर तसं पाहिलं तर तिचा चेहरा थोडा जास्त रुंद होता. नाक दोन डोळ्यांच्या मधून तीक्ष्ण रेषेसारखं येऊन ओठांच्यावर एकदम गोल झालं होतं. दाट काळ्या वर्तुळांनी घेरलेले डोळे पाहून वाटे—कोणी बोटांनी दाबून त्यांना काजळांत बसवलं आहे. ओठावरची सुरकुती तर अशी दिसे की, जणु कांही एखाद्या कडू औषधाच्या निरन्तर स्पर्शाचा ठसाच! या सर्व विषमतेच्या संगमांत जें एक आकर्षण होतं, तें नक्कीच तिच्या दुःखपीडित हृदयापासून उत्पन्न झालं असलं पाहिजे. तिचा जीवनरस पिळून निघाल्यामुळे ती जितकी सुकली होती, तितकीच दुःखांत भिजून ती जड झाली होती. म्हणूनच तिच्यामध्ये ती शून्यताहि नव्हती की, जी दृष्टीला थांबवूं शकत नाही; आणि तो हलकेपणाहि नव्हता की, जो हृदयाला स्पर्श करूं शकत नाही.

सतत घासले गेल्यामुळे गोलाचे चपटे झालेले काशेचे कडे आणि मळामुळे रूपहीन अशा लाखेच्या बांगड्या यांच्या व्यतिरिक्त आणखी कोणत्याहि आभूषणांशीं राधेचा परिचय नव्हता. पण तिला त्याच्याबद्दल कधीं वाईट वाटलेलं दिसलं नाही. कसलेल्या शरीराची आणि भरल्या अंगाची ती बाई मुलांची न तुटणारी शृंखला व दारिद्र्याची न घटणारी छाया यांच्यामुळे केवळ हाडांचा सापळा राहिली होती.

या वर्गाच्या स्त्रियांमध्ये जी एक कर्कश बडबडीची प्रवृत्ति दृष्टीस पडते तिजपासून राधा पूर्णतः अलिप्त होती. कदाचित् याच कारणामुळे असेल, माझ्या पहिल्या औदासिन्याचं रूपांतर कुतूहलांत व कुतूहलाचं रूपांतर आदरांत होणं अपरिहार्य झालं. बदलूबद्दलचं तिचं प्रेम गंभीर आणि म्हणूनच शान्त व कोलाहलहीन होतं. बदलू

★ फुलांची ओंजळ ★
'बी' कवींच्या कविता-संग्रहाची
★
द्वितीयावृत्ति
नवीन कवितांसहित
●
जून अखेर प्रसिद्ध होईल.
★
—※ प्रकाशक ※—
ठाकूर आणि कंपनी लि., अमरावती.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कधीच घराची, मुलांची किंवा स्वत: तिची देखील काळजी करतांना दिसला नाही. त्याचप्रमाणे, राधेच्या तोंडून तिच्या बेजबाबदार नवऱ्याची निन्दाहि कोणाला ऐकायला मिळाली नाही. राधेची खात्री होती की, तिचा नवरा 'कुंभकारशिरोमणी' आणि उच्च दर्जाचा कलावन्त आहे. लोकांना त्याच्या मोठेपणाची जाणीव नाही, एवढंच!

सकाळी उठून कधी मका तर कधी ज्वारी, कधी बाजरी तर कधी जव, हरभरे दळून राधा ज्या कठोर कर्तव्याला सुरुवात करायची, त्याचा उपसंहार टिमाटिमणाऱ्या दिव्याच्या मंद प्रकाशांत पेंगत व रडत असलेल्या मुलांमध्ये सकाळची राखून ठेवलेली भाकर वाटून होत असे.

राधेची पाच मुलें जिवंत होती, पण त्यांची संख्या सांगतांना ती जी केवळ स्मृतिशेष राहिली होती त्यांना सुद्धां मोजल्याशिवाय राहात नसे मेलेल्या तीन मुलांबद्दलच्या गोष्टी जिवंत मुलांबद्दलच्या चर्चेत इतक्या कांही मिसळलेल्या असत की ऐकणाऱ्याला त्यांना देखील जिवंत समजणं भाग पडावं. फरक होता तो एवढाच की, मृत मुलें गोष्टीतल्या नायकांप्रमाणें बोलण्यांमध्ये व गोष्टीमध्यें जिवंत होतीं, आणि जिवंत मुलें मात्र आपल्या कलावंत बापाला व मजुरीण आईला मदत करतां करतां मरत होती! चार पाच वर्षांचा चिमुरडा नत्थू देखील जेव्हा आपल्या नगाऱ्यासारख्या पोटाहून दसपट मोठं मडकं डोक्यावर लादून वेडींवाकडीं पावलें टाकत, धडपडत बाजारांत जाण्याचा उत्साह दाखवूं लागे, तेव्हा त्याच्या पुरुषार्थाकडे पाहून हसावं की रडावं, हेंच कळत नसे!

मडकीं विकून पोट भरत नाही व आपला पिढीजात व्यवसाय उपजीविकेचा प्रश्न सोडवूं शकत नाही, असं पाहून राधा आजूबाजूच्या शेतांत काम करावयाला जात असे. कधी कधी ती शेतावरून व बदलू बाजारांतून येईपर्यंत ते चिमुकले जीव ओल्या ओट्यावर किंवा त्याच्या धुळींत लोळून लोळून थकून निजून जायचे. राधा परत आली, म्हणजे त्यांना झोपडींत मळक्या गोधडीवर आणून निजवी. या परिवर्तनाच्या वेळीं जो जागा होई त्याला शिंक्यावरच्या मडक्यांतील भाकरीचा एक तुकडा बक्षीस दिला जाई. जो निजला असे, त्याला प्रेमळ थापटीवरच रात्र काढावी लागे.

बदलूचा देखील त्या मडक्यांतील प्रसादावर हक्क असे. पण या मर्यादित अन्नकोशाच्या अन्नपूर्णेला मात्र कोणत्या दिवशीं एकादशीचं पारण नुसत्या झोपेनेंच साजरं नसेल करावं लागतं, हें सांगणं कठीण!

विचित्र होतीं दोघेंहि! पति पोटभर खाऊंपिऊं घालूं शकत नव्हता, पुरेसे कपडे देऊं शकत नव्हता आणि मुलांच्या भवितव्याची किंवा वर्तमानाची देखील चिंता करत नव्हता. पण पत्नीला त्याचे दुर्गुण 'दुर्गुण' वाटत नव्हते, असंतोषाचं कारणच दिसत नव्हतं!

राधेच्या कोणत्याहि मुलाच्या जन्माच्या वेळीं कधीच गडबड धांदल झालेली दिसली नाही. लहानग्या लखीचा ज्या रात्रीं जन्म झाला, त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत मी तिला विहिरीवरून पाणी भरून आणतांना पाहिलं होतं. मडकं खाली ठेवून तिने माझ्याकरिता तीच साडेतीन पायांची चिरपरिचित खाट आणून ठेवली. तिच्यावर काळजीपूर्वक अधिष्ठित होऊन मी मुलांशीं इकडच्या तिकडच्या गोष्टी करूं लागलें; आणि, त्याचवेळीं राधेने आपला बोथट विळा ओट्याजवळ पडलेल्या दगडावर घासून घासून धुणं सुरूं केलं.

मी थोडंसं हसून व थोड्याशा विस्मयाने विचारलं. 'रात्रीं काय काम आहे याचं? काय कोणाचा गळा कापायचा आहे? उत्तरादाखल राधेने नुसतं म्लान स्मित केलं.

दुसऱ्या दिवशीं सोमवती अमावस्या असल्यामुळे मला फुरसत होती, म्हणूनच तेथे जाणं शक्य झालं. बदलूचं चाक नेहमीप्रमाणे उदासीनपणे फिरत होतं, पण मुलांनी मात्र घराच्या दाराभोवती जमून आरडाओरड चालविली होती. मी संकोचलेल्या बदलूकडे न पाहतां दुखियाला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिच्या आईबद्दल प्रश्न केला. ती आपल्या बहिणभावंडांत सर्वांत अधिक बडबडी असल्यामुळे एका श्वासांत तिने कितीतरी गोष्टी सांगून टाकल्या ! तिला नवा भाऊ झाला आहे. आईने चांभारणीला बोलावूं दिलं नाही, एक रुपया मागत होती ती, बिळ्याने आपण स्वतःच नाळ कापून टाकली ! उशाकडच्या कोपऱ्यांत गाडली आहे. बाळ टिटवीप्रमाणे पाय आकसून डोळे मिटून पडला आहे. बाबाने आईला बाजरीची भाकरी दिली— वगैरे महत्त्वाच्या गोष्टी मला कांही क्षणांतच माहीत झाल्या. पण आंत वाकून पाहण्याचा माझा प्रयत्न निष्फळ झाला. कारण मळक्या कपड्यांत गुंडाळलेली श्यामवर्ण राधा मातीच्या धुरकट भिंतींनी घेरलेल्या अंधाराशीं अगदी एकरूप झाली होती ! आपल्या भावी कुंभाराला जवळ येऊन पाहण्याबद्दल आमंत्रण मिळतांच मी आतमध्ये पाय ठेवला.

कोठडांत भरलेल्या धुराच्या व तंबाखूच्या वासामुळें प्रत्यक्ष श्वासांत एक विचित्र प्रकारचा जडपणा येत होता. पांढऱ्या मातीने सारवलेल्या, पण उधईने पोखरल्यामुळे देवीने टाचवलेल्या तोंडाप्रमाणें दिसणाऱ्या भिंती छप्पर सांभाळायला असमर्थ होऊन जणु कांही, थकवा घालवायकरिता खाली बघूं पहात होत्या. खोलीच्या मध्यभागी गृहस्वामीकरिता टाकलेल्या खाटेची लांबी निजणाऱ्याच्या पायांना स्थान द्यायचं नाकबूल करीत होती. भिंतींत खोदलेल्या कोनाड्यांत कधीचा ठेवलेला धुळीने माखलेला दिवा आपल्या नांवाची लाज राखण्याकरिताच की काय, एक इंचभर वात व दोन थेंब तेल राखून होता.

या घराच्या पश्चिमेकडील रिकाम्या कोपऱ्यांत राधा आपल्या नुकत्याच जन्मलेल्या शिशूचा जीवनाबरोबर दारिद्र्याशींहि परिचय करून देत होती. डोळे मिटलेलं तें मूल असं दिसत होतं की जणु एखाद्या मोठ्या पक्ष्याच्या अंड्यांतून नुकतंच बाहेर पडलेलं बिनापंखांचं पिल्लूच ! नाळ जेथून कापली होती, त्या जागी थोडीशी सूज देखील आली होती आणि रक्तहि गोठलं होतं.

कळलं कीं, चांभारीण एक रुपयापेक्षा कमी घ्यायला तयार नव्हती; म्हणून फाल्तू खर्च उचित न समजून तिने स्वतःच सर्व ठाक ठाक करून टाकलं.

—वेदनांमुळे तिला उठवत नव्हतं. निजल्या निजल्या बिळ्याने नाळ कापावी लागली, म्हणून बरोबर कापली गेली नाही, पण काळजी करण्यासारखें कांही नाही. कारण तेल लावल्याने दोन चार दिवसांत वाळून जाईल— मी आश्चर्याने त्या मातेच्या म्लान, पण प्रशान्त व सौम्य चेहऱ्याकडे पाहिलं.

तिच्याकरिता मी आत्ता दूध सुंठ वगैरेची व्यवस्था करायला जात आहे हें ऐकून ती आणखीच करुणपणें हसूं लागली. ती जें बोलली, त्याचा अर्थ होता की, मी कोठपर्यंत अशी व्यवस्था करीत राहीन ? हें तर तिच्या जन्मभर चालणार !

चाकाजवळ निर्विकारपणे बसलेल्या बदलूला बोलावून जेव्हा मी त्याला वाण्याकडून सुंठ, गूळ, तूप—वगैरे आणायला सांगितलं, तेव्हा जणू तो आकाशांतून खाली येऊन पडला — त्याच्या दुखियाची आई तर म्हणत होती की, गूळ पाहून तिला ओकारी येते व तूप खाऊन पोटशूळ उठतो ! म्हणून तर तो नुसती बाजरीची भाकर देऊन निश्चिन्त झाला होता ! बदलूच्या भोळ्या चेहऱ्या-

★ हिंदु-मुस्लिम ★
लेखक
आचार्य
दादा धर्माधिकारी
जून अखेर प्रसिद्ध होत आहे.
—*प्रकाशक*—
ठाकूर आणि कंपनी लि. अमरावती.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कडे पाहून ज्यावेळीं आपल्या खोटेपणामुळे ओशाळलेल्या राधेकडे मीं दृष्टि टाकली, त्यावेळीं त्या जोडप्याला पुढे आणखी कांही विचारायची आवश्यकता मला वाटली नाही. बदलू ज्या गोष्टींची व्यवस्था करूं शकत नाही, ती राधेकरिता अपायकारक आहे हें माझ्या लक्षांत यायला वेळ लागला नाही. पण आपलं हें दिव्य ज्ञान लपवून मीं सहजपणें म्हटलं, 'जें सर्व बायका खातात, तें दुखियाच्या आईला खावं लागेल. मग उलटी होवो की, पोट दुखो.'

त्या घरांत अपत्याचा जन्म अवडंबररहित असायचा; मृत्यूहि तितकाच शान्तपणे येत असे!

मुलिया जोराच्या तापांत इकडे तिकडे हिंडतच राहिली. देवीचीं चिन्हं स्पष्ट दिसूं लागलीं, तेव्हा आईने पकडून घराच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत तुटक्या खाटेवर आणून निजवलं. मंतरलेल्या झाडूने घर झाडणं, लिंबाच्या झाडाला देवीच्या नांवाने पाणी घालणं–वगैरे जीं कर्तव्य राधेच्या विश्वासाच्या व शक्तीच्या मर्यादेंत होतीं, त्यांच्या पालनांत कोणतंच अंतर पडलं नाही. पण चौथ्या दिवशीं तिने स्वर्गाची वाट धरली! त्या मुलीवर बदलूचं विशेष प्रेम होतं, म्हणूनच ज्यावेळीं तो तिच्या मृत देहाचं यमुनेच्या गंभीर जलप्रवाहांत विसर्जन करून परत आला, त्यावेळीं त्याच्या शान्त मौनांत लपलेल्या मर्मान्तिक व्यथेचं अनुमान करून राधेने स्वप्नाची एक खोटी गोष्ट बनवून टाकली. स्वप्नांत देवी तिला म्हणत होती की, "या मुलीला मी एवढ्याच दिवसांकरिता पाठविलं होतं; आता ती मला परत दे." बदलूसारख्या भोळ्या व बावळट माणसाचं मन या स्वप्नामुळे प्रभावित होणं साहजिकच होतं. जेव्हा स्वत: माता त्याच्या मुलियाला घेऊन जाण्याकरिता उत्सुक होती, तेव्हा औषधपाणी न करणंच इष्ट होतं. औषधपाण्याने मुलगी तर वाचणार नव्हतीच, पण वर देवीचा कोप मात्र सहन करावा लागला असता! शिवाय स्वत: मातेनं तिच्याकरिता हात पसरावा, यापेक्षा त्या मुलीचं आणखी चांगलं भाग्य तरी कोणतं?

एकदा मी राधेला तिच्या खोटं बोलण्याबद्दल सारगर्भित उपदेश केला. पण तिने आपल्या मळक्या व फाटक्या पदराने डोळे पुसत पुसत जी कैफियत दिली, ती कांही कमी सारगर्भित नव्हती–तिचा नवरा फारच भोळा आहे. एखाद्या क्षुल्लक धक्क्याने देखील तो धैर्य गमावून बसतो. पुन्हा घरांतील परिस्थिति अशी नाही - की, इतक्या सर्वांना पोटभर अन्न तरी मिळूं शकेल. म्हणूनच ती आपली व आपल्या मुलांचीं लहान सहान दु:खं लपवून टाकते. आतां ईश्वर तिला परलोकांत जी शिक्षा द्यायची असेल, ती देवो; पण कोणाचं कांही लुबाडण्याकरिता कांही ती खोटं बोलत नाही!

राधेचं उत्तर म्हणजे मला पडलेला एक प्रश्नच! तिच्या असत्याला असत्य तरी कसं म्हणायचं, व न म्हणावं, तर त्याला दुसरं नांव तरी कोणतं द्यायचं?

बरेंच वेळां मीं बदलूला सांगून पाहिलं की, जर तूं अशा मडक्यांच्या ऐवजीं सुंदर नक्षीदार मडकीं व सुरया तयार करशील, तर त्या तुला शहरांत देखील विकतां येतील. पण त्याने चाकावर दृष्टि लावून खरखरणाऱ्या गळ्याने जें उत्तर दिलं, त्याचा अर्थ होता की, त्याचे बाप, आजोबा व पणजोबा अशींच मडकीं बनवीत आले. तो किती झालं, तरी गावठी कुंभार ठरला! शहरी भांडीं बनवतां येणं त्याला शक्य नाही! मग पुढे आणखी कांही बोलणं मला व्यर्थ वाटलं!

एक दिवस मीं शिकणाऱ्या मुलांना पौराणिक कथा समजवण्याकरिता कांही चित्रं घेऊन गेलें. त्यांना कलात्मक जरी म्हणतां आलं नसतं, तरी बाजारांत विकायला येणाऱ्या शिव, पार्वती, सरस्वती-वगैरेंच्या रंगीबेरंगी चित्रांपेक्षा तीं खात्रीनेच चांगलीं होतीं.

बदलूच्या मुलांपैकी दुखियाच फक्त शिकायला येत असे. तिनेच बहुतेक आपल्या बापाला ही वर्दी दिली असावी. पण जेव्हा आपली सारी गंभीरता विसरून बदलू धावतपळत तेथे येऊन टेपला, तेव्हा माझ्या आश्चर्याला सीमा राहिली नाही! त्याला मीं सर्व चित्रं दाखविलीं व शक्य-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तोंवर सोपा करून अर्थहि सांगितला. पण तरी देखील बदलू मुलांच्यांतच बसून राहिला! सरस्वतीच्या चित्रावर त्याची दृष्टि खिळलेली पाहून मला विचारावंच लागलं, 'हें चित्र तुला आपल्याजवळ ठेवायचं आहे का?'-त्यांच्या दृष्टींत संकोच होता—इतकं सुंदर चित्र कसं मागायचं? त्याच्या मनांतील भाव ओळखून मी जेव्हा तें चित्र त्याच्या स्वाधीन केलं, तेव्हा तो लहान मुलाप्रमाणे आनंदातिरेकाने अस्वस्थ होऊन गेला!

कितीतरी दिवसांनी मी तें चित्र बदलूच्या अंधाऱ्या घराच्या मोडकळीस आलेल्या दारावर चिकटवलेलं पाहिलं. आणि, खरं सांगायचं, तर त्या चित्राच्या दुर्भाग्याबद्दल मला खेदच वाटला!

दिवाळीच्या दिवशीं खूपशीं मातीचीं खेळणीं विकत घेण्याचा माझा परिपाठ आहे. खरं म्हणजे ही अशी पर्वणी आहे, की, ज्यावेळीं मातीच्या वस्तु बनवणाऱ्यांच्या कारागिरीचं व कौशल्याचं चांगलं प्रदर्शन होतं आणि या दिवशीं मिळालेल्या प्रोत्साहनाच्या जोरावर ते वर्षभर आपल्या कलेच्या विकासासाठी झटत असतात. आधुनिक युगाने आमच्या उत्सवांतील केवळ उत्साहच नष्ट नाही केला तर या कारागिरांचा विकास देखील थांबवला आहे. विचारांत गुंग होऊन मी खेळणीं मांडण्याकरिता दिवाणखाण्यांत शिरलेंच होतें, तेवढ्यांत बदलूचा खरखरणारा आवाज कानावर आला. तो तर कधी माझ्या घरीं येत नसे, म्हणून आश्चर्यहि वाटलं व चिन्ताहि! त्याच्या घरीं कोणी आजारी तर नाही, किंवा आणखी कोणती आपत्ति तर नाही ना आली? व्हरांड्यांत येऊन पाहिलं. मळके कपडे घातलेला बदलू एक टुटकी टोपली घेऊन चोरट्यासारखा उभा आहे.

थोडं पुढं सरकून व टोपली माझ्यासमोर ठेवून जेव्हा त्याने त्यावर आच्छादलेला फाटक्या कापडाचा तुकडा बाजूला केला, तेव्हा मी आश्चर्यचकित होऊन तशीच उभी राहिलें. बदलूने एक सरस्वतीची मूर्ति आणली होती—पांढऱ्या व सोनेरी रंगाने रंगविलेही. तिचें शुभ्र वस्त्र, सोनेरी केस, सोनेरी वीणा, पांढरा हंस व त्याचे लाल पाय व चोंच यांच्यामुळे मूर्तीची मुद्रा आणखीच प्रसन्न दिसत होती. केसांची एक एक बट ज्या कलात्मक रीतीने बनविली गेली होती, तिजवरून ती बनविणारा चांगलाच कुशल कारागिर असावा, असं वाटलं. विचारलं, 'कोणाकडून बनवून आणलीस ही?'-जें उत्तर मिळालं, तें माझ्या कल्पनेबाहेरचं होतं. बदलूने आपले सलज्ज डोळे खाली करून आणि रूक्ष व ओबडधोबड हात पसरून सांगितलं की, ती त्याने स्वःतच तयार केली आहे. विश्वास ठेवणं सोपं नव्हतं. म्हणून मी कधी मूर्तिकडे तर कधी बदलूकडे पाहत राहिले. हाच का तो कुंभार की, ज्याने एका वर्षापूर्वी नक्षीदार मडकीं घडविण्यांत देखील असमर्थता दर्शविली होती? तोंडांतून निघून गेलं, तूं तर गांवठी कुंभार आहेस. जेव्हा नक्षीदार मडकं बनवण देखील तुला अशक्य वाटत होतं तेव्हा अशी मूर्ति बनविण्याची कल्पना तरी कशी करूं शकलास?'

सूचना

★

युगवाणीच्या बाह्यांतर्गत स्वरूपांत बदल करण्याचा नेहमी प्रयत्न करण्यांत येत असतो. इत:पर युगवाणीच्या वाचकांना चाळीस पानांचा मजकूर नियमितपणें देण्यांत येईल.

वर्गणीदारांना याशिवाय येत्या आक्टोबरमध्ये अमरावती येथे भरणाऱ्या नाट्य-संमेलनानिमित्त युगवाणीचा नाविन्यपूर्ण खास अंक मिळेल. तेव्हा ज्या वाचकांनी अजून वर्गणी भरली नसेल त्यांनी येत्या जूनच्या अंकापासून वर्गणीदार व्हावें.

जूननंतर अधिक पानांसाठी वर्गणींत वाढ करण्यांत येईल.

व्यवस्थापक.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हळूहळू सत्य स्पष्ट झालं. सरस्वतीच्या चित्राकडे पाहतां पाहतां बदलूच्या मनांत कलाकार होण्याची इच्छा जागृत झाली. सगळी शक्ति एकवटून जेवढं शक्य होतं तेवढं तें चित्रगत सौंदर्य त्याने मातीमध्ये साकार करण्याचा प्रयत्न केला. कितीतरी वेळां तो असफल झाला; पण सतत प्रयत्नानंतर शेवटीं आज तो मला भेट देण्यायोग्य सरस्वतीची प्रतिमा बनवूं शकला होता!

त्यानंतर कितीतरी दिवाळ्या आल्या; बदलूने कितीतरी सुंदर मूर्ति घडवल्या व त्यांच्यापैकी कितीतरी मूर्तींनी संपन्न घरांची शोभा वाढविली होती!

राधा जणु कांही आपल्या पतीला कलावन्त बनविण्याकरिताच जिवंत होती. त्याच्या ओबडधोबड मडक्यांचं स्थान सुंदर मूर्तींनीं घेतलं मात्र आणि ती आपली सारी ममता गुंडाळून अज्ञात लोकीं चालती झाली!

बदलूची स्थिति तर थेट विरही चक्रवाकासारखी झाली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत व संध्याकाळपासून सकाळपर्यंत तो राधेच्या परत येण्याची वाट पाहत राही. प्रतीक्षा नेहमीच करुणापूर्ण असते. पण जेव्हा कधींहि परत येणार नसलेल्या मृतासाठी एकादा जिवंत माणूस प्रतीक्षा करूं लागतो, तेव्हा तर ती अधिकच करुण होते. जेव्हा बदलूनें दुसरा संसार थाटण्याबद्दल चर्चा करणाऱ्याच्या डोक्यावर मडकं आणून आदळलं, तेव्हा खरं कळलं कीं, खोटं बोलणारी राधा त्या उदासीन ग्रामिणाच्या आयुष्यांतलं कोणतं स्थान रिकामं करून गेली आहे!

स्त्रीमध्ये मातेचं रूपच सत्य, वात्सल्यच शिव आणि ममताच सुंदर असते. ती जेव्हा या विशेष गुणांसहित पुरुषाच्या जीवनांत प्रवेश करते, तेव्हा तिचं रिक्त स्थान भरून काढणं अशक्य जरी नाहीं, तरी कठीण मात्र अवश्य होऊन बसतं!

दोन वर्षांपूर्वीच बदलूच्या कलेवर मुग्ध होऊन त्याचा एक मामेभाऊ त्याला व मुलांना फैजाबादला घेऊन गेला होता. पण दिवाळीच्या दिवशीं एक-न-एक मूर्ति घेऊन यायला बदलू कधींच विसरत नाहीं. केवळ याच वर्षी त्याच्या या नियमांत खंड पडत आहे. कारण दिवा[illegible] यें आली व गेली, पण बदलूने अजून कोणत[illegible] मूर्ति आणली नाहीं. कदाचित् तो रा[illegible] शोधण्याकरिता निघून गेला असेल. पण मा[illegible] घराच्या कोपऱ्या कोपऱ्यांत प्रतिष्ठित बुद्ध, कृ[illegible], सरस्वती, बापू वगैरेंच्या मूर्ति जुन्या चाकां[illegible] ओबडधोबड मडक्यां घडवणाऱ्या ग्रामीण कुंभार[illegible]चं स्मरण करून देऊन जणु म्हणत असतात "क[illegible]ला तुमचाच पैतृक अधिकार नाहीं; कल्पना तुमच[illegible] क्रीत दासी नाहीं.'

●●●

★ कलात्मक मुद्रणाचें केन्द्र ★
महेश्वर मुद्रणालय
अमरावती.
★ बाईंडिंग
★ रूलिंग
★ पुस्तक छपाई
★ नोट पेपर्स, पत्रिका, फार्मस्, रजिस्टर्स आणि सर्व प्रकारचीं छपाईचीं कामें विश्वासाने व तत्परतेने करून देण्यांत येतात.

वर्गणीदारांस—

★ ★ ★

● युगवाणीचा अंक नियमितपणें दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतो. अंक न मिळाल्याच्या तक्रारी २० तारखेपर्यंत वाट पाहून कराव्यात. युगवाणीचा प्रत्येक अंक कसोशीने पुनः तपासून वर्गणीदारांस पाठविण्यांत येतो.

इतःपर सर्व जबाबदारी पोस्ट-खात्यावर!

व्यवस्थापक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

झुंज

मूळ लेखक—NIKOLAI TIKHNOV.
अनुवादक—मधुकर श्री. मंगरूळकर
बी. ए., एल्एल्. बी.

● नागपूरचे श्री. मंगरूळकर यांनी रशियन लेखक Nikolai Tikhnov यांच्या एका मजेशीर लघुकथेचा सुंदर अनुवाद केलेला आहे. ●

* * *

त्या जर्मन पायलटचं लक्ष आपल्या भक्ष्याकडे लागलं होतं. बारीक सारीक हालचाल देखील त्याच्या नजरेतून सुटत नव्हती. त्यानं आपल्या विमानांतून खाली नजर टाकली. खालचं जंगल हिरव्यागार गालिच्यासारखं पसरलेलं दिसत होतं. मधूनच एक पिवळ्या रंगाचा पट्टा गेला होता. त्या पायलटनं आपल्या अनुभवी नजरेनं त्या पिवळ्या रंगाचा अर्थ ओळखला होता. तो एक लोहमार्ग होता. त्या रुळावरून एक मालगाडी लष्करी माल घेऊन चालली होती.

त्या जर्मन पायलटच्या मनांत विचार चालला होता. जंगलांत ही गाडी आहे, तोंवर तिच्यावर हल्ला करणें ठीक होणार नाही. जरा थोडा धीर धरला की, ती पलीकडच्या मोकळ्या मैदानांत येईल. पण आपण आहों, आपले बॉम्ब्स आहेत, आणि ही गाडी!—बस्स, ऐसा वार उडवून देऊं की, पहात रहावं नुसतं. एकेक बॉम्ब मोजून टाकावा अन् मजा पहात रहावी....

त्याच्या विमानानं एक गिरकी घेतली. दोन्ही बाजूचे पंख उन्हांत चमकत होते. एक मोठा वळसा घेऊन त्या विमानानं आपलं नाक वर उचललं. जरा उंचावर जाऊन त्या मोकळ्या मैदानाच्या दिशेनं मुसंडी मारली. मातींतून धुरळ्याचे धुरासहित दोन लोळ उठले. त्याच्या हिशोबाप्रमाणे तेवढ्या वेळांत त्या विवक्षित जागीं गाडी यायला हवी होती. त्या अंदाजानं त्यानं ते बॉम्ब टाकले होते. विमान वर नेऊन त्यानं खाली नजर टाकली. त्याला आश्चर्य वाटलं. गाडी मैदानांत पुढे यायच्या ऐवजीं मागे सरली होती! जंगलाचा आश्रय घेतला होता तिनं. त्याला वाटलं...अरे उगीचच वाया गेलेत हे बॉम्ब...!

त्यानं पुन्हा गिरक्या घ्यायला सुरवात केली होती. आता त्याचा पुरा निश्चय झाला होता.... "पहतों आता माझ्या तडाख्यांतून कशी सुटते ती", असंच जणु तो म्हणत होता.

—ती गाडी पुन्हा मैदानांतून वेगानं पळूं लागली होती. त्या बिचाऱ्या रेल्वेड्रायव्हरच्या स्वप्नींही नसेल की, थोड्याच वेळांत हें समोर दिसणारं पाईन वृक्षाचं रान, मुळासुद्धा उलथून आपलं स्वागत करायला येणार आहे म्हणून—!!

'धडाड् धडाड् धूम—' आवाज झाले. वृक्षशाखा भुईला येऊन मिळाल्या. झाडांचीं अजस्त्र खांडं इकडे तिकडे फेकलीं गेलीं. पण नुकसान म्हणाल—? छे! बॉम्ब्स् पडले अलीकडे अन् गाडी गेली पलीकडे..! झालं तेहि बॉम्ब वाया गेले....

त्यानं रागानं आपल्या भिवया आवळल्या. जर्मन भाषेंत शिव्यांची लाखोली मोजली... ही एवढी मोठी सामानानं भरलेली गाडी माझ्या डोळ्यादेखत सुरळित जाणार...!

आता त्या गाडीच्या अगदी मधल्या डब्याचा नेम धरून त्यानं सरळ त्या जंगलावर झेप घातली. पण या वेळेला त्याचा अंदाज चुकला म्हणा, किंवा रागाच्या भरांत नेम धरण्यांत चूक झाली म्हणा. काय झालं त्याचं त्याला ठाऊक. या वेळेला तर बॉम्ब किती तरी बाजूला पडले. त्या मानानं मघाचे तरी बरेच जवळ...! धुराचे लोळच्या लोळ सोडत ती गाडी तशीच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेदनाकारपणे पळत होती. जणु येऊं घातलेल्या संकटाची तिळा तमा नव्हती ! क्षिती नव्हती ! !

'...दम धर जरा—' तो स्वतःशींच पुटपुटला, 'आता दाखवतोंच तुला खरा जर्मन इंगा—' जमिनीची त्यानं काळजीपूर्वक पाहाणी केली. मनाची चलबिचल न होऊं देतां कौल घेतला. किती अजब पारध होती ही—! त्याच्या मनाची शांतता घालवून बसली होती. ' न देखिलें डोळा ' असा प्रसंग त्याच्या समोर घडत होता !

धुराचा पट्टा आता विरळ होऊं लागला होता. एका क्षणाचाहि विलंब न लावतां त्यानं पुनश्च झेप घेतली ... बस ! आता तर त्याची खात्री होती की, खुद्द गाडीलाच हात घातला गेला आहे म्हणून. पण —!

...ऐन वेळीं त्या अजस्त्र पंखाखालून कुण्यातरी अदृश्य शक्तीनं गाडीच हिसकावून घ्यावी, असं झालं.

खाली टाकलेल्या बॉम्ब गोळ्यांचा कानठाळ्या बसविणारा आवाज त्याच्या कानांत अजून घुमत होता. त्याच वेळीं त्याच्या लक्षांत आलं की, चुकलं—! बसल्या जागेवरून कटड्याबाहेर मान वाकवून त्यानं खाली पाहिलं.

'···वाटलंच होतं मला'—तो म्हणाला.···

ती गाडी···तिच्या मागे ; केशकलापाप्रमाणे रुळणारा तो धुराचा काळा पट्टा···कशांतहि खंड पडला नव्हता.

आता त्याच्या लक्ष्यांत यायला लागलं होतं की, आपली गाठ आज अज्ञातशाशी पडली नाही. टकाला महाठक भेटला आहे ! त्या वेड्याची नजर तर अगदी गरुडापेक्षा तेज दिसते ! अन् आपल्या हातून होणार असलेल्या गोष्टीचा अंदाज घ्यायची तर कमालच दिसते याची !—काय मनकवडा आहे हा इंजिन ड्रायव्हर ! वाटलं तेवढं सोपं नाही प्रकरण···! !

आता तो इरेस पेटला होता. असेल नसेल तेवढी कला पणाला लावायचं त्यानं ठरवलं. त्यानं त्या द्वंद्वयुद्धाचं आव्हानच स्वीकारलं जणु !

त्या गाडीच्या मागे, पुढे, दोन्ही बाजूला—अगदी अक्षरशः बॉम्बचा वर्षाव होत होता, पण तो राक्षसासारखा आग ओकत चाललेला अग्नि-रथ आपल्या निवासस्थानाचा रस्ता कापीतच होता. जणु अज्ञात शक्तींनी त्या गाडीचें रक्षण करण्याची शपथ घेतली होती !

गाडी धावत होती. उन्मादानं जणु उड्या मारीत ओरडत चालली होती. त्याचा तो टरा-विक आवाज—'कशासाठी—पोटासाठी—कशासाठी-पोटासाठी—' आणि, त्या गाण्याला जणु बाकीच्या डब्यांनी ताल धरला होता. एखाद्या अश्वराजाच्या मुखांत अडकविलेला लगाम खेचल्या जातांच तो जागच्या जागीं उभा रहावा, त्या प्रमाणे, बॉम्बचा वर्षाव व्हायच्या किंचित आधीच ब्रेक ओढल्या जाई आणि आज्ञाधारक जनावराप्रमाणे ती गाडी जागच्या जागींच उभी राही. जरूर पडल्यास दोन पावलं मागे जाई, अन् काम पडलं म्हणजे धनुष्यांतून सुटलेल्या बाणाप्रमाणे पुढे जाई. तें एवढं मोठ प्रचंड धूड, पण त्या ड्रायव्हरच्या हाताखाली काय काय युक्त्या करील याचा नेम नव्हता. गारांच्या वर्षावासारखे बॉम्ब्स पडत होते !

वाऱ्यावर स्वार होऊनहि त्या जर्मनाला नख-शिखान्त घाम सुटला होता. त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणें तो चिडून थुंकला देखील. आणि, क्षणाचीहि उसंत न घेतां त्यानं लागोपाठ हल्ले करणें सुरू केलं होतं.

आतापर्यंतच्या चुकानं तो शहाणा झाला होता त्याची खात्री झाली, या खेपेला चूक झाली, तर नांव बदलून देईन···! त्या गाडीचीं शभर बॅगं पूर्ण भरलीं होतीं. त्याच्या कल्पनेप्रमाणे, त्या इंजिन ड्रायव्हरनं आताच, पहिल्यांदा चूक केली होती अन् ती सुधरायच्या अगोदरच त्याचं प्रायश्चित्त त्याला दिलं पाहिजे, या विचारानं त्यानं बॉम्ब टाकणाऱ्या यंत्राचा दांडा ओढला, अन्—

बॉम्बच्या स्फोटाऐवजी त्याच्या तोंडून शिव्यांचे स्फोट झालेत, सारे बॉम्ब संपून गेले होते ! त्याला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतकी चीड साऱ्या जन्मांत आली नव्हती ··· तें कांहीं नाहीं, ही संधी गमवतां उपयोगी नाही.

त्यानं आपलें विमान गाडीच्या पातळींत आणलं अन् माशिनगन्चा मारा सुरूं केला पण नशीब तरी असं की, त्याच-वेळीं दुसरं जंगल यावं! त्या घनदाट हरित अरण्याचा त्या गाडीनं आश्रय घेतला. त्याला आता वेड लागायची पाळी आली होती! त्यानं त्या इंजिनवरच नेम धरला होता. त्या शूर जर्मन शिपायाला चिडविण्याचं जंगी पातक त्या रशियन इंजिन ड्रायव्हरनं केलं होतं ना!

··· गाडी वाकडी तिकडी जंगलांतून, दऱ्या खोऱ्यांतून चालवतोस, नाही का? – घे आतां ···"

असं म्हणून त्यानं ट्रीगर ओढली. गोळ्यांची सरबत्ति सुरूं झाली. रुळांवर, चाकावर त्या आपटल्या म्हणजे लोहनाद उत्पन्न होई... पण वेगांत फरक पडला नव्हता. त्यानं आपल्या खुर्चीत थकल्या सारखी मान टाकली!

... आकाशाचा अफाट पसारा समोर पसरलेला होता. वसंत ऋतूंतील निरभ्र असलेलें नीलवर्णी तें नभोवितान! किती सुरेख आहे ही रंगसंगति... ! वेस्ट फालिया या गावीं असतांना अनुभवलेल्या एका वसंत ऋतूंतील दिवसाची आठवण त्याच्या मनाला चाटून गेली. किती दूर आहे आपलं गांव—त्याला वाटलं!

मशिनगन् बंद पडली. त्याचा दारुगोळ्यांचा साठा संपला होता. तें द्वंद्वयुद्ध संपलं होतं. त्याचा शत्रू तो खालचा रशियन जिंकला गेला आहे, ही गोष्ट त्याच्या मनाला ·.री वाटत नव्हती. आपल्या उघड्या डोळ्यांनी पराभव घ्यायचा का? त्यापेक्षा इंजिनावरच धडक मारली तर...आपण फार तर मरूं, पण रसद शत्रूला तर पोंचणार नाही... ठीक ... ठरलं, पागलपणाच्या कृत्याला पागलपणानंच उत्तर द्यायला हवं... त्याच्या अंगांतून चमक निघून गेली.

त्यानं आपलं विमान वरंच खाली आणलं. कांहीं वेळ त्या गाडीवरून समांतरानं चालविलं. त्याच्या त्या हाकण्यांत कुतूहल आणि तिरस्कार यांचं मिश्रण झालेलं दिसत होतं. पण त्या रशियन ड्रायव्हरची नजर आपल्या प्रत्येक हालचालींवर खिळली आहे, हें त्या बिचाऱ्या जर्मनाला काय माहीत!! तो ड्रायव्हर म्हणाला, "आता मात्र तूं मेलास, हं! संपली तुझी अक्कल..."

त्यानं आपल्या गाडीचा वेग वाढवला. इंजिनाच्या समोर रुळांवर त्या विमानाची सावली पडली होती. त्यानं आणखी वेग वाढवला. त्या अग्निरथानं आपल्या लोहमार्गावर पडलेली त्या विमानाची पडछाया खुडून तुडवून टाकली! जणु तो जर्मन वैमानिक हतबल झाला आहे, हें त्याला आधीच कळलं होतं!

• • •

मना केलेली गोष्ट! —

मूळ लेखक—Ian Hay.
अनुवादकः—पद्माकर निमदेव, बी. ए.

●●● दारूबंदीच्या आजच्या जमान्यांत ही बपरोधित अनुवादित कथा फारच मजेशीर वाटेल, यांत शंका नाही! ●●●

★ ★ ★

लंडनला असतांना माझी आणि अमेरिकन लोकांची भेट होत असे; पण प्रत्यक्ष अमेरिकेंत येण्याची माझी ती पहिलीच वेळ होती. लंडनला माझा एक अमेरिकन मित्र होता. त्याचं नांव होतं लॅरी लिंच. लंडनला तो व मी खूप हिंडलों. तीं लंडनची गमतीदार दृश्यें पाहून तर त्याला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोटि डॉलर्स मिळाल्याचा आनंद झाला. अशाच एका नोव्हेंबर महिन्यांत मी त्याला निरोप दिला अगदी पहाटे; जर नोव्हेंबर महिन्यांत सूर्य कधी उगवला तरच तिला पहाट म्हणावयाचं, हं. जातांना त्याने मला सांगितलें, ' तूं अमेरिकेंत अवश्य ये. ' मीहि म्हटलं, ' हो हो, येईन तर. '

आणि, ज्या दिवशीं मी न्यूयॉर्क शहरीं आलों, त्याच दिवशीं मला घेण्याकरिता लॅरी बोटीच्या धक्क्यावर आला होता. त्याच्या बरोबरच मी न्यूयॉर्क शहरीं हिंडलों.

लॅरीने माझी राहण्याची वगैरे सोय एका हॉटेलांत लावून दिली. माझ्या भोवतीं त्यावेळीं किती तरी लोक जमले. ज्याने माझी बॅग आणली त्याला मी थोडे जास्त पैसे दिले. त्याने तर आपले सर्वच मित्र तेथे जमविले. ते सर्व आयरिश होते. त्यांनी मला आश्वासन दिलं की, आम्ही तुमचं कोणतेहि काम करूं. त्या लोकांना माझ्याबद्दल एवढी आस्था का वाटूं लागली, हेंच मला कळेना; कदाचित् आम्ही त्यांना ' होम रूल ' दिल्याचा तर तो परिणाम नसेल ना!

मी आणि लॅरी आमच्या हॉटेलमधून बाहेर पडलों. तो म्हणाला, " आता तुला माझ्याबरोबर जेवायला चलायचं हं. " मला वाटले तो कुठल्या तरी एखाद्या मोठ्या थोरल्या रेस्टोराँ मध्ये घेऊन जाईल. मी त्याला तेथील दोन–चार मोठ्या रेस्टोराँची नांवं विचारलीं. तो म्हणाला, " अमेरिकेंत प्रत्येक क्षणाला नवीन नवीन गोष्टी घडत असतात! "

एका ठिकाणीं आमची टॅक्सी थांबली. ती जागा जरा एकीकडेच होती. आम्ही उतरून वीस एक यार्डांचें अंतर चालून गेलों व एका घरापाशीं थांबलों. तें घर उंच होतं. त्याचा रंग विटकरी होता आणि समोरील दाराकडे जाण्याला पायऱ्या होत्या. पण आम्ही त्या पायऱ्यांकडून गेलों नाहीं. खालच्या बाजूला असलेल्या एका दाराकडे लॅरीने मला नेलें. आणि, तेथील विजेचें बटन दाबलें. दोन इंच अंतर राहील एवढाच दरवाजा उघडला गेला आणि लॅरी आंत तेथे कुणाशी तरी कांही तरी बोलला. थोड्या वेळाने तो दरवाजा उघडला गेला आणि आम्ही आंत शिरलों. पुन: आम्हांला एक दरवाजा लागला. तो चांगला लोखंडी होता.

ज्या इसमाने आम्हांला आंत घेतलें, त्यानेच त्या दारावर हळूहळू थाप मारण्यास सुरवात केली. त्या बरोबर तेथे एक लहानसें छिद्र दिसूं लागलें आणि त्यांतून एक मनुष्य आपल्या डोळ्यांनी पाहूं लागला.

आम्हांला आंत सोडण्यांत आलें. आम्ही एका छोट्या घरांत आलों. दिवाणखान्याकडे एक छोटासा जिना होता. तेथील प्रत्येक खोली माणसांनी कशी अगदी भरून गेली होती. कांही जेवीत होते, तर कांहींचा थट्टाविनोद चालू होता. सर्व दारं उघडलीं गेलीं आणि नोकर–वर्ग इकडून तिकडे फिरूं लागला. त्यांच्या हातांत बशा आणि पेले होते. आम्ही वरच्या मजल्यावर गेलों. तेथेहि लोक होतेच, तेहि जेवीत होते. मी व लॅरी एका रांगेत बसलों. वीस-एक मिनिटांत आम्हांला एक टेबल मिळालें. आम्ही लोक फक्त भोजनाच्या वेळीं मद्य पितों, पण हे न्यूयॉर्कचे लोक! —

लवकरच आमचें जेवण— अप्रातिमच होतें तें —आटोपलें. आमच्या खोलींतले लोक मोठे आनंदांत होते. कांहींनी ' नाईट ' सूट घातले होते. ज्या युवती होत्या, त्या मोठ्या विलोभनीय होत्या. मी लॅरीला म्हटलें देखील की, तुझा क्लब काय सुंदर आहे रे! शांत, एकीकडे आणि रोमँटिक. लंडनला गेल्यावर माझ्या कांही राजकारणी दोस्तांना तेथेहि मद्यपानबंदी सुरू करण्यास मी अवश्य सांगेन. लॅरी हसला. जेवण आटोपून आम्ही चिरूट ओढलें.

रात्रीं अकरा वाजतां लॅरी म्हणाला, ' आता आपण ' सपर ' घ्यायला जाऊं. ' मी त्याला विचारलें, ' तशी ' सपर ' घेण्याची व्यवस्था येथे जवळपास आहे का? ' तो म्हणाला,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वाटेल तेवढी'. अधिकाऱ्यांच्या छापे घालण्या-मुळे मात्र कुणीहि येथे झोपलेला सांपडूं नये; आणि, एखादा झोपलेला सांपडला, तर काय होतें, असा प्रश्न मी विचारणार, तेवढ्यांत आमची टॅक्सी थांबली. लॅरीने टराविक खुणा तेथील एका माणसाला केल्या. नंतर आम्ही एका सुंदर अशा उद्यानांत आलों. तेथे बॅन्ड वाजत होता. टेबलें ठेवलीं होतीं. आणि, जवळच नृत्याकरिता जागा ठेवली होती. तेथे खूप गर्दी होती, प्रत्येक जण खात होता, किंवा नाचत होता, नाही तर गप्पा मारीत होता. अशा तऱ्हेचीं स्थळं लंडन व पॅरिस येथे आहेत. पण हें स्थळ तर त्यांहि-पेक्षा निराळेंच होतें!

लॅरी व मी एका टेबलापाशीं आलों. तेथें दोन जोडपीं बसलीं होतीं. आम्ही सर्वांनी अल्पोपहार केला. मी एका युवतीबरोबर नृत्य करूं लागलों. तिला लंडनची माहिती होती, असें दिसलें. तिने मला न्यूयॉर्कमधील असल्या या क्लबांची माहिती दिली. मला असल्या एखाद्या क्लबचे सभासद करून घ्या, असें मी म्हणतांच ती म्हणाली कीं, तुम्ही असल्या एखाद्या क्लबचे सभासद झालां, तर मला आश्चर्य वाटणार नाही!

तितक्यांत एक भयंकर घटना तेथे घडून आली! सगळीकडे विद्युत् घंटींचा खणखणाट सुरू झाला! जो-तो नृत्य संपवून आपापल्या टेबलापाशी जाऊन बसला. मी माझ्या टेबला-पाशी गेलों, तेव्हा त्या टेबलावरील मद्य व सोडा नाहीसा झाला होता. मला प्रथम थोडेसें वाईटच वाटलें; पण मला असें दिसून आलें कीं, प्रत्येकाच्या टेबलावरच्या मद्याची आणि सोड्याची तीच स्थिति झाली होती! आणि, प्रत्येक जण थंड पाणी ओठांनी हळूहळू पीत होता!

मी त्या युवतीला हें काय गौडबंगाल आहे, असा प्रश्न केला. ती म्हणाली, "अहो, हा छापा आहे, त्या घंट्या वाजल्या, म्हणजे छापा आहे, असं समजावं; 'फेडरल ऑफीसर' येत आहे!

—काय भयंकर आणीबाणीची वेळ होती ती!

थोड्याच वेळांत किंचित् रागीट मुद्रेचा, साधे कपडे घातलेला एक मनुष्य त्या ठिकाणीं आला. तो टेबला-टेबलामधून फिरूं लागला, मी थंड पाणी घटाघट पिऊं लागलों! माझ्या जवळच्या टेबलापाशी तो उभा राहिला; आणि त्याने तेथील एक पेला उचलून त्याचा वास घेतला. पण त्याला जो वास हवा होता, तो कांही आला नाही! त्याने पेला तसाच ठेवला आणि, तो बाहेर निघून गेला. आणि काय चमत्कार पहा!

—आमचें मद्य आणि सोडा पुन: पूर्ववत् टेबलावर तयार! आणि पुन: मद्य, नृत्य आणि त्याच गोष्टी सुरू!!

नंतर मीं लॅरीला विचारलें, " कारे, जर त्या घंटा झाल्या नसत्या, आणि तो अधिकारी तेथे आला असता तर काय झालं असतं?"

लॅरीने कमालीच्या शांततेने उत्तर दिलें, "तसं होणंच शक्य नाही, दोस्त! कारण, त्या घंटा तो स्वत:च वाजवितो!!"

विद्युत् बटन दाबलें, म्हणजे जास्त दिव्याचा झगझगीत प्रकाश पडतो त्याहिपेक्षा जास्त प्रकाश लॅरीचें तें वाक्य ऐकून माझ्या डोक्यांत पडला!

* * *

★ हार्मोनियम ★

आमचेकडे खर्ज, नर मादी सुरांचे सर्व तऱ्हेचे सिंगल, डबल हार्मोनियम व तबले विकत मिळतात. व थोड्या दिवसांत हार्मो-नियम वाजविण्याची माहिती देऊं.

एम्. बी. घोटकर

हार्मोनियम मर्चंट जगन्नाथ रोड

बुधवारी, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतिहासाचें पान—

बाजीरावास आलेलीं प्रेमपत्रें

★

संग्राहक : डॉ. य. खु. देशपांडे
एम्. ए., एल्‌एल्. बी., डी. लिट्.

● बाजीराव पेशवा, दुसरा, यास त्याच्या प्रियकरणींनी पाठविलेलीं तीन प्रेमपत्रें येथे दिलेलीं आहेत. हीं पत्रें ब्रिटिश म्यूझियममध्ये असून त्यांच्या नकला डॉ. य. खु. देशपांडे यांनी आणल्या आहेत. पत्रलेखिका सौ. निरूबाई उपासनी व सौ. वेणूबाई या दोन्ही परस्त्रिया आहेत ! वेणूबाई ही बाजीरावाची मेव्हणी असावी, असें हीं पत्रें संग्राहित करणारा एर्स्किनसाहेब म्हणतो. पण या विधानास पुरावा सापडला पाहिजे. सदर वेणूबाई ही पद्यरचनाहि करीत असे, हें पत्र नं. ३ वरून दिसेल.

हीं तीन्हीं पत्रें वाचकांस मनोरंजक वाटतील. ●

• • •

—१—

सौ. निरूबाई उपासनी हिचें बाजीरावास पत्र

श्रीमंत बाबासाहेब यांसी सौ. निरूबाई उपासनीचा साष्टांग नमस्कार. चैत्र वा॥ ८ भौमवार, मु. पुणें, सुखरूप असो. महाराजांचे वियोगेंकरून एक-एक दिवस युगसमान जात आहे. रात्रंदिवस महाराजांचें दर्शन कधी होईल हाच निजध्यास आहे. स्वारी सोडून खाशाच्या प्रकृतीमुळे पुणें मुक्कामीं राहिलों. औषध देऊन प्रकृत महाराजांचे कृपेनें ताळ्यावर आली आहे. देवाचे कांही असेल म्हणून जेजुरीस तात्यासुद्धां जाऊन आलों. मला येथे करमत नाही. महाराजांचे दर्शनाचा लाभ होईल, तो सुदिन. दीनावर कृपा व्हावी.

—२—

सौ. वेणूबाई हिचें बाजीरावास पत्र

सेवेसी सौ. वेणूनें करद्वय जोडून चरणारविंदीं मस्तक ठेवून नमस्कार विज्ञापना, तागाइत फाल्गुन वा॥ १४ पावेतों महाराजांचे कृपा अवलोकनेंकरून सुखरूप असों. विशेष महाराज कृपा करून तुकाराम याजबरोबर पत्र स्वदस्तुर पुर्ते केलेलें व सिमग्याचे सणाच्या गाठ्या महाराजाकडील एक व सौ. गंगाकडील दोन एकूण तीन त्रिंबकजी डेंगळे यांजकडील कारकून घेऊन आला. त्यापासोन चित्तास बहुत हर्ष जाहाला. महाराजांची स्वारी येऊन प्रेमसुखांत निमग्न कधी होईन ! स्वामी—चरणाची सांनिध्यता नाही, त्या विरहेंकरून मी पीडित जाहलें आहें ! त्याचे मनोरथ रतिप्रयुक्त किंकरीचे पूर्ण करणार महाराज. अहरनिशी चित्त चरणाकडे लागलें आहे. शेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

—३—

सौ. वेणूबाईचें बाजीरावास पत्र

सेवेसी सौ. वेणूनें करद्वय जोडून चरणारविंदीं मस्तक ठेवून नमस्कार विज्ञापना. फाल्गुन व ॥ १२ भृगुवार. महाराजांचे चरणकमलाचें दर्शन लवकर व्हावें, हा निजध्यास रात्रंदिवस लागला आहे. यदर्थी श्लोक—

आता प्राणसख्या ! वियोग अपुला मातें न साहे कदा।
स्वामीचा मुखचंद्रमा मज पडो दृष्टीस की एकदा॥
न्यावें शीघ्र म्हणोन पत्र लिहिलें जोडोनिया हस्तकीं।
यावें दर्शन आपुलें मग मनीं होईन मी स्वस्थ कीं।१।

सेवेसीं श्रुत होय.

★ ★ ★

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य समालोचन

पुस्तकें

१. कल्पना कानन (ले. ब्रिजलाल बियाणी. अनु. प्रमिला ओक, प्र. शिवलाल अग्रवाल, राजस्थान प्रेस, अकोला. किं. रु. २) ना. बियाणी यांच्या मूळ हिंदी पुस्तकाचा हा मराठी अनुवाद आहे. यांत बियाणीजींचे तेरा लघुनिबंध संग्रहीत केलेले आहेत. या लघुनिबंधांमुळे एका राजकारणी पुरुषाच्या अंत:करणांत थोडेसें डोकावून पाहतां येतें. या लघुनिबंधांत कुठे कुठे गद्यकाव्याचाहि आभास निर्माण होतो. एका राजकारणी पुरुषाने मनोविनोदनार्थ लिहिलेलें पुस्तक म्हणून ‘ कल्पना कानन ’ एकवार अवश्य चाळून पाहण्यासारखें आहे.

घाईमुळे असो की कसेंहि असो, मराठी अनुवाद बोजड झाला आहे व त्यावर मूळ हिंदीची छाप ठिकठिकाणीं पडलेली दिसते.

२. म्हणे लढाई संपली ! (ले. वी. रघुनाथ प्र. नागपूर प्रकाशन, नागपूर, किं. रु. १।।) या पुस्तकांत वी. रघुनाथ यांच्या ‘ तडा, ’ ‘ जीवनाचे वारस ’ व ‘ लढाई संपली ! ’ या तीन कथा एकत्रित केल्या आहेत. वी. रघुनाथ यांचा चटकदार लेखनांत हातखंडा असल्यामुळे या तीन्ही कथा आपापल्या परीने वाचनीय उतरल्या आहेत. तथापि मला त्यांतल्या त्यांत ‘ तडा ’ ही कथा विशेष आवडली. मधून मधून अतिशय हृदयंगम कल्पना अगर विचार पेरण्याची वी. रघुनाथ यांची लकब उल्लेखनीय आहे.

तीनच कथांचें व ६६ पृष्ठांचें चिमुकलें पुस्तक काढण्याचें प्रयोजन मात्र समजलें नाही ! वी. रघुनाथ हे खंदे लेखक आहेत. त्यांच्या कथादिकांची भरदार पुस्तकेंच निघावयास हवींत.

३. सन १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धाचें स्वरूप (ले ह. वा. देशपांडे प्र. नागपूर प्रकाशन, नागपूर. किं. रु. ।।) या छोटेखानी पुस्तकांत रा. ह. वा. देशपांडे. यांची ‘भवितव्यां’त येऊन गेलेली लेखमाला पुनर्मुद्रित केलेली आहे, पुस्तकांतील माहिती उद्बोधक असली व देशपांडे यांची लेखनपद्धति जोरदार असली, तथापि अशीं पिटुकलीं पुस्तकें काढण्यांत स्वारस्य काय, हें मला कळत नाही !

४ दोन प्रलयांत युद्धतंत्रें (ले. ह वा. देशपांडे. प्र नागपूर प्रकाशन, नागपूर, किं. रु. २) या पुस्तकांतहि रा. देशपांडे यांच्या ‘ भवितव्यांतील लेखांचें पुनर्मुद्रण करण्यांत आलें आहे. गेल्या महायुद्धांत जर्मनीने ‘ तडित्-युद्धतंत्रा’चा व रशियाने ‘ जानपद—युद्धतंत्रा’चा उपयोग केला होता त्यांचें अभिनव वर्णन या पुस्तकांत केलेलें आहे. रा. देशपांडे यांच्या उमद्या लेखनशैलीमुळे हें वर्णन विशेषच रोचक वाटतें.

हें सारें ठीक आहे. पण हें पुस्तकहि फक्त ६२ पृष्ठांचेंच आहे व त्यांत शेवटीं वर उल्लेखिलेलें ‘ सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचें स्वरूप ’ हें सर्व पुस्तकच समाविष्ट करण्यांत आलें आहे ! ! उत्तरोक्त पुस्तक स्वतंत्र रीतीने छापून तें पुन: या पुस्तकांतहि जोडण्यांत काय उद्देश असेल तो असो ! पण अशा प्रकारामुळे आपण वाचकांवर अजाणतेपणाने का होईना, पण अन्याय करीत आहों, याची जाणीव लेखक व प्रकाशक या उभयतांमहि असलेली दिसत नाही !

५. कॉंग्रेसची पुनर्घटना (ले. स. का. पाटील अनु. इन्दुमती तेंडुलकर. प्र. एम्. एल्. सिलम, सेक्रे. बॉम्बे प्रॉ कॉंग्रेस हाऊस, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई (४) किं. रु. १ मुंबईचे कॉंग्रेस-पुढारी रा. स. का. पाटील यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद या पुस्तकांत केलेला आहे. कॉंग्रेस ही केवळ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी झगडणारी संस्था नाही, तर अखिल मानवजातीच्या प्रगतीसाठी झटणारी ती संस्था आहे, असा पाटलांचा दृढ विश्वास दिसतो. या विश्वासामुळे कॉंग्रेसची पुनर्घटना व्हावी, असें त्यांस वाटतें. कॉंग्रेसमध्ये गट अगर पक्ष नकोत, तिने

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सत्य व अहिंसा यांचा पूर्ण आग्रह धरावा व विशिष्ट कालावधींत तिने विशिष्ट राष्ट्रीय कार्यक्रम पार पाडावा, हीं त्रिविध तत्त्वें दृष्टीसमोर ठेवून रा. पाटील यांनी आपली पुनर्घटना मांडलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय संस्था म्हणून काँग्रेसचें विसर्जन झालें तरी हरकत नाहीं; परंतु रचनात्मक सामाजिक कार्य करणारी संस्था म्हणून तिचें अस्तित्व कायम राहिल्यास तीं स्वागतार्ह घटनाच ठरेल. या दृष्टीने रा. पाटील यांनी सुचविलेल्या पुनर्घटनेच्या कांही तपशिलांत ग्राह्यांश दिसतो.

इंदुमती तेंडूलकर यांनी अनुवाद फार सफाईने केलेला आहे, हें नमूद करण्यास समाधान वाटतें.

६ मनमोर (ले. शांताराम, प्र. वीणा प्रकाशन नागपूर किं. रु. २॥) नागपूरचे तरुण साहित्यिक 'शांताराम' यांच्या लघुकथांचा हा संग्रह आहे. या संग्रहावर कांही स्थळीं अत्यंत तीव्र टीका केलेली माझ्या पाहण्यांत आली आहे. पण ती मला अवास्तव वाटली. 'शांताराम' हे अगदी तरुण आहेत व यामुळे त्यांच्या लघुकथांत कांही दोष असतील, पण उत्तम लघुकथांचा 'कचा माल' या संग्रहांत भरपूर आहे, असें मला वाटतें व या दृष्टीने 'शांताराम' यांना उज्ज्वल भविष्यकाळ आहे, या विषयीं मला बिलकूल शंका नाही प्रस्तुत संग्रहांतील 'ईश्वराची करणी,' 'विमान,' 'सात जणांतील एक,' 'बेडी'—वगैरे लघुकथा वाचकांस रुचिपरत्वें आवडण्याजोग्या आहेत. 'शांताराम' हे जीवनांतील वास्तवतेकडे धिटाईने पाहूं शकतात, याबद्दलच्या खुणा या संग्रहांत कांहीं ठिकाणीं आढळतात आणि ही गोष्ट त्यांच्या विषयीं आशा बाळगण्यास खचित पुरेशी आहे. त्यांच्या लेखणींत आकर्षकताहि भरपूर आहे.

या संग्रहास अनुक्रमणिका नाही व प्रत्येक पृष्ठावर शिरोभागीं पुस्तकाचे लघुकथेचें शीर्षकहि नाही. ही कदाचित् नवीन 'फॅशन' असेल, पण तींत सोइस्करपणा मात्र खास नाही !

७. कर्णहंस (सं. व. प्र. न. स. जोशी खरशीकर शास्त्री, मु. पो. खरशी, जि. सातारा, किं. रु. १) लिंगायत पंथांतील एक संत शांतलिंगमहाराज यांनी लिहिलेला हा ग्रंथ आहे. शांतलिंगमहाराज एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी यांचे समकालीन होते. अर्थात् या ग्रंथाचा रचनाकाल पावणे चारशे वर्षांपूर्वीचा आहे, हें उघड आहे. ग्रंथाचा विषय पंचीकरणाचा म्हणजे तत्त्वज्ञानपर आहे. लिंगायत पंथीयाने मराठींत लिहिलेला हा पहिलाच प्राचीन ग्रंथ होय, या दृष्टीने त्याचें अतिशय महत्त्व आहे,

संपादकीयांत अगर प्रस्तावनेंत ग्रंथाची भाषा, ग्रंथकर्त्याचें तत्त्वज्ञान—वगैरे गोष्टींची तुलनात्मक चर्चा यावयास पाहिजे होती. तसेंच, टीपाहि विपुल प्रमाणांत यावयास हव्या होत्या.

—इतर पुस्तकांचा परामर्ष सवडीने, पण शक्य तों लौकर घेण्यांत येईल.

नियतकालिकें वगैरे

1. Hislop College Nagpur—Diamond Jubilee Souvenir (1945) Published by The Principal, Hislop College, Nagpur.

2. Hislop College Magazine (March 1947) Published by the Principal Hislop College, Nagpur.

3. The King Edwardian (1947) Published by Dr. M. G. Deshmukh King Edward College, Amraoti.

४. नागरिक (सं. गोपाळराव पाठक, 'नागरिक' कार्यालय, किरणकला मंदिर, मॉडेल मिल समोर, नागपूर. वार्षिक वर्गणी ट. हं. स. रु. ५.)

वरील सर्व नियतकालिकें वगैरे आपापल्या परीने चांगलीं आहेत. त्यांचा मी साभार स्वीकार करतों.

विशेषत: नागपूरचे प्रसिद्ध नागरिक रा. गोपाळराव पाठक यांनी 'नागरिक' हें सुंदर साप्ताहिक सुरू केलें, याबद्दल त्यांचें मी मन:पूर्वक अभिनंदन करतों व 'नागरिका' स दीर्घायुष्य चिंतितों. हिंदी लोकांना नागरिकत्व म्हणजे काय, याची अजून जाणीव नाही. ती त्यांस व्हावी व देशांत आदर्श नागरिक निर्माण व्हावे, या उदात्त हेतूने 'नागरिक' पत्र निघालें आहे. तें अगदी योग्य वेळीं निघालें, असेंच कुणीहि म्हणेल.

* * *

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची तारीख १ मे १९४७

वऱ्हाड व निजाम

अकोला येथे २० व २१ एप्रील रोजीं विदर्भ-सर्व-पक्षीय-परिषद् भरली होती. या परिषदेंत निजामचें कायदेशीर आधिपत्य अमान्य करण्याचा व वऱ्हाड निजाम-राज्याचा भाग होऊं शकत नसल्याचा ठराव मंजूर करण्यांत आला. हा ठराव समुचित आहे, याविषयीं मतभेद होण्याचें कारण नाहीं.

पण वऱ्हाडच्या भवितव्यासंबंधीं पुढाऱ्यांतच एकमत दिसून येत नाहीं! (१) वऱ्हाड स्वतंत्र प्रांत व्हावा, (२) तो महाविदर्भांत समाविष्ट व्हावा व (३) त्याचा संयुक्त महाराष्ट्रांत अंतर्भाव व्हावा—असे त्रिविध विचारप्रवाह दिसून येतात. केवळ चारच जिल्ह्यांचा वऱ्हाड स्वयंपूर्ण प्रांत होऊं शकत नाहीं, हें वरवर पाहिलें तरी प्रत्ययास येईल, आणि वऱ्हाडचा स्वतंत्र प्रांत केल्यास मराठी मध्यप्रांताची काय व्यवस्था करावयाची, हाहि प्रश्न विचारांत घ्यावा लागेल. मराठी मध्यप्रांताचा, एक तर, वऱ्हाडसारखाच निराळा प्रांत बनवावा लागेल, किंवा निदान त्याची हिंदी भाषा असणाऱ्या महाकोसलशीं कायमची सांगड तरी घालावी लागेल! वऱ्हाड निजाम—राज्याचा भाग झाला तरी देखील मराठी मध्यप्रांतावर हीच आपत्ति येईल!

वऱ्हाड—मध्यप्रांताचे कित्येक पुढारी महाविदर्भाचा पुरस्कार करीत असतात. महाविदर्भाचा स्वतंत्र प्रांत किंवा उपप्रांत बनवावा, अशी सूचना ते करीत असतात. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत येणार नसेल, तरच महाविदर्भाचा पुरस्कार करणें इष्ट ठरेल. एरवीं संयुक्त महाराष्ट्राच्या विशाल कल्पनेच्या मानानें महाविदर्भाची कल्पना अगदींच खुरटी ठरते!

स्वतंत्र हिंदुस्थानांत प्रांतांना येणारें अनन्यसाधारण महत्त्व लक्षांत घेतां सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या भूप्रदेशाचा एक प्रांत बनविणें हेंच हितपरिणामी होणार आहे. या दृष्टीने आपण सर्वांनी [illegible] महाराष्ट्राचाच आग्रह धरावयास पाहिजे. महाविदर्भाच्या पुरस्कर्त्यांचा सद्धेतु मान्य करूनहि महाविदर्भाच्या पुरस्कारामुळे सर्वसाधारण जनतेचा बुद्धिभेद होतो, हें त्यांच्या निदर्शनास आणणें जरूरीचें वाटतें!

पुढारी कांहीहि म्हणोत, वऱ्हाडच्या जनतेने मात्र अतिशय जागरूक राहिलें पाहिजे. निजामचें आधिपत्य आपणास मान्य नसल्याचें व निजामराज्यांत आपण जाण्यास तयार नसल्याचें तिने स्पष्टपणें जाहीर करावेंच; पण त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्राचाहि तिने निःसंदिग्ध रीतीने पुरस्कार करावा. पुण्या-मुंबईकडील लोक आपल्यावर कुरघोडी करतील, अशा न्यूनगंडाने पछाडलें जाऊन तिने संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करण्याबाबत आढेवेढे घेऊं नयेत! खेडोपाडीं सभा भरवून वऱ्हाडी जनतेने आपला हा निर्धार जगजाहीर करीत राहिलें पाहिजे!

कित्येक पुढारी निजामचे 'पंचमस्तंभी' असावेत, असाहि संशय घेण्यांत येत आहे! त्यांत काय तथ्य असेल तें असो; पण असे पंचमस्तंभी पुढारी कुणी असलेच, तर त्यांना तोंडघशी पाडणें वऱ्हाडच्या जनतेला सहज शक्य आहे! तिने वरीलप्रमाणे जाहीर घोषणा करून आगामी संकटास तोंड देण्याची पुरेपूर तयारी केली, तर या पंचमस्तंभी पुढाऱ्यांचा डाव पूर्णपणें उलटून पडेल आणि त्यांना आपल्या राष्ट्रद्रोहाची जबरदस्त किंमत द्यावी लागेल! तात्पर्य, वऱ्हाडचा प्रश्न सोडविण्याची गुरुकिल्ली सर्वस्वी जनतेच्याच हातीं आहे. फक्त तिने जागरूक व खंबीर मात्र राहिलें पाहिजे!

मुंबईच्या दैनिकाची टीका!

'युगवाणी'च्या एप्रीलच्या अंकांत छापलेल्या कॉपार्डेच्या 'अरेरे! बिचारा वोलिंग्टन!' या लघुकथेच्या आरंभीं दिलेल्या परिचयांत कॉपार्डेच्या लघुकथांना 'सामान्य' म्हटलेलें आहे. त्याचेंच निमित्त करून मुंबईच्या एका दैनिकाने मजवर आग पाखडली आहे!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या टीकेच्या स्वरूपाबद्दल माझी कांहींच तक्रार नाही! सदर दैनिकाच्या संपादकाच्या लघुकथांबद्दल मला अन्यत्र प्रतिकूल लिहिण्याचा प्रसंग आला होता. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां त्या संपादकाचा तोल सुटला असल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें? सदर संपादकानें आपलीं उमेदीचीं वर्षें वावदूकपणांत घालविलीं. आता कुठे त्यानें लघुकथालेखनास सुरवात केली असून कांही मित्रांच्या मदतीनें 'आजकालच्या लघुकथालेखकां'त स्थान मिळविण्याची तो उमेद बाळगून आहे! तेव्हा त्याच्या लघुकथांना कुणी 'ब्र' हि म्हटलेलें त्यास कसें बरें सहन होऊं शकेल?—खरोखर या संपादकाच्या मनःस्थितीबद्दल मला अतिशय सहानुभूति वाटते!

उपरोक्त दैनिकानें कॉपार्डच्या लघुकथांची कड घेण्याचा आव आणलेला असला, तथापि त्याच्या लघुकथा 'सामान्य' नसून 'लोकोत्तर' आहेत, असें समजण्याइतका या दैनिकाचा संपादक दूधखुळा खचित नाही! त्या लघुकथा 'सामान्य' च आहेत, हें तोहि पुरेपूर जाणून आहे! परंतु कॉपार्डला वर चढविल्यावेरीज त्याला मजवर टीका कशी करतां आली असती? टीकेचें एक 'तंत्रच' असतें. एखाद्याला अशा तऱ्हेनें अस्मानांत न्यावयाचें असतें कीं, त्यायोगें दुसरा आपोआप पाताळांत सरळ ढकलला जाईल! टीकेच्या तंत्रांतील हा बिकट प्रकार आहे! तो यशस्वितेनें हाताळल्याबद्दल प्रस्तुत दैनिकाच्या संपादकाचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों!

अर्थात् कॉपार्डच्या लघुकथांबाबत या संपादकाचा माझ्याशीं खराखुरा मतभेद मुळी होतोच कुठे? तेव्हा 'युगवाणी' च्या एप्रीलच्या अंकांत कॉपार्डच्या लघुकथांविषयीं परिचयांत जें लिहिण्यांत आलें आहे, त्याचा हवाला देण्यापलीकडे येथे अधिक कांहीहि लिहिण्याचें प्रयोजन मला दिसत नाही!

'अर्वाचीन चरित्रकोश'

पुणे येथील रा. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी 'अर्वाचीन चरित्रकोश' प्रसिद्ध करून चरित्रकोशाचें काम पुरें केलें आहे. 'प्राचीन चरित्रकोश,' 'मध्ययुगीन चरित्रकोश' व 'अर्वाचीन चरित्रकोश' हे तीन खंड मिळून संपूर्ण चरित्रकोश होतो. या तीन्ही खंडांत एकोणवीस हजार चरित्रें व बावीसशें पृष्ठें आलेलीं आहेत. ही एकच गोष्ट चित्राव शास्त्री यांच्या कार्याची विशालता दर्शविण्यास पुरेशी आहे! चरित्रकोशाच्या रूपानें शास्त्रीबोवांनी मराठींत एका बहुमोल संदर्भग्रंथाची भर घातली आहे व त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

'अर्वाचीन चरित्रकोशां'त वऱ्हाड–मध्यप्रांतांतील कांही व्यक्तींचीं चरित्रें दिलेलीं आहेत, पण त्यांतून कित्येक महनीय व्यक्ति कशा सुटल्या, याचें आश्चर्य वाटतें! महामहोपाध्याय प्रिन्सिपॉल मिराशी, प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. शं. दा. पेंडसे–प्रभृति विद्यमान व कै. बोबडे कवि-प्रभृति विगत व्यक्तींचीं चरित्रें 'अर्वाचीन चरित्रकोशां'त अवश्य यावयास पाहिजे होतीं. स्थलाभावामुळे म्हणा, किंवा कसेंहि म्हणा, त्या त्यांतून सुटल्या एवढें खरें!

हैद्राबाद–संमेलनाध्यक्ष साहित्यिक नाहीत!

हैद्राबादच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान प्राप्त झाल्याबद्दल प्रा. न. र. फाटक यांचें मुंबईच्या मराठी पत्रकारांनीं अभिनंदन केलें. त्याप्रसंगीं केलेल्या भाषणांत प्रा. फाटक म्हणाले कीं, ते साहित्यिक नसून पत्रकार आहेत. तसेंच, 'साहित्यिक' ही शिवी वाटते, असेंहि ते म्हणाल्याचें दिसतें! यावर 'नवयुग' साप्ताहिकानें पुढील मार्मिक टीका केली आहेः—

> "साहित्य–संमेलनाचें अध्यक्षस्थानीं व्यवस्थित रीतीनें निवड झाल्यानंतर मग 'आपण' पत्रकार आहोंत, साहित्यिक नाहीं'—असें म्हणण्याचा हा चावट शिरस्ता गेल्या वर्षीं माडखोलकरांनी सुरू केला आहे.... 'साहित्यिक' ही जर तुम्हांला 'शिवी' वाटते, तर असल्या ग्राम्य व मवाली साहित्यिकांच्या गलिच्छ मेळाव्याचें तुम्ही अध्यक्षस्थान का बरें स्वीकारता?"

रा. माडखोलकर यांचें सारेंच और असल्यामुळे ते कांहीहि म्हणूं शकतात. पण प्रा. फाटक यांच्यासारख्यांनी तसाच 'स्टंट' करावा, हें शोचनीय होय!

त्यांनी हा 'विनोद' (?) केला असल्यास निदान नियोजित अध्यक्षांसारख्या जबाबदार इसमानें असा विनोद करूं नये, असेंच कुणीहि म्हणेल!

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून)

परीक्षाविषयक नियम व सूचना १९४७

१. परीक्षांचा अनुक्रम, त्यांचीं नावें, शुल्क (फी) व प्रश्नपत्रिकांची संख्या पुढे दिल्याप्रमाणे आहे—

अनुक्रम	पदवीचें नांव	फी	प्रश्नपत्रिका
प्रथम कक्षा	साहित्यविनीत	रु. २	१
द्वितीय ,,	साहित्यपरिचित	रु. ४	२
तृतीय ,,	साहित्यस्नातक	रु. ६	३
चतुर्थ ,,	साहित्यपारंगत	रु. १०	५

२. समय: परीक्षा वर्षांतून दोन वेळा, म्हणजे साधारणपणे सप्टेंबरच्या प्रारंभीं व फेब्रुवारीच्या प्रारंभीं घेण्यांत येतील. नक्की तारखा व कार्यक्रम प्रत्येक परीक्षेच्या अगोदर सुमारें एक महिना जाहीर करण्यांत येईल.

३. उमेदवारांची लायकी.

(अ) पहिल्या व दुसऱ्या कक्षेच्या परीक्षेस कोणाही व्यक्तीस बसतां येईल.

(आ) तिसऱ्या व चौथ्या कक्षेच्या परीक्षेस मराठी भाषा ऐच्छिक घेऊन कोणत्याही सरकारमान्य विद्यापीठाची इंटरमीजिएट परीक्षा, श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठाची द्वितीय वर्ष परीक्षा किंवा टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची मध्यमा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणासही बसतां येईल.

(इ) कोणत्याहि शाळेंत कमींत कमी सहा महिने शिक्षकाचें काम केलेल्या व्यक्तीस तिसऱ्या व चौथ्या कक्षेच्या परीक्षेस बसतां येईल.

(ई) महाराष्ट्र साहित्य परिषदेची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस तृतीय कक्षेस आणि प्राज्ञ परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस चतुर्थ कक्षेस बसतां येईल.

(उ) संघाची द्वितीय कक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस तृतीय कक्षेला व तृतीय कक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस चतुर्थ कक्षेला बसतां येईल.

(ऊ) पोट कलम (आ) व (ई) मध्ये नमूद केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा कोणत्याही विद्यालयाच्या (कॉलेज) प्राध्यापकाच्या सहीचा दाखला उमेदवाराने पाठविला पाहिजे. इतर कोणताहि लायकीबाबत पुरावा दिल्यास वरील दाखला पाठविला नाही तरी चालेल.

४. परीक्षांचा दर्जा: पहिल्या परीक्षेचा दर्जा, मराठी विषयापुरता, मध्यप्रांत वऱ्हाड सरकारच्या हायस्कूल सर्टिफिकेट (मॅट्रिक) परीक्षेइतका राहील. दुसऱ्या परीक्षेचा दर्जा नागपूर विद्यापीठाच्या इंटरमीजिएट परीक्षेइतका, तिसऱ्या परीक्षेचा बी. ए. इतका व चौथ्या परीक्षेचा जवळ जवळ एम्. ए. इतका राहील.

५ परीक्षांचें स्वरूप व उत्तीर्णतेची अट इ.

पहिली कक्षा—साहित्यविनीत

प्रश्नपत्रिका १—गद्य व पद्य; गुण १००; उत्तीर्ण होण्यास अवश्य गुण ३५.

दुसरी कक्षा—साहित्यपरिचित

प्र. प. १—गद्य; गुण १००

प्र. प. २—पद्य; गुण १००.

तिसरी कक्षा—साहित्यस्नातक

प्र. प. १—गद्य; गुण १००.

प्र. प. २—पद्य; गुण १००.

प्र. प. ३—व्याकरण व साहित्य; गुण १००.

दुसऱ्या व तिसऱ्या कक्षेंत प्रत्येक प्रश्नपत्रिकेंत ३० गुण व त्या त्या परीक्षेच्या एकूण सर्व प्रश्नपत्रिकांमध्ये एकूण गुणांच्या बेरजेंकी शेंकडा ३५ गुण मिळविणारा उत्तीर्ण समजला जाईल.

चौथी कक्षा—साहित्यपारंगत

प्र. प. १—गद्य (गुण ७०) व वाङ्मयसमालोचन (नेमलेल्या पुस्तकांस धरून) (गुण ३०); एकूण गुण १००.

प्र. प. २—पद्य (गुण ७०); साहित्य, अलंकार व छंद (नेमलेल्या पुस्तकांस धरून (गुण ३०); एकूण गुण १००.

प्र. प. ३—वाङ्मयप्रकार (कादंबरी, नाटक, चरित्र, काव्य, निबंध यांपैकी कोणता तरी एक) (१९४७–४८, १९४८–४९, १९४९–५० या वर्षांकरितां 'कादंबरी' हा प्रकार नेमला आहे); गुण १००

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्र. प. ४–व्याकरण (गुण ५०) व वाङ्मयातहास (गुण ५०); एकूण गुण १००.

प्र. प. ५–साहित्यशास्त्र, अलंकार व छंदशास्त्र (तीन्हींचें सामान्य स्वरूपाचे व्यापक ज्ञान) (गुण ५०); निबंध (गुण ५०); एकूण गुण १००

चौथ्या कक्षेत, प्रत्येक प्रश्नपत्रिकेंत उत्तीर्ण होण्यास किमान गुण ३५; एकंदर परीक्षेत उत्तीर्ण होण्यास एकूण गुणांपैकी शेंकडा ४० आवश्यक.

६. पहिला व दुसरा वर्ग. पहिल्या तीन कक्षांमध्ये एकूण गुणांपैकीं शें. ४५ गुण मिळविणारा दुसऱ्या वर्गात व शें. ६० गुण मिळविणारा पहिल्या वर्गात उत्तीर्ण समजला जाईल. साहित्यपारंगत परीक्षेमध्ये शें. ५० गुण मिळविणारा दुसऱ्या वर्गात व शें.६५ गुण मिळविणारा पहिल्या वर्गात उत्तीर्ण समजला जाईल.

७. सर्व परिक्षांस लागू. उमेदवाराकडून लेखनशुद्धि, भाषाशुद्धि व स्वतःचा आशय नीटनेटकपणाने प्रकट करण्याचें सामर्थ्य यांची कटाक्षाने अपेक्षा केली जाईल. अशुद्ध व गचाळ भाषेसाठी त्या त्या परीक्षेच्या दर्जाच्या मानाने गुण कापले जातील.

८. परीक्षेचा अर्ज व इतर व्यावहारिक. परीक्षेसाठी करावयाच्या अर्जाचा छापील मसुदा पुढे दिलेल्यांपैकी कोणत्याही एका पत्त्यावर एक आण्याचीं तिकिटें पाठविल्यास २० एप्रिल नंतर मिळूं शकेल:—

[१] श्री. ना. बनहट्टी, संचालक, परीक्षासमिति काँग्रेसनगर, नागपूर.

[२] प्रा. ना. कृ. दिवाणजी, सरचिटणीस, विदर्भसाहित्यसंघ, अमरावती.

छापील मसुद्यांतील सर्व सदरें रीतसर भरून परीक्षेचा अर्ज फीसह श्री. ना. बनहट्टी, काँग्रेसनगर, नागपूर, यांजकडे पाठवावा. नियम ३ प्रमाणे लायकीचा दाखला पाठविणें अवश्य असल्यास तो अर्जासोबत पाठविला पाहिजे. सप्टेंबर परीक्षेचे अर्ज ता. ३१ जुलैचे आंत आणि फेब्रुवारी परीक्षेचे अर्ज ३१ डिसेंबरच्या आंत वरील पत्त्यावर पोचले पाहिजेत. मुदतीनंतर आलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. एकदा भरलेली परीक्षेची फी कोणत्याहि कारणास्तव परत केली जाणार नाही.

अर्ज मंजूर झाल्याचा दाखला आणि कोणच्या ठिकाणीं कोणाच्या देखरेखीखाली प्रश्नपत्रिकांचीं उत्तरें लिहावयाचीं ही माहिती प्रत्येक उमेदवारास परीक्षेच्या तारखेच्या अगोदर १० दिवस कळविली जाईल. होताहोईतों ज्या ज्या गावांहून अर्ज येतील, त्या त्या गावीं परीक्षा घेण्याची व्यवस्था केली जाईल. परंतु ज्या गावीं संघाला परीक्षेची सोय करतां येणार नाही, अशा गावांतील उमेदवारांस जवळपासच्या शहरीं जाऊन परीक्षा द्यावी लागेल.

जेथे शक्य होईल तेथे परीक्षांचें केंद्र स्थापन करण्याचा प्रयत्न केला जाईल. केंद्र स्थापन करूं इच्छिणारांनी परीक्षासमितीच्या संचालकाकडे पत्रव्यवहार करावा.

परीक्षेवर देखरेख करण्याकरिता प्रत्येक ठिकाणीं संघाकडून निरीक्षक नेमले जातील. उमेदवारांनी ठरलेल्या वेळीं निरीक्षकाकडून प्रश्नपत्रिका घेऊन त्याच्या देखरेखीखाली उत्तरें लिहिलीं पाहिजेत.

परीक्षांचा निकाल परीक्षा झाल्यानंतर साधारणपणे दीड महिन्याच्या आंत वृत्तपत्रांतून जाहीर केला जाईल. नगदी किंवा तिकिटरूपाने आठ आणे पाठविणारास प्रत्येक प्रश्नपत्रिकेंतील गुणांसह व्यक्तिशः निकाल कळविला जाईल. उत्तीर्ण उमेदवारांस प्रमाणपत्रें दिलीं जातील.

९. सरकारमान्यता: या परीक्षांना मध्यप्रांत वऱ्हाड सरकारची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे व त्यांत यश येईल अशी आशा आहे.

परीक्षांचा अभ्यासक्रम (१९४७ व पुढील वर्षे)

सूचनाः कंसांतील आकडे गुणांचे निदर्शक आहेत. पाठ्यपुस्तकांच्या पुढे जी गुणसंख्या नमूद केली आहे त्या गुणसंख्येचे प्रश्न साधारणपणे त्या त्या पाठ्यपुस्तकावर विचारण्यांत येतील.

पहिली कक्षा : साहित्यविनीत

प्रश्नपत्रिका १ गद्य व पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८०)

१. वाईकर भटजी–धनुर्धारी (२०)
२. स्मृतिचित्रें (संक्षिप्त आवृत्ति)–लक्ष्मीबाई टिळक (२०)
३. सत्तेचे गुलाम—वरेरकर (२०)
४. महाराष्ट्र रसवंती भाग ३—सं. रानडे व खानोलकर (२०)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्याकरण, वृत्तें व अलंकार (२०)

यांवर नेमलेल्या पुस्तकांवरून उद्‌भवणारे ढोबळ प्रश्न येतील. पाठभेदाचे प्रश्न घालण्यांत येणार नाहीत. शिफारस केलेलीं पुस्तकें:—

माध्यमिक व्याकरण—स. ना. गोखले.

वृत्तालंकारदीपिका—पु. गो. निजसुरे.

शुद्धलेखनमंडळाचे नियम (महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें २).

दुसरी कक्षा : साहित्यपरिचित

प्रश्नपत्रिका १—गद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८०)

१. आमच्या देशाची स्थिति-चिपळूणकर(२०)
२. एकावळी-श्री. ना. बनहट्टी (२०)
३. केवळ स्वराज्यासाठी-ह. ना. आपटे (२०)
४. कांचनगडची मोहना-खाडिलकर (२०)

निबंध (सर्वसामान्य विषयावर) (२०)

प्रश्नपत्रिका २-पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (७०)

१. नलदमयंती स्वयंवराख्यान-सं.बनहट्टी(३०)
२. पांच कवि-सं. मं. वि. राजाध्यक्ष (४०)

व्याकरण, वृत्तें, रस व अलंकार इत्यादि (३०)

यांवर नेमलेल्या पुस्तकांवरून उद्भवणारे प्रश्न येतील.

शिफारस केलेलीं पुस्तकें:—

मराठी दीपिका-वि. भि. कोलते.

वृत्तें व अलंकार-वि. म. कुळकर्णी.

माध्यमिक व्याकरण-स. ना. गोखले.

तिसरी कक्षा : साहित्यस्नातक

प्रश्नपत्रिका १—गद्य (१००)

पाठ्यपुस्तकें

१. आज्ञापत्र (२५)
२. विचारविहार-वा. म. जोशी (२५)
३. प्रेमशोधन-श्री. कृ. कोल्हटकर (२५)
४. विशाल जीवन—पु. य. देशपांडे (५५)

तंत्रविषयक मार्गदर्शनासाठी :

प्रतिभासाधन-ना. सी. फडके.

प्रश्नपत्रिका २-पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८५)

१. ज्ञानेश्वरी, अध्याय १ ला (राजवाडे प्रत)(२)
२. श्लोककेकावली-मोरोपंत (२०)
३. केशवसुतांची कविता (२५)
४. भग्नमूर्ति-आ. रा. देशपांडे (२०)

रस, अलंकार इ. (नेमलेल्या पुस्तकांस धरून)(१५)

मार्गदर्शनासाठी :

अलंकारचंद्रिका-रा. सा. ग. मो. गोरे.

प्रश्नपत्रिका ३-(अ)व्याकरण व साहित्य(७०)

१. मराठीची सजावट भाग १ व २-गो. गो. मुजुमदार
२. मराठी साहित्य आणि व्याकरण-मोने } (३६)

३ काव्यालोचन-द.के. केळकर
४. महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण—डॉ. केतकर } (३५)

(ब) निबंध (सर्वसामान्य विषयावर) (३०)

चौथी कक्षा : साहित्यपारंगत

प्रश्नपत्रिका १—गद्य (१००)

१. लीलाचरित्र, एकांक—सं. ह. ना. नेने
२. भाऊसाहेबांची बखर
३. संपूर्ण आगरकर, भाग १
४. सुदाम्याचे पोहे—श्री. कृ. कोल्हटकर
५. भावबंधन—गडकरी
६. वायुलहरी—खांडेकर

प्रश्नपत्रिका २—पद्य (१००)

१. नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर—सं. कोलते
२. तुकारामवचनामृत – सं. रा. द. रानडे
३. सीतास्वयंवर-नागेश
४. वऱ्हाडी लोकगीतें-सं. पां. श्रा. गोरे
५. फुलांची ओंजळ-Bee
६. सुधारक-मा. त्रिं. पटवर्धन.

प्रश्नपत्रिका ३-वाङ्मयप्रकार-कादंबरी १००,

१. पण लक्षांत कोण घेतो !-ह. ना. आपटे
२. चंद्रगुप्त — ,,
३. इंदु काळे व सरला भोळे-वा. म. जोशी
४. सुकलेलें फूल-पु. य. देशपांडे
५. सुटकेपार – ना. सी. फडके
६. क्रौंचवध-वि. स. खांडेकर
७. रणांगण-बेडेकर
८. पाणकळा-दिघे.

(पुढील मजकूर मलपृष्ठ २ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्र. प. ४–व्याकरण (गुण ५०) व वाङ्मयातहास (गुण ५०); एकूण गुण १००.

प्र. प. ५–साहित्यशास्त्र, अलंकार व छंदशास्त्र (तीन्हींचें सामान्य स्वरूपाचे व्यापकें ज्ञान) (गुण ५०); निबंध (गुण ५०); एकूण गुण १००

चौथ्या कक्षेत, प्रत्येक प्रश्नपत्रिकेंत उत्तीर्ण होण्यास किमान गुण ३५; एकंदर परीक्षेत उत्तीर्ण होण्यास एकूण गुणांपैकी शेंकडा ४० आवश्यक.

६. पहिला व दुसरा वर्ग. पहिल्या तीन कक्षांमध्ये एकूण गुणांपैकीं शें. ४५ गुण मिळविणारा दुसऱ्या वर्गात व शें. ६० गुण मिळविणारा पहिल्या वर्गात उत्तीर्ण समजला जाईल. साहित्यपारंगत परीक्षेमध्ये शें. ५० गुण मिळविणारा दुसऱ्या वर्गात व शें.६५ गुण मिळविणारा पहिल्या वर्गात उत्तीर्ण समजला जाईल.

७. सर्व परिक्षांस लागू. उमेदवाराकडून लेखनशुद्धि, भाषाशुद्धि व स्वतःचा आशय नीटनेटकपणाने प्रकट करण्याचें सामर्थ्य यांची कटाक्षाने अपेक्षा केली जाईल. अशुद्ध व गचाळ भाषेसाठी त्या त्या परीक्षेच्या दर्जाच्या मानाने गुण कापले जातील.

८. परीक्षेचा अर्ज व इतर व्यावहारिक. परीक्षेसाठी करावयाच्या अर्जाचा छापील मसुदा पुढे दिलेल्यांपैकी कोणत्याही एका पत्त्यावर एक आण्याचीं तिकिटें पाठविल्यास २० एप्रिल नंतर मिळूं शकेल:—

[१] श्री. ना. बनहट्टी, संचालक, परीक्षासमिति कॉंग्रेसनगर, नागपूर.

[२] प्रा. ना. कृ. दिवाणजी, सरचिटणीस, विदर्भसाहित्यसंघ, अमरावती.

छापील मसुद्यांतील सर्व सदरें रीतसर भरून परीक्षेचा अर्ज फीसह **श्री. ना. बनहट्टी, कॉंग्रेसनगर, नागपूर,** यांजकडे पाठवावा. नियम ३ प्रमाणे लायकीचा दाखला पाठविणें अवश्य असल्यास तो अर्जासोबत पाठविला पाहिजे. सप्टेंबर परीक्षेचे अर्ज ता. ३१ जुलैचे आंत आणि फेब्रुवारी परीक्षेचे अर्ज ३१ डिसेंबरच्या आंत वरील पत्त्यावर पोचले पाहिजेत. मुदतीनंतर आलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. एकदा भरलेली परीक्षेची फी कोणत्याहि कारणास्तव परत केली जाणार नाही.

अर्ज मंजूर झाल्याचा दाखला आणि कोणच्या ठिकाणीं कोणाच्या देखरेखीखाली प्रश्नपत्रिकांचीं उत्तरें लिहावयाचीं ही माहिती प्रत्येक उमेदवारास परीक्षेच्या तारखेच्या अगोदर १० दिवस कळविली जाईल. होताहोईतों ज्या ज्या गावांहून अर्ज येतील, त्या त्या गावीं परीक्षा घेण्याची व्यवस्था केली जाईल. परंतु ज्या गावीं संघाला परीक्षेची सोय करतां येणार नाही, अशा गावांतील उमेदवारांस जवळपासच्या शहरीं जाऊन परीक्षा द्यावी लागेल.

जेथे शक्य होईल तेथे परीक्षांचें केंद्र स्थापन करण्याचा प्रयत्न केला जाईल. केंद्र स्थापन करूं इच्छिणारांनी परीक्षासमितीच्या संचालकाकडे पत्रव्यवहार करावा.

परीक्षेवर देखरेख करण्याकरिता प्रत्येक ठिकाणीं संघाकडून निरीक्षक नेमले जातील. उमेदवारांनी ठरलेल्या वेळीं निरीक्षकाकडून प्रश्नपत्रिका घेऊन त्याच्या देखरेखीखाली उत्तरें लिहिलीं पाहिजेत.

परीक्षांचा निकाल परीक्षा झाल्यानंतर साधारणपणे दीड महिन्याच्या आंत वृत्तपत्रांतून जाहीर केला जाईल. नगदी किंवा तिकिटरूपाने आठ आणे पाठविणारास प्रत्येक प्रश्नपत्रिकेंतील गुणांसह व्यक्तिशः निकाल कळविला जाईल. उत्तीर्ण उमेदवारांस प्रमाणपत्रें दिलीं जातील.

९. सरकारमान्यता: या परीक्षांना मध्यप्रांत वऱ्हाड सरकारची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे व त्यांत यश येईल अशी आशा आहे.

परीक्षांचा अभ्यासक्रम (१९४७ व पुढील वर्षे)

सूचना: कंसांतील आकडे गुणांचे निदर्शक आहेत. पाठ्यपुस्तकांच्या पुढे जी गुणसंख्या नमूद केली आहे त्या गुणसंख्येचे प्रश्न साधारणपणे त्या त्या पाठ्यपुस्तकावर विचारण्यांत येतील.

पहिली कक्षा : साहित्यविनीत

प्रश्नपत्रिका १ गद्य व पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८०)

१. वाईकर भटजी–धनुर्धारी (२०)

२. स्मृतिचित्रें (संक्षिप्त आवृत्ति)–लक्ष्मीबाई टिळक (२०)

३. सत्तेचे गुलाम—वरेरकर (२०)

४. महाराष्ट्र रसवंती भाग ३—सं. रानडे व खानोलकर (२०)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्याकरण, वृत्तें व अलंकार (२०)

यांवर नेमलेल्या पुस्तकांवरून उद्भवणारे ढोबळ प्रश्न येतील. पाठभेदाचे प्रश्न घालण्यांत येणार नाहीत. शिफारस केलेलीं पुस्तकें:—

माध्यमिक व्याकरण—स. ना. गोखले.

वृत्तालंकारदीपिका—पु. गो. निजसुरे.

शुद्धलेखनमंडळाचे नियम (महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें २)

दुसरी कक्षा : साहित्यपरिचित

प्रश्नपत्रिका १–गद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८०)

१. आमच्या देशाची स्थिति-चिपळूणकर(२०)
२. एकावळी–श्री. ना. बनहट्टी (२०)
३. केवळ स्वराज्यासाठी–ह. ना. आपटे (२०)
४. कांचनगडची मोहना–खाडिलकर (२०)

निबंध (सर्वसामान्य विषयावर) (२०)

प्रश्नपत्रिका २–पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (७०)

१. नलदमयंती स्वयंवराख्यान–सं. बनहट्टी(३०)
२. पांच कवि–सं. मं. वि. राजाध्यक्ष (४०)

व्याकरण, वृत्तें, रस व अलंकार इत्यादि (३०)

यांवर नेमलेल्या पुस्तकांवरून उद्भवणारे प्रश्न येतील.

शिफारस केलेलीं पुस्तकें:—

मराठी दीपिका–वि. भि. कोलते.

वृत्तें व अलंकार–वि. म. कुळकर्णी.

माध्यमिक व्याकरण–स. ना. गोखले.

तिसरी कक्षा : साहित्यस्नातक

प्रश्नपत्रिका १–गद्य (१००)

पाठ्यपुस्तकें

१. आज्ञापत्र (२५)
२. विचारविहार–वा. म. जोशी (२५)
३. प्रेमशोधन–श्री. कृ. कोल्हटकर (२५)
४. विशाल जीवन—पु. य. देशपांडे (५५)

तंत्रविषयक मार्गदर्शनासाठी :

प्रतिभासाधन–ना. सी. फडके.

प्रश्नपत्रिका २–पद्य (१००)

पाठ्यपुस्तकें (८५)

१. ज्ञानेश्वरी, अध्याय १ ला (राजवाडे प्रत)(२)
२. श्लोककेकावली–मोरोपंत (२०)
३. केशवसुतांची कविता (२५)
४. भग्नमूर्ति–आ. रा. देशपांडे (२०)

रस, अलंकार इ. (नेमलेल्या पुस्तकांस धरून)(१५)

मार्गदर्शनासाठी :

अलंकारचंद्रिका–रा. सा. ग. मो. गोरे.

प्रश्नपत्रिका ३–(अ)व्याकरण व साहित्य(७०)

१. मराठीची सजावट भाग १ व २–गो, गो. मुजुमदार
२. मराठी साहित्य आणि व्याकरण–मोने
} (३६)

३ काव्यालोचन–द.के. केळकर
४. महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण —डॉ. केतकर
} (३५)

(ब) निबंध (सर्वसामान्य विषयावर) (३०)

चौथी कक्षा : साहित्यपारंगत

प्रश्नपत्रिका १—गद्य (१००)

१. लीलाचरित्र, एकांक—सं. ह. ना. नेने
२. भाऊसाहेबांची बखर
३. संपूर्ण आगरकर, भाग १
४. सुदाम्याचे पोहे—श्री. कृ. कोल्हटकर
५. भावबंधन—गडकरी
६. वायुलहरी—खांडेकर

प्रश्नपत्रिका २—पद्य (१००)

१. नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर—सं. कोलते
२. तुकारामवचनामृत – सं. रा. द. रानडे
३. सीतास्वयंवर–नागेश
४. वऱ्हाडी लोकगीतें–सं. पां. श्रा. गोरे
५. फुलांची ओंजळ–Bee
६. सुधारक–मा. त्रिं. पटवर्धन.

प्रश्नपत्रिका ३–वाङ्मयप्रकार–कादंबरी १००,

१. पण लक्षांत कोण घेतो !–ह. ना. आपटे
२. चंद्रगुप्त — ,,
३. इंदु काळे व सरला भोळे–वा. म. जोशी
४. सुकलेलें फूल–पु. य. देशपांडे
५. सुटकेचार – ना. सी. फडके
६. क्रौंचवध–वि. स. खांडेकर
७. रणांगण–विभावरी शिरूरकर
८. पाणकळा–दिघे.

(पुढील मजकूर मलपृष्ठ २ वर)

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लवकरच प्रकाशित होत आहे !

ललित साहित्याद्वारें बहुजन समाजाचे

अंतरंग उघड करणारें

उदयोन्मुख लेखकांना उजेडांत आणणारें

मध्यप्रांत वऱ्हाडांतील पहिलेंच

मराठी मासिक

सागर

४॥. रु. वर्गणी भरून आजच

वर्गणीदार व्हा !

ठिकठिकाणी विक्रेते नेमणें आहेत

जाहिरातींचे खास सवलतींच्या दराबाबत

चौकशी करा !

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

व्यवस्थापकः—"सागर" मासिक
अकोला (वऱ्हाड)

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ येथे प्रकाशित केलें.

किरकोळ अंकास ८ आणे

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ